संसार.

(बंगसमाजचित्र.)

हें पुस्तक

मान्यवर बाबू रमेशचंद्र दत्त यांच्या

मूळ बंगाली पुस्तकावरून

बापू नरसिंह भावे

यांणीं मराठींत लिहिलें

तें

भावे, सहस्त्रबुद्धे आणि मंडळी

यांणीं

वाई येथें " **मोदवृत्त** " व " **श्रीकृष्ण** " मुद्रणालयांत छापिलें

१९०४

अर्पणपत्रिका.

स्वर्गवासी

रामचंद्र बळवंत दिवेकर

यांचे आत्म्यास

अर्पण केलें असे.

प्रस्तावना

हें पुस्तक मान्यवरबाबू रमेशचंद्र दत्त यांच्या याच नांवाच्या कृतीचें भाषांतर आहे. या पुस्तकांत वंग समाजाच्या नव्या व जुन्या स्थितिचें चित्र रेखटलें आहे. ह्या चित्राचें महाराष्ट्र समाज चित्राशीं बरेंच साम्य आहे असें वर वर वाचणाराला देखील दिसून येईल. पुस्तकांतील कांहीं कांहीं प्रसंग महाराष्ट्रीय वाचकाना कांहींसे अपरिचित वाटून ते त्याबद्दल नाकें मुरडतील, त्यास इलाज नाहीं. प्रस्तुतचें पुस्तक लिहिण्यांत वंग समाजाचें वास्तविक स्वरूप महाराष्ट्रीय वाचकांपुढें मांडावें हा प्रधान हेतु असल्यामुळें यांत कोठें फारसा फरक केला नाहीं.

वे० शा० सं० काशिनाथ वामन लेले संपादक " धर्म " यांनीं आमचे मासिकपुस्तक (कादंबरी कल्पद्रुम) विशेष सवलतीनें व व्यवस्थेनें छापून देऊन आह्मांस एकप्रकारें उत्तेजन दिलें याबद्दल त्यांचे आभार मानून ही अल्पशी प्रस्तावना संपवितों.

श्रीक्षेत्रवाई
शुक्रवार चैत्र शु० १ शके १८२६ } वा. न. भावे.

संसार.

प्रथम परिच्छेद.

गरीब कुटुंबांतील दोन मुली.

वर्धमानपासून काटोवापर्यंत जो सुंदर रस्ता गेला आहे त्या रस्त्यापासून थोड्या अंतरावर एक मोठी पुष्करिणी आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी एका श्रीमान् जहागिरदारानें प्रवाशांच्या सोयीकरितां व स्वतःच्या कीर्तीकरितां ती सुंदर पुष्करिणी बांधली होती. त्यावेळीं अनेक श्रीमान् लोक अशा प्रकारची अनेक सत्कृत्यें करीत. त्यांची साक्ष वंगदेशांत अद्यापिही अनेक स्थळीं दृष्टीस पडते. पुष्करिणीच्या चारी बाजूंवर ताडांचे मोठमोठे अनेक वृक्ष होते, त्यांची छाया पुष्करिणीवर पडत असे. रात्रीं तर तें ठिकाण किर्र अंधेराचें माहेरघरच बने. त्याच्या आसपास फक्त एका खेड्याशिवाय दुसरी वस्ती नव्हती. त्या खेड्याची वस्ती म्हटली म्हणजे कांहीं कायस्थांचीं घरें, दोन चार ब्राह्मणांचीं घरें, दोन चार कुंभार व लोहार व कांहीं गवळी व कोळी ह्यांचीं घरें एवढीच होय. त्यांतच एक वाण्याचें दुकान होतें; त्यांत तेथील लोकांना प्रत्यहीं लागणाऱ्या अवश्य वस्तु मात्र मिळत. शिवाय तेथून दोन कोस अंतरावर आठवड्यांतून दोन दिवस बाजार भरे. तेथें वस्त्रप्रावरणाची अगर वाण्याच्या दुकानांत न मिळणाऱ्या इतर वस्तूंची खरेदी होई. पुष्करिणीचें नांव "**तालपुष्कर**" व याच नांवावरून खेड्याचें नांवही तेंच पडलें होतें.

वैशाख महिन्यांतील एके दिवशीं संध्याकाळीं त्या गांवांतील एक स्त्री हातीं घागर घेऊन त्या पुष्करिणीवर गेली होती, तिच्या बरोबर तिच्या दोन मुलीही होत्या.

स्त्रीचें वय ३५ वर्षांचें असून मुलींचीं वयें अनुक्रमें नऊ व चार अशीं होतीं.

ह्या वेळीं त्या ठिकाणीं फार अंधार पडला होता व तेथील मोठमोठे तालवृक्ष आकाशांतील मेघांप्रमाणें काळेभोर दिसत होते. वारा मंद वहात होता व त्यामुळें त्या वृक्षराजींतून असा कर्णकटु ध्वनि निघत होता कीं तो एकतांच एकट्या दुकट्याची त्या निर्जन स्थळीं भीतीनें गाळणच उडावी. पुष्करिणीवर दुसरें कोणीही नव्हतें. त्या स्त्रीनें आपली घागर पुष्करिणींत बुडविली. तिच्या दोन्ही मुली शेजारीं उभ्या होत्या.

कळशी पाण्यांत बुडवून व एकवार आकाशाकडे दृष्टि करून त्या स्त्रीनें एक दीर्घ निःश्वास सोडला आणि ती ह्मणाली " बाळ बिंदु, सुधेला जरा धर पाहूं. मी आंग धुवून घेतें. "

बिंदु—आई, मी आंग धुतें.

आई—हें काय बरें बाळ, असल्या तिनसांजा कां कोणी आंग धुते ? आतां आंग धुतलें तर ताप नाहीं कां येणार ?

बिंदु—नाहीं आई, नाहीं ताप येणार. मी आंग धुतें.

आई—हें काय बरें असें ? तुझ्यासारख्या शहाण्या मुलीला असा हट्ट चांगला का ? तूं आंग धुऊं लागलीस ह्मणजे सुधाही हट्ट करील. तूं सुधेला धर, मी हीं आंग धुवून आलेंच.

आईचें भाषण ऐकून त्या नऊ वर्षाच्या बालिकेनें आपल्या धाकट्या बहिणीस मांडीवर घेतलें आणि ती घाटावर बसली. संध्याकाळच्या काळोखानें त्या दोन्ही बहिणींना वेढून टाकलें व संध्यासमीरण त्या अनाथ व गरीब बालिकांची शुश्रूषा करूं लागला. जगामध्यें त्या बिचाऱ्या मुलींना त्यांच्या आईशिवाय खऱ्या मायेचें मनुष्य कोणी नव्हतें.

बिंदुवासिनीची आई कायस्थाची मुलगी. **हरिदास मल्लिक** नांवाच्या एका सामान्य गृहस्थाशीं तिचा विवाह झाला होता. त्याची वीस पचवीस बिघे जमीन होती, पण तो जातीचा कायस्थ असल्यामुळें

स्वत: शेतवाडी न करितां कुळाकडून करवीत असे. त्यामुळें कुळांना मेहनतीबद्दल कांहीं भाग देऊन व सरकारसारा भरून त्याच्या वांटणीस जो भाग येई त्यांत त्याचा सहा महिन्याचा कसा तरी गुजारा होई व बाकीच्या सहा महिन्याकरितां त्याला अतिशय श्रम करावे लागत. तारिणीचरण मल्लिक या नांवाच्या त्याच्या एका चुलत भावास वर्धमान येथें चाकरी होती, पण त्यापासून त्याला विशेष मदत मिळत नसे. कधींकाळीं फारच अडचण पडली तर १०।५ रुपये कर्जाऊ मिळत व ते रुपये परत करतेवेळीं भाऊ ह्मणून व्याजाची सूट मिळे इतकेंच ! लग्न झाल्यावर १५।१६ वर्षांनीं बिंदुवासिनीच्या आईस एक मुलगी झाली. इतक्या दिवसांनीं संतानप्राप्ति झाल्यामुळें आईबापास मोठा आनंद झाला. पण नुसत्या आनंदानें पोट थोडेंच भरतें ! आईबापांच्या प्रीतीशिवाय बिंदुवासिनीला दुसरें कांहीं नव्हतें. तिचा चुलता तारिणी बाबू सुट्टींत घरीं येई त्यावेळीं आपल्या मुलीकरितां छानदार कापड, नवीन तऱ्हेच्या सोन्याच्या बांगड्या वगैरे जिन्नस आणीत असे. बिंदुवासिनीच्या आईबापांनीं अतिशय काटकसर करून व थोडेंसें कर्ज करून मुलीकरितां सांखळ्या व पातळशा बिंदल्या केल्या. पण काढलेलें कर्ज फेडण्यास त्यांना आपलें एक गुरूं विकावें लागलें. बिंदुवासिनी आपल्या चुलतबहिणीबरोबर खेळावयास जाई. बिंदु सद्गुणी मुलगी असल्यामुळें तीवर सर्वांचें प्रेम जडे.

बिंदुवासिनी पांच वर्षांची झाल्यावर तिला एक बहीण झाली. वडील बहिणीचा वर्ण थोडा काळा होता. पण धाकटीचा वर्ण अगदीं गौर असून तिचे डोळे भ्रमराप्रमाणें काळेभोर, ओंठ लालभडक व तिचें मुख सदा स्मित असे, यामुळें आईबापांनीं तिचें नांव सुधाहासिनी असें ठेविलें. पण ही दुसरी मुलगी झाल्यापासून आईबापांची काळजी अधिकच वाढली. मुलीला पिण्यास दूध पाहिजे, अशा सुंदर मुलीला कांहीं तरी बाळलेणें पाहिजे, शेजाऱ्यापाजाऱ्याच्या घरीं जाण्याच्या वेळीं मुलीला एखादी सुंदर कुंची पाहिजे. पण हें सर्व व्हावें

करें ? आईबापांची पुष्कळ इच्छा होती; पण गरीबाची इच्छा पूर्ण व्हावी कशी ?

अशारीतीनें बिंदूचा बाप मोठ्या कष्टानें संसाराचा गाडा ओढीत होता व तिची आई कसेही श्रम पडले तरी न जुमानतां पतीची सेवा व मुलींचें संगोपन करीत होती. प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वी उठून भांडीं घांशी, सडासंमार्जन करी, घराची साफसुफी करी, मुलींना खाऊं घाली व स्नान आटोपून स्वयंपाक करी व भोजनोत्तर थोड्या वेळानें आपल्या मुलींना जवळ घेऊन थोडा विश्राम करी. पुन्हां सायंकाळ झाल्याबरोबर रात्रीच्या भोजनाच्या तयारीस लागे. इतके श्रम पडत तरी आपल्या सुस्वभावी पतीकडे व आपल्या लाडक्या मुलींकडे पाहून तिला त्या श्रमांचें कांहीं वाटत नसे, इतकेंच नव्हे तर ती नेहमीं आनंदी असे.

पण तिचें हें सुख आणि हा आनंद फार दिवस टिकला नाहीं. सुधा तीन वर्षांची झाल्यावर हरिदास मरण पावला. सुधेची आई आपल्या कपाळावर हात मारून रडून रडून आकांत करूं लागली. " परमेश्वर मजवर इतका कां कोपला ? माझी त्याला कशी करुणा आली नाहीं ? " इत्यादि आलापांनीं तिनें अगदीं हलकल्होळ केला. तिचा हा क्रंदनध्वनि ऐकून गांवचे लोक धांवून आले व त्यांनीं अनेकप्रकारें तिचें सांत्वन केलें.

वरील गोष्ट घडून एक वर्ष झालें. हरिदासाची जी जमीन होती त्याबद्दल त्याचा भाऊ जें कांहीं भावजईस देई तेवढेंच तिला मिळे. तेवढ्यांत तिचें कांहीं भागत नसे. अखेरीस तिनें आपलें राहतें घरही विकलें आणि ती आपल्या दिराच्या घरीं राहूं लागली. त्या ठिकाणीं तिला सर्वांचा स्वयंपाक करावा लागे, आपल्या मुलींना दूर ठेवून दिराच्या मुलांना संभाळावें लागे व घरांतील सर्व कामें करावीं लागत. शिवाय लोकांचीं कुचकीं नासकीं बोलणीं सहन करावीं लागत. तीं सर्व ती मुकाट्यानें सहन करी व वेळ सांपडला म्हणजे कोठें तरी एकांतीं बसून अनन्यभा-

वानें परमेश्वराची करुणा भाकी आणि ह्मणे " परमेश्वरा, माझ्या बिंदु-सुधेवर तुझ्या कृपेची पाखर असूं दे व त्यांना सदां सुखी ठेव. मला कितीही दुःख व कष्ट भोगावे लागले तरी त्याची पर्वा नाहीं. आहाहा! बिंदु व सुधा ह्यांचीं लग्नें होऊन त्या सुखांत आहेत असें पाहून जर मला मरण आलें तर मजसारखी भाग्यवान् कोणी नाहीं. " इत्यादि, इत्यादि.

* * * * *

\+ \+ \+ \+

त्या स्त्रीनें आंग धुतलें, कळशी भरून कडेवर घेतली आणि ती मुलीस ह्मणाली " बिंदु, सुधेला कडेवर घे आणि चल. तिला झोप लागली. वाटतें ! "

बिंदु–होय आई, तिला झोप लागली. मी तिला कडेवर घेऊन चलतें.

आई—तिला झोप लागली आहे, तुला नाहीं नेतां यायची. माझ्या कडेवर दे आणि माझा पदर धरून तूं हळूं हळूं चल. काळोख फार पडला आहे, व ढगही आले आहेत. मला वाटतें रात्रीं पाऊस पडेल.

बिंदु—आई, मीच तिला कडेवर घेतें. ते दिवशीं रात्रीं मी तिला घोषबाबूंच्या घरून कडेवरून आणिली आणि आज येथून घरापर्यंत मला नेतां येणार नाहीं कीं काय ? हा पहा, येथून घरांतला दिवा देखील दिसतो आहे !

आई—घे तर मग. पण सावकाश व जपून चल; नाहींतर अंधारांत ठेंचबीच लागून पडशील एखादी. त्या दिवशीं तुझी बहीण उमातारा रात्रीं मेळ्याहून परत येतांना रस्त्यांत पडली व केवढी खोक पडली ठाऊक आहे ना !

बिंदु—आई, ती कोणत्या मेळ्याला गेली होती ! त्यांनीं तेथून किती छान मातीचीं चित्रें, एक लांकडाचा घोडा व एक कळेची गाडी आणली होती ! तिची कळ फिरविली ह्मणजे ती चाले. आई, तिनें हें सर्व कोठून आणलें !

आई—तुला ठाऊक नाहीं अग्रद्वीपास प्रतिवर्षी एक मोठा मेळा भरतो. त्या ठिकाणीं हजारों लोक जमतात, शेंकडों व्यापारी दुकानें आणितात. तेथूनच त्यांनीं हें आणलें.

बिंदु—आई, तूं कधीं तेथें गेली होतीस ?

आई—मी लहान असतांना एकवेळ आमच्या घरचीं सर्व माणसें गेलीं होतीं, त्यांच्या बरोबर मी गेलें होतें. आम्ही सर्व एका झाडाखालीं उतरलों होतों.

बिंदु—आई, तेथें घर नव्हतें का ! झाडाखालीं कां उतरलां !

आई—हजारों लोक तेथें येणार त्या सर्वांना कोठलीं आलीं आहेत घरें ! पुष्कळ लोक झाडाखालींच रहातात. तेथें एक मोठी थोरली आंबराई आहे, तेथेंच हा मेळा भरतो.

बिंदु—आई, मी एकवेळ मेळा पहावयास जाऊं !

आई—आपल्याला कसें जातां येणार बाळ ! आपल्याजवळ पैसे कोठें आहेत ! तीं श्रीमंतांचीं कामें.

बिंदु—आई, मी येत्या वर्षी जाईन. उमातारेनें पाहिला आणि मी कां नको ?

आई—तूं शहाणी मुलगी आणि असा हट्ट करतेस ? तुझी बहिण श्रीमंताची मुलगी. मर्जीस येईल तिकडे तिला जातां येईल. तुझी आई पडली दरिद्री. तुला असा हट्ट शोभतो का ? परमेश्वरानें जर तुमच्या दैवीं सुख लिहिलें असतें तर अन्नवस्त्राकरितां परक्याच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग तुम्हांला कां येतां ? हे परमेश्वरा, तुझी इच्छा !

चोहोंकडे निबिड अंधकार पडला होता, पश्चिमेच्या बाजूला काळे ढग जमले होते, केव्हां केव्हां आकाशांत वीज चमकत होती, वारा सुटला होता व त्यामुळें झाडांच्या पानांचा आवाज होत होता. ह्याशिवाय मधून मधून कोठें घुबडाचा शब्द अगर कोल्ह्याचा ध्वनि ऐकूं येत होता.

आकाशांत एखादी दुसरी निस्तेज तारा अगर शेजारच्या खेड्यांतला एखादा दिवा व मध्यें मध्यें एखादी विजेची चमक ह्याशिवाय सर्व जगत् गाढ अंधारमग्न झालें होतें. अशा अंधाऱ्या रात्रीं झाडाखालच्या पायवाटेनें आपल्या आईचा पदर धरून बिंदु चालली होती. अशा काळोखाच्या वेळीं रस्ता चालत असतांना आईच्या डोळ्यांतून गालावर पडणाऱ्या अश्रूंशिवाय तिला दुसरें कांहीं दिसलें नाहीं.

द्वितीय परिच्छेद.

दोन बहिणी.

तालपुष्कर गांवीं एक सुंदर लहानशी झोंपडी होती. दोन प्रहरची वेळ झाली होती. गांवाच्या चोहोंबाजूंचीं शेतें प्रखर उन्हानें तापलीं होतीं. वैशाखाचा महिना असल्यामुळें शेतकरी सर्व शेतें नांगरून आपले बैल व नांगर वगैरे घेऊन परत येत होते व कांहींजण विश्रांति घेत झाडाखालीं स्वस्थ घोरत पडले होते, व त्यांचीं बायकामुलें अगर अन्य कोणी त्यांच्याकरितां घरून शिदोरी घेऊन येत होती. चोहोंबाजूस गर्द झाडी असल्यामुळें तालपुष्कर गांव हा भयंकर उन्हाळ्यांतही बराच शीतल असे. सभोवार कळकांचीं अनेक बेटें होतीं व त्यांचीं पानें वाऱ्यानें हालत होतीं. कोठें कोठें मोठमोठ्या अश्वत्थवृक्षांनीं पथिक जनांकरितां आपली गर्द छाया पसरली होती व कोठें कोठें मोठमोठ्या आंबराईनीं शेंकडों बिघे जमीन व्यापून टाकिली होती व त्यामुळें दिवसा देखील त्या ठिकाणीं सूर्यकिरणांचा प्रवेश होत नसे. दुपारच्या प्रखर उन्हामुळें पक्षी आपआपल्या घरट्यांत स्वस्थ पडले होते. एखादे वेळीं दिवाभीताचा मात्र ध्वनि ऐकूं येत असे. बाकी सर्वत्र शांतता होती.

तालपुष्करास एक सुंदर लहान झोपडी होती ह्मणून आरंभीं सांगितलेंच आहे. त्या झोपडीभोंवतीं आंबे, चिंच वगैरे फलवृक्ष होते. बाहेरच्या बाजूस बसण्याचा एक सोपा होता व त्याचे शेजारीं पांच सहा नारळीचीं झाडें होतीं. घराच्या मागील दारीं एक पडवी होती. पडवीच्या एका बाजूला कांहीं वेल होते व दुसऱ्या बाजूला कांहीं कांटेरीं झाडें व पलीकडे जंगल होतें. घरांत एक शयनघर होतें व तें सारवून सुरवून साफ ठेविलें होतें. शयनघराशेजारींच स्वयंपाकघर व त्याला लागूनच एक गोठा होता व त्यांत एक गाय होती. घरांतील सर्वांचीं जेवणें झालीं होतीं, चुलींतील विस्तव विझला होता. एका मोठ्या पातेल्यांत स्वैपाकाचीं भांडीं घांसण्याकरितां भिजत ठेविलीं होतीं.

शयनगृहाचें दार बंद होतें व आंत अंधार होता. घरची गृहिणी घरांत वावरत होती. तिची एक तीन वर्षांची कन्या चटईवर निजली होती व सहा महिन्याच्या मुलाला खांद्यावर टाकून ती घरांत फिरत होती व मुलाला झोंप लागावी ह्मणून त्याला थोपटीत होती, आणि तोंडानें कांहीं गाणें गात होती.

ह्या स्त्रीचें वय १८ वर्षांचें होतें. तिचें शरीर कृश, चेहरा शांत, डोळे विशाल व पाणीदार परतु त्यांत चिंतेची झांक असे होते. अठरा वर्षे वयाच्या सुंदरींचें जें वर्णन आपण कादंबऱ्यांत वगैरे वाचतों तशा प्रकारची ही स्त्री नव्हती. कादंबऱ्यांत वर्णिलेलें सुख सर्वांच्या नशीबीं नसतें. ह्या अफाट जगाकडे दृष्टि टाका, दहा पांच लक्ष्मीपुत्रांना सोडून देऊन लक्षावधि दरिद्री लोकांच्या स्थितीकडे लक्ष्य द्या. आपले दरिद्री बांधव किती कष्टानें, किती दुःखानें व किती सहिष्णुतेनें संसारयात्रा करीत आहेत तें अवलोकन करा आणि सांगा कादंबऱ्यांतलें काल्पनिक व केवळ भासमान सुख कितीकांच्या वांट्यास येतें तें. ? रुप्याचे वाट्यांतून गरम दध पिणारे कितीसे लोक सांपडतील ? थोडा वेळ फिरतां

फिरतां कडेवरच्या मुलास झोंप लागली. आईनें मुलाला खालीं चटईवर निजविलें आणि आपण पंखा घेऊन त्याला वारा घालीत बसली. घरांतला मंद उजेड त्या स्त्रीच्या शांत व चिंताशील ललाटावर पडला होता. तिचे स्थिर व कृष्ण नयन आपल्या दोन्ही मुलींकडे लागले होते व त्यांत आईची काळजी व प्रेम व्यक्त होत होतें व मधून मधून तिच्या चेहेऱ्यावर चिंता व निःसीम सहिष्णुता दृग्गोचर होत होती. त्या स्त्रीची शरीरकाठी कृश परंतु बळकट होती. ती आपल्या हातानें मुलीस वारा घालीत होती. पण तिच्या मनांत नानाप्रकारच्या चिंतांनीं काहूर उठविलें होतें. संसाराची चिंता, ह्या सुखदुःखपूर्ण जगाची चिंता व स्वतःची चिंता.

मुलाला गाढ झोंप लागली असें पाहून त्या स्त्रीनें हातांतला पंखा खालीं ठेवला आणि ती मुलाशेजारीं जमिनीवरच लवंडली व लवकरच तिचा डोळा लागला. दुपारच्या तीव्र उन्हामुळें सर्व जगत् निस्तब्ध होतें व त्याप्रमाणें हें घरही होतें. घरांत दोन मुलींशेजारीं स्नेहमयी माता निजली होती. संसारांतील सर्व काळज्या व चिंता तिच्या मनांतून क्षणकाल तरी नष्ट झाल्या होत्या.

ती रमणी तास दीडतास निजली होती. पण इतक्यांत कांहीं ध्वनि ऐकून ती जागी झाली. तिनें डोळे उघडून पाहिलें तों जवळ एक प्रफुल्लनयना, हास्यवदना, सुंदरी बालिका एका मांजराच्या पिलाबरोबर खेळत असलेली तिच्या दृष्टीस पडली. मांजराचें पिलूं उड्या मारमारून त्या मुलीच्या हातांतील वस्तु धरण्याचा प्रयत्न करीत होतें व ती मुलगी त्याच्या उड्या चुकविण्याकरितां हात वर खालीं करीत होती. मुलीचें वय तेरा वर्षांचें होतें, पण तिचें प्रफुल्ल मुख, चिंताशून्य मन व उद्वेगशून्य हृदय बालिकेचेंच होतें, नारीचें नव्हतें.

ती रमणी बराच वेळ त्या बालिकेकडे पहात राहिली आणि नंतर हळूंच म्हणाली " सुधा, तूं केव्हां आलीस ? "

सुधा—मला येऊन बराच वेळ झाला, तूं निजली होतीस ह्मणून तुला उठविलें नाहीं. ताई, हें मांजर बघ कसें शहाणें आहे तें ! मी जाईन तेथें माझ्या मागोमाग येतें. मी स्वैंपाकघरांत त्याला कोंडून ठेवून भांडीं घांसावयास गेलें पण तें माझ्या मागोमाग आलें.

बिंदु—भांडीं घांसणें आटोपलें का ? भांडीं घरांत नेऊन ठेविलींस ना ?

सुधा—हो, ठेविलीं व नंतर ह्या मांजराला घरांत कोंडून इकडे आलें तों हें आपलें इकडेही आहेच. ह्याला माझी बाहुली पाहिजे आहे. मी थोडीच देणार आहे त्याला.

बिंदु—बाळ, दुपारच्या वेळीं थोडी नीज कशी. गेल्या रात्रीं तुझी झोंप झाली नाहीं.

सुधा—ताई, मला दुपारची झोंप येत नाहीं. मला रात्रीं चांगली झोंप लागली होती. एकवेळ बाबू उठून रडूं लागला तेव्हांच मी काय ती जागी झालें. आज बाबूची तब्येत कशी काय आहे ?

बिंदु—आतां बरी आहे पण रात्रीं ताप भरतो. आज एक औषध घेऊन येणार आहेत, तें दिलें ह्मणजे रात्रीं ताप येणार नाहीं व झोंपही लागेल.

सुधा—हेमचंद्र केव्हां येणार आहेत ताई ?

बिंदु—संध्याकाळीं येणार ह्मणून सांगितलें आहे. कां बरें ?

सुधा—ते आले ह्मणजे मी एक गंमत करणार आहें. तुला नाहीं सांगणार आतां. ते आले ह्मणजे तुझ्या दृष्टीस पडेल.

बिंदूनें एक वेळ हंसून विचारलें " काय करणार तें सांग तर बघूं ? "

सुधा—अहं:, तूं सांगशील.

बिंदु—नाहीं सांगणार.

सुधा—खरेंच नाहीं सांगणार ?

बिंदु—खरेंच नाहीं सांगणार.

नंतर सुधेनें आपल्या ओच्यांतून एक जिन्नस बाहेर काढला. तो एक हात लांबीचा होता.

बिंदु—हें काय हें !

सुधा—दिसत नाहीं का ! हें काय आहे तें ?

बिंदु—हा तर वाखाचा पेड.

सुधा—पेडच, पण हा कसा शानदार रंगविला आहे.

बिंदु—बरें पण, ह्याचें काय करावयाचें ?

सुधा—सांग बरें, काय करावयाचें तें ?

बिंदु—मला काय ठाऊक ?

सुधा—एवढें देखील ओळखतां येत नाहीं ना ? आज रात्रीं हेमचंद्र निजले ह्मणजे मी हें त्यांच्या दाढीला बांधीन आणि ते उठले ह्मणजे अहो दाढीवाले बोवा, ह्मणून हाक मारीन. मग मोठी मोठी मौज होईल.

असें बोलून सुधेनें मोठ्या आनंदानें टाळी वाजविली. बिंदूला आपलें हसें आंवरेना, ती मोठ्या प्रेमानें भगिनीकडे पाहूं लागली आणि मनांत ह्मणाली, ' सुधे, तूं खरोखर आनंदी आहेस. तुझ्या संगतींत कसाही दुःखी प्राणी असला तरी तो आपलें दुःख विसरेल. तुझ्यावर कोणता प्रसंग आला आहे त्याची तुला कल्पना देखील नाहीं. प्रभो, ह्या बिचाऱ्या अर्भकावर तूं असा कां कोपलास ? ह्या प्रफुल्ल सुधापात्रांत कां गरळ कालविलेंस ?

पहिल्या परिच्छेदांत सांगितलेली गोष्ट घडून आल्यानंतर ९ वर्षांनीं दुसऱ्या परिच्छेदांतील गोष्टीस आरंभ आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहींच. आमच्या गोष्टीचा आरंभ येथूनच. ह्या नऊ वर्षांत काय काय गोष्टी घडून आल्या त्या वर सांगितल्याच आहेत. एक दोन मात्र सांगावयाच्या बाकी आहेत.

बिंदूची आई आपल्या दिराच्या घरीं डोळ्याच्या पाण्याशीं तुकडा खाऊन आपल्या मुलींचें संगोपन करीत होती. आपल्या स्वामीच्या मृत्यू-

नंतर तिनें ह्या संसारांत कोणत्याच सुखाची अपेक्षा ठेविली नव्हती. तिची एवढीच इच्छा होती कीं आपल्या देखत आपल्या मुलींचीं लग्नें व्हावींत. ज्या दिवशीं आपल्या मुलींना घेऊन ती तालपुष्करास गेली त्यावेळीं बिंदूचें वय ९ वर्षांचें होतें; ह्मणून तेव्हांपासूनच ती तिजकरितां वर शोधण्याच्या उद्योगांत होती.

पण गरिबाच्या मुलीचें लग्न होणार कसें ? कलकत्त्यास ज्याप्रमाणें वराचा बाप शेंकडों रुपये हुंडा मागतो तशीच केवळ खेडेगांवांत स्थिति नव्हती, पण श्रीमंताच्या घरीं आपली मुलगी पडावी अशी सर्वांची इच्छा, नातेवाईकाचे घरीं चाकरी करून मुलीचें संगोपन करणारीच्या मुलीशीं लग्न करण्याची कोणास इच्छा होणार ? ज्यांच्या घरीं ती राहत होती त्यांनींही त्यासंबंधानें उचल केली नाहीं. कारण, मुलगी फारशी सुस्वरूप नव्हती. लग्न करण्यास कोणी तयार झालाच तर मुलगी पाहून नाकें मुरडीत. मुलीची चुलती एक दिवस खुर्चीवर बसून केस विंचरीत विंचरीत हांसून बिंदूच्या आईला ह्मणाली " बाई, काळजी कशाला इतकी ? आमच्या घरच्या मुलींच्या लग्नांबद्दल काळजी नको करायला. आमचें नांव, गांव व वर्धमानची मोठी चाकरी या प्रांतीं सर्वांस महशूर आहे. असल्या ठिकाणची मुलगी मिळण्याला मोठें भाग्य लागतें, तुह्मी बिंदूच्या लग्नाची काळजी करतां ? मी थट्टा नाहीं करीत, या दिवाळीचे सुट्टींत घरीं येणें झालें ह्मणजे मी सर्व तजवीज करतें. आमच्या उमातारेचें वय अद्याप सात वर्षांचें देखील झालें नाहीं तोंच तिच्यावर मागण्यावर मागण्या येऊं लागल्या आहेत. पण आमच्याच मनांत नाहीं सध्यां करण्याचें. तिच्याकरितां असें कांहीं घर पहावयाचें कीं लोकांनीं तारीफच करावी. बाई, तुमची स्थिति आमच्यासारखी नाहीं हें खरें, तरी पण तुह्माला काळजी करण्याचें काहीं कारण नाहीं. त्यासंबंधीं सर्व भार मजवर आहे असें समजा. " वरील आश्वासनाचें भाषण ऐकून बिंदूच्या आईला मोठा

आनंद झाला, पण तो तात्पुरताच. कारण, बाईच्या हातून बोलल्याप्रमाणें कांहीं एक कृति झाली नाहीं.

पुढें दिवाळीच्या सुटींत तारिणी बाबू घरीं आले. त्यांनीं येतांना आपल्या गृहिणीकरितां एक चांगला शालू व एक दोन मोठे दागिने आणले होते, मग तिचा आनंद काय विचारावा ! तसेच मुलांकरितां अनेक प्रकारचीं खेळणीं, बूट, पोषाक वगैरे आणले होते. बाबूसाहेब गावांत आले ह्मणून गांवांतले अनेक लोक त्यांना भेटण्याला व त्यांची खुशामत करण्याला येऊं लागले. कोणाला कांहीं कर्ज लागलें, जा बाबूसाहेबाकडे; कोणाला कांहीं पाहिजे, जा बाबूसाहेबाकडे; कोणाला नोकरी पाहिजे, जा बाबूसाहेबाकडे; अशाप्रकारें जो तो बाबूसाहेबाकडे हेलपाटे घालूं लागला. अशा धामधुमींत बिंदूच्या लग्नाची गोष्ट काढतो कोण ? व काढिली तर ऐकतो कोण ! दिवाळीची १५ दिवसांची सुट्टी संपून बाबूसाहेब परतही गेले. पण बिंदूचें लग्न मात्र निश्चित झालें नाहीं.

बिंदूची आई शेजारपाजारच्या बायकांकडे जाऊन त्यांची स्तुति करून वारंवार मुलीच्या लग्नाची गोष्ट काढी व त्याही नुसता हुकार देत आणि ह्मणत " अलीकडे मुलीचें लग्न करणें ह्मणजे मोठें कठिण काम झालें आहे. शिवाय तुमची स्थिति गरिबीची, तुमच्या भाऊजीसारखी तुमची संपन्न स्थिति असती तर कशाला काळजी पाहिजे होती ? पण पाहूं प्रयत्न करून; कांहीं काळजी करूं नका तुह्मी. " अशा रीतीनें त्या स्त्रिया तिचें आश्वासन करून व मध्यें मध्यें तिची व तिच्या पतीची निंदा करून तिचें समाधान करीत व तीही तें सर्व खरें मानून मोठ्या आनंदानें घरीं जाई.

गावांत एक दोन वयोवृद्ध गृहस्थ होते. त्यांची बरेच ठिकाणीं ओळख होती, पुष्कळ ठिकाणीं त्यांचें जाणेंयेणें असे व पुष्कळ मुलींचीं त्यांनीं लग्नें जमवून दिलीं होतीं. बिंदूच्या आईनें त्यांच्या घरीं जाणेंयेणें

ठेविलें. कधीं त्यांच्या मुलांकरितां पैशा दोन पैशांचा खाऊ, कधीं एखादें मार्बीचें चित्र, कधीं एखादा घरीं तयार झालेला खाण्याचा गोड थोड जिन्नस बरोबर घेऊन ती त्यांच्या घरीं जाई आणि बायकांत लग्नाची गोष्ट काढी. त्याही आश्वासन देत आणि ह्मणत "घरांत कानावर घालून तुमचें कार्य करून देऊं. तुह्मी स्वस्थ असा." इतकेंच. अखेरीस सर्व जनलज्जा सोडून देऊन बिंदूच्या आईनें आपण होऊन आपली काहणी पुरुषांच्या कानावर घातली. ते ह्मणाले "आजपर्यंत तुह्मी ही गोष्ट आह्मांला कां कळविली नाहीं ? आह्मांला सांगितल्याशिवाय कां या गोष्टी घडून येणार ? परवां त्या शेजारच्या घोषांच्या मुलीच्या लग्नाचें कोठेंच जमत नव्हतें. पण अखेरीस आह्मांस कळतांच आह्मी कसा तेव्हांच बार उडवून दिला ! स्थळ तरी कसें छान पाहिलें ! खाण्यापिण्याची ददात नाहीं, सर्व यथास्थित. मुलगा बिनवर, काळासावळा व वयानें थोडा जास्त खरा, पण चाळिसच्या फारसा पुढें नाहीं. मुलीचें वय आठ वर्षांचें, पण मुलगी उफाड्याची असल्यामुळें सर्वांनीं ह्यासंबंधाची तारीफच केली. मुलगा वर्धमानास असतो, लिहिणें पुसणें येत नाहीं तरी पण त्याचा लौकिक केवढा ! साहेब लोकांना खाने देतो, घरीं नेहमीं गाण्याच्या मजलिशी चालल्या आहेत, गाड्या घोडे उडवितो आहे. असला थाट पाहून हा कुलीन व सरदार घराण्यांतला नाहीं असें कोण ह्मणेल ? इतक्या दिवस तुह्मी स्वस्थ कशा बसलांत ? अलीकडे कोणाला कोणाची पर्वा उरली नाहीं. आतां बरें केलेंत आमच्या कानावर घातलें तें" इत्यादि इत्यादि. डोळ्यांत अश्रु आणून बिंदूच्या आईनें आपली चुकी-कबूल केली आणि अशा गृहस्थांकडे आपण आलों नाहीं हा मूर्खपणा केला असें तिला वाटूं लागलें. तिच्या डोळ्यांत अश्रु पाहून ते गृहस्थ ह्मणाले "आतां कांहीं काळजी नको. दोन चार दिवसांत आह्मी लग्न ठरवून देतों." बिंदूच्या आईचा आनंद गगनांत माईना. दोन

चार दिवस गेले, दोन चार महिने देखील गेले, पण कशास कांहीं ठिकाण नाहीं.

तालपुष्करचे लोक बोलण्यांत मोठे सुघड पण कृतींत मात्र त्याच्या उलट. लोकांच्या नुसत्या उठाठेवी करण्यांत त्यांचा पहिला नंबर. लोकांच्या घरीं आज काय पदार्थ झाले, कोणाच्या घरीं काय तंटेबखेडे झाले, ह्याची बित्तं बातमी ते काढीत व ती बातमी चोहोंकडे पसरविण्यांत कायावाचामनोवाक्यें प्रयत्न करीत. कोणी संकटांत पडलें अथवा कोणाला कांहीं एखाद्या कामांत ठोकर लागली तर त्यांची यथास्थित पूजा करून त्यांना दुर्वाक्यें बोलण्यांत कसर करीत नसत. पण मदत करण्याचें नांव नको. बिंदूच्या आईची काळजी दूर करण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं.

तालपुष्कर गांवीं हरिदास बाबूचा एक परम मित्र रहात होता. त्याला हेमचंद्र नांवाच्या एका मुलाशिवाय जगांत दुसरें कोणी संबंधी नव्हतें. बाप गरीब होता तरी त्यानें मोठ्या यत्नानें आपल्या मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था केली होती व मुलानेंही झटून अभ्यास करून वर्धमानास एक परीक्षा देऊन हल्लीं तो कलकत्त्यास पाठशाळेंत शिकत होता. पण तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांनीं बापाच्या मृत्यूची बातमी ऐकून शाळा सोडून देऊन तो तालपुष्करास परत आला व बापाची जी काय थोडीबहुत इस्टेट होती त्यावर गुजारा करूं लागला.

हेमचंद्राची लहानपणापासून बिंदूशीं व तिच्या आईशीं ओळख होती. तो गरीब ह्मणून ह्मणा, अगर विश्वविद्यालयाची पायरी चढून कलकत्त्याची हवा लागल्यामुळें ह्मणा, त्याच्या मनांत आपल्या पित्याच्या मित्राच्या गरीब कन्येशीं विवाह करण्याचें आलें व तो त्या उद्योगास लागला. ही गोष्ट ऐकून गांवांतले लोक थक्क झाले. असलें काम करून कुळाला डाग लावणार कीं काय ? असें सांगून हेमचंद्राचे स्नेही सोबती त्याचा निषेध करूं लागले. पण हेमचंद्रानें तें कांहीं न जुमानतां बिंदूच्या आईची गांठ घेतली (आह्मांला लिहिण्याला मोठी शरम वाटते) व तिची व तिच्या

आवेची संमत्ति मिळवून लग्नाचा बेत निश्चित केला. बिंदूची चुलती वाईट नव्हती, तिचा स्वभाव सरळ होता, भांडणतंट्याची तिला संवय नव्हती, कोणाचेंही वाईट व्हावें अशी तिची इच्छा नसे. पण श्रीमंताची मुलगी, नवऱ्याला मोठा रोजगार, याबद्दल थोडा अभिमान वाटून गरीबांबद्दल थोडी सहानुभूति कमी असली तरी ती क्षम्य होती. तिचे एक दोन दुर्गुण सांगून आह्मी आपली लेखणी विटाळीत नाहीं. जगांत निर्दोष असें कोण आहे ?

बिंदूच्या सरल स्वभावाच्या चुलतीनें बिंदूच्या लग्नासंबंधीं विशेष प्रयत्न केला नाहीं याचें कारण तिच्या स्वभावाला तें नको असे. पण लग्न ठरल्याचें ऐकून तिला आनंद झाला. तिनें शुभदिन पाहून हेमचंद्राशीं बिंदूचा विवाह लावून दिला व शेजारपाजारच्या बायका लग्नमंडपांत आल्या होत्या त्यांना ती ह्मणाली, " जशी माझी उमातारा तशीच बिंदु. तिचा विवाह आह्मीं केला नाहीं तर कोण करणार ? बिंदूच्या आईची ही अशी गरीब स्थिति, बापानेंही मागें कांहीं ठेविलें नाहीं. मग आह्मांशिवाय तिला कोण मदत करणार ? " इत्यादि इत्यादि. शेजारपाजारच्या बायकाही " तुह्मी होतां ह्मणून केलें, दुसरें कोण करणार ? " अशा प्रकारें तिची यथेष्ट प्रशंसा करून आपआपल्या घरीं गेल्या.

बिंदूचें लग्न झालें त्यावेळीं सुधेचें वय ५ वर्षांचें होतें. सुधेचेंही लग्न लागलीच होऊन जावें अशी तिच्या आईची प्रबल इच्छा होती. हेमचंद्रानें अनेक तऱ्हेनें तिला सांगितलें कीं मी सुधेला आपल्या घरीं ठेवून तिला थोडें लिहिणें वाचणें शिकवीन आणि ती दहा बारा वर्षांची झाल्यावर स्वतःच्या खर्चानें तिचा विवाह करीन. पण सुधेच्या आईला तें रुचलें नाहीं. ती ह्मणाली " सुधेचा विवाह होण्याच्या आधीं जर मी मेलें तर माझी एक इच्छा राहील. " हेमचंद्राचा निरुपाय झाला. त्यानें ती गोष्ट कबूल केली आणि एका सामान्य स्थितींतल्या सुशिक्षित गृहस्थाशीं सुधेचा विवाह केला.

पतिमरणानंतर बिंदूच्या आईला सुख काय तें एवढेंच वाटलें. दोन्हीही विवाहित कन्यांना मांडीवर बसवून तिनें आपल्याला धन्य मानून घेतलें. अद्यापही ती तारिणीबाबूच्याच घरीं रहात होती. सुधेच्या लग्नानंतर थोड्याच महिन्यांनीं तिनें आपली जीवनयात्रा संपविली.

आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली आहे. ती ही कीं, पाचव्या वर्षीं सुधा विवाहिता स्त्री झाली व सातव्या वर्षीं विधवा झाली. विवाहिता स्त्री ह्मणजे काय, विधवा ह्मणजे काय, हें देखील सुधेला कळत नव्हतें. सात वर्षांची ती अल्लड बालिका आपल्या वडील बहिणीच्या घरीं आनंदानें राहूं लागली.

तृतीय परिच्छेद.

संसारांतील गोष्ट.

दोन प्रहर रात्र झाली होती. चंद्राचे निर्मल व शीतल किरण सर्वत्र पसरले होते. गांवाच्या भोंवताली असलेल्या कळकांच्या अनेक बेटांवर, पुष्करिणीच्या पाण्यावर चंद्रप्रकाश खेळत होता. तसेंच घरांच्या अंगणांत व कवलारांवर स्वच्छ चादर पसरल्याप्रमाणें चांदणें दिसत होतें. एकंदरींत सर्वत्र शांत अशा त्या गांवावर पांढऱ्या शुभ्र जुईच्या फुलांप्रमाणें चंद्रप्रकाश पडला होता. गांवांतील बहुतेक सर्वांचीं भोजनें वगैरे आटोपलीं होतीं व ते दरवाजे बंद करून निजण्याच्या उद्योगांत होते. पण कोठें कोठें एखादा दुसरा निद्राहीन वृद्ध गृहस्थ अंगणांत बसून धूम्रपान करीत होता व कोठें कोठें एखादी अल्पवयस्क गृहस्थवधू घराच्या मागील तळ्यावर भांडीं घांशीत बसलेली अगर इतर कांहीं काम करीत असलेली दृष्टीस पडत होती. नैश वायु मंद मंद वाहत होता व त्याबरोबर दुरून एखाद्या शेतकऱ्याची गाण्याची लकेर ऐकू येत होती.

घरांतलें सर्व कामधाम आटोपून बिंदुवासिनी पतीची वाट पहात शयनगृहांत सचिंत बसली होती. चंद्राचे निर्मल व शीत किरण खिडकीवाटें तिच्या मुखावर व वस्त्रांवर पडले होते. सुधेच्या मनांतून आज आपल्या मेहुण्याची गंमत करावयाची होती म्हणून ती जागत बसली होती. पण अखेरीस कंटाळून ती तेथेंच चटईवर लवंडली तों तिला गाढ झोंप लागली. तो वांकाचा पेढ तिच्या ओच्यांत तसाच राहिला.

थोड्या वेळानें बाहेरचें दार वाजलें. बिंदूनें झट्कन उठून जाऊन दार उघडलें आणि हेमचंद्र घरांत शिरला.

हेमचंद्राचें वय २५ वर्षांचें होतें. त्याचा बांधा सदृढ, कपाळ उंच व प्रशस्त व चेहरा तेजःपुंज होता. पुष्कळ चालून आल्यामुळें त्याचें तोंड थोडें सुकलें होतें, अंगावर पुष्कळ धुराळा उडाला होता व पाय धुळीनें भरले होते. बिंदूनें त्यास बसण्याकरितां एक चटई हांतरली व हातपाय धुण्याकरितां पाणी व एक रुमाल आणून दिला. हेमचंद्रानें हातपाय धुतले.

बिंदु—यायला इतकी रात्र कां झाली ? अद्यापही कांहीं खाणेंपिणें नाहींना ?

हेम०—मी संध्याकाळींच आलों असतों; पण वाटेंत शेजारच्या गांवचा माझा एक मित्र भेटला, त्यानें मला आपल्याबरोबर घरीं नेलें, मग त्याच्या आग्रहावरून तेथें थोडा उपहारही करावा लागला, त्यामुळें इतका उशीर झाला. तुझें खाणेंपिणें झालें कीं नाहीं ?

बिंदु—सुधेचें जेवण होऊन ती निजली. मी जेवीन आतां. आपल्यालाही थोडी क्षुधा असेलच. मी पान वाढतें.

हेम०—मला विशेष क्षुधा नाहीं. पण थोडेंसें कांहीं तरी खाईन. आटप तर लवकर, आतां उशीर नको.

बिंदूनें लागलींच पाट मांडला व घरांतून ताट वाढून आणून बाहेर

मांडलें. हेमचंद्र फराळास बसला व ती हातीं पंखा घेऊन त्याला वारा घालीत बसली.

हेम०—बाबूकरितां औषध आणलें आहे, तें आतां द्यावयाचें नाहीं. रात्रीं उठून रडूं लागला तर मात्र द्यावयाचें. आज ज्या कामाकरितां गेलों होतों तें कांहीं चांगलेंसें झालें नाहीं.

बिंदु—काय झालें मग त्याचें ?

हेम०—काटोव्यास माझा एक परिचित वकील आहे, त्याला मी तुझ्या बापाच्या संबंधानें सर्व हकीकत समजून सांगितली.

बिंदु—मग पुढें ?

हेम०—त्यानें सांगितलें फिर्यादीशिवाय मार्ग नाहीं.

बिंदु—काकावर फिर्याद करावयाची कीं काय ? छे. त्यांनीं लहानपणापासून माझें संगोपन केलें, माझें लग्न करून दिलें आणि त्यांच्यावर फिर्याद करणें चांगलें कां ?

हेम०—लग्नासंबंधानें त्यांचे मोठेसे उपकार नाहींत. त्यावेळची हकीकत तुला माहीत नाहीं व त्याची माहिती तुला नकोही. तो तुझा चुलता एवढ्याचमुळें त्याच्यावर फिर्याद करणें योग्य नाहीं. पण करणें भाग आलें आहे.

बिंदु—तें चांगलें दिसेल का ? शिवाय आपण गरीब लोक ! फिर्यादीचा खर्च आपल्याच्यानें कसा झेंपणार ? चालला आहे असा संसार चालून दोन वेळ खाण्याची ददात नसली म्हणजे मला सर्व पावलें. आपली जी काय जिंदगी आहे ती मला कुबेराच्या संपत्तीच्या ठिकाणीं आहे.

हेम०—आपलें लग्न झालें त्यावेळीं फार दिवस आपल्याला अशा दुःखांत दिवस काढावे लागतील असें मला वाटत नव्हतें. तूं सहिष्णु, साध्वी, पतिव्रता, म्हणूनच इतके कष्ट सोसूनही नेहमीं आनंदांत असतेस. माझ्यानें तुझें दुःख पाहवत नाहीं.

बिंदूच्या डोळ्यांत पाणी आलें. ती मनांत ह्मणाली " मजसारख्या भिकारणीशीं लग्न लावून मला स्वर्गलाभाची जोड करून दिली तें ध्यानांत नाहीं वाटतें ! " व हंसत हंसत उघड ह्मणाली " असें सोन्या-सारखें घर मला मिळालें असतां मला काय कमी आहे ! बरें, पण राजाला अर्पण करण्यासारखी एक अपूर्व वस्तु पहावयाची आहे ?

हेमचंद्र हंसून ह्मणाला " पाहूं काय आहे ती वस्तु ? "

बिंदु उठून स्वैपाकघरांत गेली आणि नुकतेंच तयार करून ठेवलेलें वाटीभर आंब्याचें पन्हें घेऊन आली आणि पतीपुढें ठेवून ह्मणाली " हें एवढें पिऊन पहा पाहूं. "

हेमचंद्रानें तें चट्कन् पिऊन टाकलें आणि हांसत हांसत ह्मणाला " राजाला अर्पण करण्यासारखी ही अपूर्व वस्तु खरीच. पण हा आमच्या राज्याचा गुण नव्हे, राजराणीच्या हाताचा गुण आहे. "

थोडा वेळ थांबून हेमचंद्र पुन्हां ह्मणाला " तुझ्या चुलत्यावर फिर्याद करण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. पण तो तुझ्या बापाची सर्व इस्टेट लांबवील, दरिद्री ह्मणून आपली अवहेलना करील, तें मात्र मला खपावयाचें नाहीं. मी गरीब खरा. पण मला अन्याय खपावयाचा नाहीं. "

बिंदुः— मग एक काम करा पाहूं. ही आणखी एक दशमी ह्या ताम्या दुधाबरोबर खा ह्मणजे आंगांत जोर येईल आणि मग भांडायला कंबर बांधा.

हेमचंद्रानें ती विनंति मान्य केली आणि दुधाची व आपल्या स्त्रीच्या रंधननैपुण्याची तारीफ केली. तेव्हां बिंदु ह्मणाली " फिर्याद करण्यापेक्षां चार संभावितांच्या मध्यस्थीनें आपसांत तंटा मिटविला तर बरें नव्हे का ? "

हेम०— तेंही करून पाहिलें पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या चुलत्याचें ह्मणणें हें कीं, जमीन, इस्टेट सर्व माझी. दहा वर्षे जमीनीचा

सारा भरला मीं, पदरचे पैसे खर्चून जमीनीची मशागत केली मीं, सबब सर्व शेतेंभातें माझ्या मालकीचीं, त्यांतून मी कांहीं देखील दुसऱ्याला देणार नाहीं. तुला आणि सुधेला कांहीं रोकड रक्कम देण्याची त्याची इच्छा आहे. पण ती रक्कम ह्मणजे जमीनींच्या किंमतीच्या निम्म्यानेंही नाहीं. आपण ग़रीब ह्मणूनच तो हा असा अन्याय करतो आहे.

बिंदु—मी आपली बायको माणूस, मला ह्यांतलें कांहीं समजत नाहीं. मला वाटतें, काका जें काय खुषीनें देतील तें मुकाट्यानें घ्यावें आणि तंटा मिटवावा. किती झालें तरी काका माझे वडील. त्यांनीं लहानपणीं माझें संगोपन केलें. त्यांच्याकडे दोन जिन्नस जास्ती गेले ह्मणून काय हरकत आहे ! आणखी असें पहा, फिर्याद करायला निघालें की पैसे पाहिजेत. पैशाकरितां कर्ज काढलें पाहिजे आणि मग तें फेडायचें कसें ? समजा, खटला आपल्यासारखा झाला तरी आलेले पैसे कर्जाच्या फेडीला दिले पाहिजेत. अखेरीस आपण कफल्लक ते कफल्लकच. शिवाय काकांचें वैर संपादावयाचें तें वर. फिर्यादीचें मला फार भय वाटतें. ह्मणून मी ह्मणतें देतील तें घेऊन तंटा मिटवावा ह्मणजे झालें. मग आपल्याला जें काय योग्य दिसेल तें करावें.

हेमचंद्राचें भोजन आटोपलें. बराच वेळ विचार केल्यावर तो ह्मणाला, "तुझ्यासारखी सद्गुणी स्त्री ज्याच्या दैवीं असेल तो खराच भाग्यवान्! मीं तुझा विचार घेतल्याशिवाय वकिलाकडे गेलों ही मोठी चूक केली. तुझाच विचार मला पसंत वाटतो. बस, ठरलें. तुझे काका अनायासें घरीं आले आहेत, उद्यांच त्यांच्याकडे जाऊन मी या कामाचा निकाल लावतों व पुन्हां कधीं एखाद्या गोष्टीसंबंधानें मला कोणाच्या सल्ल्याची आवश्यकता लागली तर ह्या घरच्या बृहस्पतीचा सल्ला आधीं घेईन."

बिंदु—तर मग बृहस्पतीचा आणखी एक विचार ऐका.

हेम०—काय आहे ? बोला लवकर. मी ऐकायाला तयार आहें.

बिंदु—संध्याकाळीं काढलेल्या दुधापैकीं एक वाटीभर दूध तापवून ठेवलें आहे, तें एका घोटासरसें पिऊन टाका पाहूं.

हेमचंद्रानें बृहस्पतीच्या या दुसऱ्या सल्ल्याचेंही ग्रहण केलें.

बिंदूनें नंतर पतीला बिछाना घालून दिला आणि त्याच्या हातांत विडा देऊन बराच वेळपर्यंत ती पतीशीं संसारसंबंधीं गोष्ट बोलत बसली. बराच वेळ झाल्यावर हेमचंद्र ह्मणाला " रात्र फार झाली. तूं लवकर जाऊन आपलें जेवण आटोप. " बिंदुवासिनी स्वैपाकघरांत भोजनाकरितां निघून गेली.

चतुर्थ परिच्छेद.

प्रभातसमय झाला होता. उषादेवीनें तरुणी गृहिणीप्रमाणें सर्वांस जागृत करून आपापल्या उद्योगास लाविलें. आई ज्याप्रमाणें आपल्या मुलीला सुंदर रीतीनें सजविते त्याप्रमाणें उषादेवीनें रूप धारण केलें होतें. हास्यमुखी तरुणीच्या प्रणयलोभानें भगवान् सहस्ररश्मि उषादेवीस भेटण्याकरितां लवकर उदय पावला व आपले उज्ज्वल किरणरूपी सप्त अश्व रथास जोडून वेगानें आकाश आक्रमण करूं लागला. उषेच्या व सूर्योदयाच्या शोभेनें विस्मित होऊन चार हजार वर्षांपूर्वी ऋग्वेदांतील ऋषींनीं त्याचें फार मार्मिक व सुंदर वर्णन लिहून ठेविलें आहे. तशाप्रकारचें सरल व सुंदर सृष्टिशोभेचें वर्णन अद्यापपर्यंत तरी दुसरें कोणाकडूनही रचलें गेलें नाहीं.

हेमचंद्र प्रातःकाळीं उठला व घरांतून बाहेर गेला. प्रातःकाळचें कोवळें ऊन झाडांवर व घरांवर पडून एक अपूर्व शोभा आली होती. झाडांवर पक्ष्यांचा किलबिल ध्वनि सुरू झाला होता. तरुण स्त्रिया पहाटेस उठून, सडासंमार्जन करून, कडेवर घागरी घेऊन पाणी आणण्याकरितां व स्नान करण्याकरितां घाटावर जात होत्या. मुलें शाळेंत जाण्यास निघालीं होतीं व शेतकरी नांगर व बैल घेऊन शेतास जाण्यास निघाले होते. आपलें शेत पहावयास जाण्याच्या उद्देशानें हेमचंद्र घराबाहेर पडला होता.

छायापूर्ण अशा ग्राम्यपथाचें कांहीं वेळ आक्रमण केल्यावर हेमचंद्र एका शेतकऱ्याचे झोंपडीशीं आला. शेतकऱ्याचें नांव सनातन कैवर्त.

सनातन कैवर्ताचें एक घर होतें, त्याच्या पाठीमागें एक धान्याचें कोठार व एक गोठा होता. गोठ्यांत गाई, बैल मिळून पांच सहा गुरें होतीं. आंगणांतच चूल होती व बाजूस एक सोपा होता. पावसाळ्यांत मात्र ह्या सोप्यांत स्वैपाक होई, बाकी नेहमीं आंगणांतच. सोप्याच्या पलीकडे कांहीं कांटेरीं झाडें व त्याच्या पलीकडे जंगल. सोप्याच्या समोरच पण थोड्या अंतरावर एक खळी होती, त्यांत खत सांचवीत. गोठ्याजवळ गाडीचीं दोन चाकें व दोन नांगर पडले होते. घराच्या मागील दारीं एक अमंगळ डबकें होतें, त्यांत सनातनाची स्त्री नुसती भांडीं घांशीत होती एवढेंच नव्हे तर स्नान व कपडेधुणेंही त्यांत होत असे. पिण्याला व स्वैपाकालाही हेंच पाणी चाले.

हेमचंद्रानें दाराशीं येऊन सनातनास हाक मारली. सनातन नुकताच जागा होऊन उठण्याच्या उद्योगास लागला होता. एक दोनदां ह्या कुशीचा त्या कुशीवर झाला, त्यानें एक दोन आळोखेपिळोखे दिले व जवळ निजलेल्या सहधर्मिणीस उठण्यास उशीर केल्याबद्दल सुंदरशी गालिप्रदानाची वृष्टि करून, आळस हा मोठा दुर्गुण आहे असें व्याख्यान झोडीत असतांना हेमचंद्राची हाक त्याच्या कानीं गेली.

हाकेचा आवाज एखाद्या सभ्य गृहस्थाच्या आवाजासारखा वाटल्यावरून तो बुद्धिमान् सनातन एकदम उठला नाहीं. पुन्हां हाक—तिसरी हाक, आतां काय करावें अशा विचारांत तो पडला. अडीअडचणीच्या वेळीं अगर एखाद्या संकटसमयीं त्याला कांहीं सुचेनासें झालें ह्मणजे त्यांतून पार पडण्याकरितां तो आपल्या बुद्धिमान् गृहिणीची कास धरी त्याप्रमाणें त्यानें गृहिणीची प्रार्थना करून तिला ह्मटलें " दरवाजापाशीं कोण आलें आहे तें एकवेळ पाहून ये पाहूं ? " नवऱ्याचा गालिप्रदानाचा वर्षाव ऐकून स्वस्थ पडलेली गृहिणी पुन्हां पांघरूण घेऊन घोरूं लागली.

सनातन मोठ्या संकटांत पडला. स्वतः दाराजवळ जाऊन कोण आहे तें पाहून येण्याचें त्याला धैर्य होईना. पुन्हां त्यानें स्त्रीस एक दोन हाका मारल्या, पण व्यर्थ झालें ! असें पाहून व रागाचा मोठा आविर्भाव आणून ह्मणाला " इतका उशीर झाला, अद्याप उठायची वेळ नाहीं झाली वाटतें ? इतक्या हाका मारल्या पण ढंम नाहीं. पाठींत दोन लाथा मारल्याशिवाय झोप जायची नाहीं. "

गृहिणीनें पाहिलें कीं आतां मौन अस्त्राचा कांहीं उपयोग नाहीं, दुसऱ्या एखाद्या अस्त्राचा उपयोग केला पाहिजे. ह्मणून ती उठून बिछान्यावर बसली आणि ह्मणाली " आज झालें आहे तरी काय ? सकाळपासून माझ्या आईबापांचा उद्धार आहे. दारूबिरू जास्ती झाली वाटतें. एकदांचें मरण येईना मला ! " असें बोलून नवऱ्याकडे पाठ फिरवून पुन्हां निजली.

असा हा तीव्र वाक्प्रवाह ऐकून बिचारा सनातन घाबरून गेला, पण भित्र्याप्रमाणें त्यानें अवसान सोडलें नाहीं.

सनातन—पुन्हां निजलीस वाटतें ?

स्त्री—निजूं नको तर काय करूं ?

सनातन—घरांतलें कामधाम नाहीं कां ?

स्त्री—नाहीं.

सनातन—पाणी आणावयाचें नाहीं ?

स्त्री—नाहीं.

सनातन—भाकरीतुकडा करावयाचा नाहीं कां ?

स्त्री—नाहीं.

सनातन—ऊठ आतां.

स्त्री—नाहीं उठत.

सनातन—भाकरी कोण करील ?

स्त्री—मला नाहीं ठाऊक. मी हडळ, मी वेस्वा, मी हरामजादी,

माझा बाप हरामजादा, मला संसाराशीं काय करावयाचें आहे ? आणा तुझी दुसरी एखादी आपल्याकरितां रंभापुतळी शोधून.

सनातन—अगे ए, रागावलीस वाटतें ?

स्त्री—राग कसला आला आहे ?

असें बोलून पुन्हां पांघरूण घेऊन निजली.

सनातन हरला. त्यानें अनेक आर्जव व विनंति करून तिला उठविलें. ह्या उपायानें तिचा कोप थोडा शांत झाला व ती उठली. मनांत हांसत हांसत पण चेहऱ्यावर रागाचा आविर्भाव आणून ती ह्मणाली " बोला काय करावयाचें तें. असल्या खाष्ट माणसांचीं देखील लग्नें होतात. शिव्याशिवाय एक दिवस देखील सुना जावयाचा नाहीं. "

सनातन—शिव्या कोणीं दिल्या ! कुठें प्रेमानें हडळ ह्मटलें एवढेंच कीं नाहीं. आतां नाहीं पुन्हां ह्मणणार.

स्त्री—मला प्रेम नको आणि लाडही नको. करावयाचें काय तें सांगा लवकर ह्मणजे झालें.

सनातन—दाराशीं कोण आलें आहे तें पाहून ये. जर हा राण-सिकदार असला तर मी घरांत नाहीं असें सांग.

नंतर विधुमुखी (सनातनाची स्त्री) उठली व तिनें आपलें विशाल शरीर उभें केलें. तिचें मुख साधारण मध्यमाकार तव्यासारखें असून त्याचा वर्णही तसाच उज्ज्वल होता. तिचें शरीर रेड्यासारखें सडपातळ व पृथ्वीच्या आकाराप्रमाणें गोल होतें. मातीवर उमटलेल्या तिच्या पाव-लांचें चिन्ह पुष्कळ वेळपर्यंत आंगावर धारण करण्यांत भगवती वसुधेला मोठें भूषण वाटे. तिचें विशाल बाहुयुगुल पाहून सनातनाला वारंवार अशी भीति पडे कीं, आपल्या ह्या रमणीरत्नाच्या गाढ आलिंगनानें आपला श्वासावरोध् होऊन अपमृत्यु येतो कीं काय ? पहाणाऱ्यास नवरा उंच कीं बायको उंच हें कळण्यास थोडे प्रयास पडत, पण रुंदींत मात्र विधु-मुखीची बरोबरी करण्यास तीन सनातन घालावे लागत.

विधुमुखी दरवाज्याजवळ गेली आणि मधुर आवाजानें ह्मणाली " कोण आहे तें ? "

हेम०—मीं आलों आहें. सनातन घरीं आहे का ?

आपला धनी आला आहे असें पाहून विधुमुखी थोडी घाबरली. पण तोंडावर बुरखा ओढून ताबडतोब बाहेर आली आणि घोंगडी बसावयास टाकून तिनें सनातनास हाक मारली.

सनातन डोळे पुशीत पुशीत बाहेर आला आणि धन्यास रामराम करून नम्रपणानें ह्मणाला " आह्मांला झोंप लागली होती ह्मणून आपणाला इतका वेळ तिष्ठत बसावें लागलें. "

हेम०— तें असो, एकवेळ शेत पाहून यायचें आहे. गड्डीमाणसें कोठें आहेत तुमचीं ?

सना०—गडीमाणसें तयार आहेत. चला जाऊंच. पण आपण दमून आलां आहांत, थोडं ताजें दूध नाहीं का घेत ?

हेम०—कांहीं जरूर नाहीं.

सना०—छे, जरूर नसायला काय झालें ? थोडें घ्याच. असें बोलून तो दूध काढण्यास गेला. विधुमुखी एक कटोरा घेऊन आली.

दूध काढणें झाल्यावर विधुमुखी तोंडावर बुरखा ओढून व कडेवर एक मूल घेऊन तो दुधाचा कटोरा घेऊन आली आणि तिनें तो हेमचंद्रापुढें ठेवला. भक्तिपूर्वक अर्पण केलेल्या त्या दुधाचा हेमचंद्रानें मोठ्या प्रेमानें स्वीकार केला.

गडीमाणसांना हाक मारून व दोन नांगर व चार बैल बरोबर घेऊन सनातन निघण्यास तयार झाला व ते सर्व शेताकडे निघाले. वाटेनें जातां जातां इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर सनातन ह्मणाला " बाबूसाहेब, इतक्या दूर जाण्याचे श्रम कशाला घेतां ? मीं जमीन नांगरली आहे. थोडी उरली आहे ती आज होऊन जाईल आणि मग पेरणी करूं. आपण कशाला तसदी घेतां ? "

हेम०—अं हः, तें नाहीं उपयोगी. तूं काय केलें आहेस, काय केलें नाहींस तें मला स्वतः पाहिलें पाहिजे, ह्मणूनच सकाळीं उठून मी इकडे आलों.

सना०—त्याला काय हरकत आहे? पहा आपण. आपली जमीन ह्मणजे सोन्याचा तुकडा आहे, खूब धान्य उत्पन्न होईल. पण आपण बडे लोक, आपणाला कुळाकडूनच लागवड करविली पाहिजे. त्यांत फारसा फायदा होईलसें मला दिसत नाहीं.

हेम०—तुमच्याकडे जमीन दिल्यानें थोडाच फायदा होतो हें खरें. गतवर्षी २००।२५० मण धान्य झालें, पण तुमची वांटणी व सरकारसारा देऊन माझ्या वांट्याला १०० हून अधिक रुपये आले नाहींत.

सना०—बाबूसाहेब, अर्धलीनें जमीन द्यायचें आपण एकवेळ ह्मणाला होता. असेल इच्छा तर मजकडेच द्या. माझ्या घरचीं गडी-माणसें आहेत, आपल्या वडिलांपासून मी जमीन करतों आहें, आपल्याला कांहीं श्रम करावयाला नकोत, मी सर्व करीन आणि वर्षअखेरीस निम्में धान्य आपल्या घरीं पोंचवीन.

हेम०—बरें, पण स्वतः आपल्याकडे जमीन घेण्याचा तुझा इतका आग्रह का?

सना०—तें आपल्याला माहीत आहेच. माझी स्वतःची थोडी जमीन आपल्या शेताच्या जवळ आहे, तेवढ्यांत पोट भरत नाहीं. आपल्याकडून जी काय मजुरी मिळते त्यावर आमचा कसा तरी गुजारा होतो. आपली जमीन जर अर्धलीनें मिळाली तर तितकें बरें. आपल्यालाही खर्च कमी लागेल व मला दोन पैसे मिळून माझीं पोरेंबाळें भाकरी खातील आणि आपल्याला दुवा देतील.

हेम०—सध्यां तूं पेरणी कर, मग पाहूं पुढें काय करावयाचें तें.

अशा प्रकारें बोलत बोलत ते सर्व शेतांत येऊन पोंचले. वैशाखांतले दोन पाऊस झाले ह्मणजे सर्व जमिनीची नांगरणी सुरू

होते. शेतकरी लोक आनंदानें गात गात व बैलांना ' दादा बाबा ' अशीं संबोधनें देऊन नांगरणीचें काम करीत होते. बंगाल्यांतली जमीन मोठी सुपीक. जमीन ह्मणजे बंगालींचें सर्वस्व. शेतापाशीं आल्यावर सनातन आपली जमीन पहाण्याकरितां निघाला. पण आज देखील जमीन पाहणें जाहलें नाहीं. कारण, रस्त्यांत त्याचा सासरा तारिणीबाबू त्याला भेटला. तारिणीबाबू पूर्वदिवशीं कांहीं कामाकरितां एका खेड्यास गेले होते व आज सकाळीं घराकडे परत येत होते. हेमचंद्रानें त्यांना नमस्कार केला. त्यांनीं अशीर्वाद देऊन ह्मटलें " इतक्या सकाळीं हीं गडीमाणसें घेऊन कोठें चाललांत ? घरीं चला आतां. प्रकृति बरी आहेना ? रोज माझ्या मनांत येतें कीं तुह्माला एकवेळ घरीं बोलवावें, पण वर्धमानाहून आल्यापासून फुरसत अशी मिळतच नाहीं, शिवाय माझी तब्येतही ठीक नाहीं. बरें झालें, आयतीच गांठ पडली. तुह्मी एक दिवस सवडीप्रमाणें भोजनास या. "

हेमचंद्र सासऱ्याबरोबर परत येण्यास निघाला आणि ह्मणाला " हो, अवश्य येईन. माझ्याही मनांतून आपली गांठ घ्यावयाची होती, आपल्याशीं थोडें काम आहे. आपल्याला फुरसत असली तर आजच संध्याकाळीं येतों. "

तारिणी•—तुह्मी तर घरचेच. वेळअवेळ काय ठरवायाची त्यांत ? पाल तेव्हां मला फुरसत आहे. उमातारा सासरहून आली आहे तिनें-ही मला तुह्माला बोलावण्याचा फार आग्रह केला आहे. तर आज संध्या-काळीं भोजनासच या ह्मणजे सर्वांच्याच गांठी पडतील.

अशा प्रकारचें संभाषण करीत करीत ते दोघे गांवांत आले.

पंचम परिच्छेद.

वड्या घरच्या गोष्टी.

संध्याकाळच्या वेळीं हेमचंद्र तारिणीबाबूच्या घरीं गेला. घराच्या बाहेरल्या बाजूस एक गोठा होता. घर मोठें भव्य व प्रशस्त होतें. घरांत दोन चार अंबारें होतीं, मोठें थोरलें एक देवघर होतें व त्याच्या समोर कथापुराणांकरितां एक भव्य सभामंडप होता. तारिणीबाबूच्या घरीं मोठ्या थाटानें दुर्गोत्सव होत असे व त्यावेळीं गांवांतले सर्व लोक त्याठिकाणीं जमत. प्रतिवर्षीं दुर्गोत्सवानिमित्त तारिणीबाबू घरीं येत असे. हल्लीं कांहीं विशेष कारणाकरितां एक महिन्याची सुट्टी घेऊन वैशाखांतच बाबुसाहेब घरीं आले होते.

आज दोन वर्षें झालीं, तारिणीबाबूनें आपल्या बैठकीकरितां एक स्वतंत्र बंगला बांधला होता. हेमचंद्र आला त्या वेळीं तारिणीबाबू ह्याच बंगल्यांत रुजाम्यावर बसून धूम्रपान करीत होते व जवळ बसलेल्या चार पांच शेजाऱ्यांशीं गप्पा मारीत होते.

हेमचंद्र आल्याबरोबर बाबूसाहेबांनीं त्यास आपल्या शेजारीं बसविलें व चार कुशलप्रश्न झाल्यावर एका नोकरास बोलावून त्यास घरांत घेऊन जाण्यास सांगितलें.

घर चांगलें प्रशस्त होतें. पुढें एक आंगण होतें व तें सारवून स्वच्छ ठेविलें होतें. घराच्या मागील दारीं एक सुंदर पुष्करणी होती व तिच्या चोहों बाजूंस नारळी, पोफळी, आंबे, चिंचा वगैरे झाडें होतीं.

घरांत शिरतांच हेमचंद्रानें सासूस नमस्कार केला व तिनें आशीर्वाद देऊन त्यास घरांत नेलें. सासूचें वय सुमारें चाळीस वर्षांचें होतें. तिचें शरीर थोडें स्थूल असून बांधा ठेंगणा होता. तिच्या आंगावर चार मोठे दागिने होते, त्यानें तिच्या सौंदर्यास विशेष शोभा आली होती. तिचे ते बहुमूल्य दागिने, स्थूल शरीर, ठुमकत ठुमकत चालण्याची तऱ्हा व थोडें

गर्विष्ठपणाचें भाषण ह्यांवरून ती मोठ्या श्रीमानाची गृहिणी असावी असें पहाणारास वाटे. तिचा स्वभाव चांगला होता. बोलण्यांत जरी थोडी आढ्यता दिसे तरी तिचें भाषण मोठें मिष्ट व हास्यपूर्ण असे. स्वतःची स्तुति तिला आवडे, पण दुसऱ्याची निंदा व दुसऱ्याला विनाकारण त्रास किंवा क्लेश देणें तिला आवडत नसे.

सासू—घराशेजारीं घर असूनही यायला फुरसत होत नाहींना ?

हेम०—रोज आपली खबर कळतेच आणि गरिबीमुळें रात्रंदिवस काम असल्यामुळें तितकी फुरसत मिळत नाहीं.

सासू—बरोबरच आहे. बिंदूला लहानाची मोठी केली, तिचें लग्न करून दिलें. झालें आपलें काम. आतां कशाला फुरसत मिळेल ? गरज सरो वैद्य मरो.

हेम०—तसें नव्हे. तीही नेहमीं आपल्याबद्दल चौकशी करते व उमातारा येथें आल्यापासून तिला भेटावयास येण्याचा रोज बेत करते, पण घरच्या कामामुळें तिला फुरसतच होत नाहीं. शिवाय मुलांचीही तब्येत ठीक नाहीं. ह्मणून ह्मणतों उमातारेलाच एकवेळ आमच्या घरीं पाठविलें तर बहिणी बहिणी भेटतील व ती मुलांचीही तब्येत पाहून येईल.

सासू– अं हः, तें मात्र शक्य नाहीं. तिच्या सासरच्या माणसांना तें बिलकुल खपावयाचें नाहीं. त्यांचें घराणें ह्मणजे केवढें मोठें ! शेंपन्नास कोसांत त्यांच्या तोडीचें घराणें सांपडणार नाहीं.

हेम०—तें मला माहीत आहे.

सासू— माहीत नसायला काय झालें ? त्यांचें घराणें कोणाला माहीत नाहीं ? कोणत्याही गोष्टीचा त्यांना अभाव नाहीं. परवां वर्धमानास, ह्मणजे आमच्या घरीं नोकरी आहे तेथें, त्यांच्या एका मुलीचें लग्न झालें, दहा हजार रुपये खर्च झाले. दरवर्षीं मोठ्या थाटानें त्यांच्या घरीं दुर्गोत्सव होतो. त्या ठिकाणीं भोजन व दक्षिणा मिळाली नाहीं असा एक देखील ब्राह्मण आढळावयाचा नाहीं.

हेम०—हो, तें ठाऊक आहे.

सासू—उमाला तरी लवकर कोठें पाठवितात ? वर्षांतून दुर्गापूजेच्या वेळीं मात्र एकवेळ पाठवितात, पुन्हां नाहीं. हल्लीं पाठविली आहे ह्मणजे काय मोठ्या कष्टानें. पंधरवड्याचा वायदा आहे. पंधरवडा सरतांच परत पाठविली पाहिजे. तिच्याबरोबर देण्याकरितां कापड-चोपड, खाऊ वगैरे आणण्याकरितां वर्धमानास माणसें पाठविलीं आहेत, तीं आलीं कीं उमेची रवानगी केलीच पाहिजे. श्रीमंतांशीं सोयरीक केली ह्मणजे अस्सा खर्च करावा लागतो.

हेम०—बरें तर, मीच तिला इकडे पाठवून देतों ह्मणजे उमातारेची भेट होईल.

सासू—बिंदु ह्मणजे मला सख्या मुलीसारखी. तिला आलेंच पाहिजे. तुह्मीही वरचेवर येऊन समाचार घेऊन जात जा.

हेम०—हो हो, अवश्य. उमातारा किती दिवसांनीं जाणार ?

सासू—किती दिवसांनीं कसली ? वर्धमानाहून माणसें आलीं कीं जाणार. मोठ्याच्या घरीं मुलगी दिली, बरोबर कांहीं दिलें पाठविलें नाहीं तर चांगलें दिसतें कां ?

हेम०—नाहींच दिसावयाचें.

सासू— जशी सोयरीक तसा व्यवहार केला पाहिजे. नाहींतर लौकिकांत चांगलें दिसत नाहीं. शिवाय आमचाही लौकिक मोठा, तेव्हां लौकिकाप्रमाणें करणें भाग आहे. तुमचीं मुलेंबाळें खुशाल आहेत ना ?

हेम०—पांच सात दिवस झाले मुलाला रात्रीं ताप येतो. काल मीं औषध दिलें त्यानें तब्येत थोडी बरी आहे.

सासू—औषध दिलें हें चांगलें केलें. बिंदूची देखील लहानपणीं अशीच तब्येत. पण मुलगी इतकी शांत व सद्गुणी कीं कधीं वर मान करून पाह्यची नाहीं कीं कांहीं मागायची नाहीं. मी ह्मणजे तिचा जीव

कीं प्राण. तिचा बाप मेल्यापासून तिच्या आईचें सचिंत चित्त असे, यामुळें बिंदु व सुधा यांची काळजी घेण्यास मजशिवाय दुसरें कोणी नव्हतें. जशी माझी उमातारा तशीच बिंदु. सुखी असो बिचारी! तिला एकवेळ पाठवून द्याच.

हेम०—अवश्य पाठवीन.

सासू— गेल्या दुर्गापूजेच्या दिवशीं बिंदु आली होती, पण त्याच दिवशीं परत गेली. यंदां मात्र तसें चालावयाचें नाहीं. उत्सवसमाप्ती-पर्यंत राहून घरचें काम केलें पाहिजे. उत्सवांत कामाचा रगाडा कसा असतो तो तुह्मांस माहीत आहेच. सर्व पंचक्रोशींतले लोक उत्सवास जम-तात. पहाटे तीन वाजेपासून चूल पेटलेली असते ती रात्रीं दहा वाजेपर्यंत धबडगा चाललेला असतो.

हेम०— तें मीं पाहिलें नाहीं कीं काय? दरवर्षीं पाहतों. आपल्या येथील उत्सवाची धामधुम सर्वांना माहीत आहे.

सासू— पूर्वापार चालीप्रमाणें सर्व यथासांग झालें पाहिजे. अनु-कूलता नसती तर वेगळी गोष्ट. या गांवांत सर्वांच्या घरीं का उत्सव होतो? नाहीं. पण त्यांना कांहीं कोणी ह्मणत नाहीं. पण आमच्या घरीं हा पिढीजात कुळाचार आहे. तेव्हां हा अवश्य पाळलाच पाहिजे.

हेम०— तें बरोबर आहे.

त्या दिवशीं सध्याकाळीं हेमचंद्राला मल्लिकाच्या घराण्याचा इतिहास, त्यांच्या दौलतीचा इतिहास, त्यांच्या व्याह्याचा घराण्याचा इतिहास वगैरे पुराण किती वेळ ऐकावें लागलें तें आह्माला माहीत नाहीं. एवढें मात्र माहीत आहे कीं कांहीं वेळ हें वक्तृत्व ऐकल्यावर हेमचंद्राचे डोळे (कदाचित् कामाच्या दगदगीमुळें असेल) मिटूं लागले व भाषण काय चाललें आहे तें स्पष्टपणें न कळतां मध्यें मध्यें उगीच 'तें बरोबर आहे,' 'यांत काय संशय?' वगैरे ठरीव वाक्यें सासूला बरें वाटण्याक-रितां तो उच्चारीत असे. प्रहर रात्र झाली; इतक्यांत झमझम असा

आवाज कानीं आला. धनपूरच्या धनेश्वराची सून ह्मणजे उमातारा त्या ठिकाणीं आली.

उमातारा अतिशय गोरी व सुस्वरूप होती. आंगावरच्या सोन्या-मोत्याच्या दागिन्यांनीं तिचें सौंदर्य विशेषच खुललें होतें. त्या ठिकाणीं येतांच एकदम आश्चर्य वाटल्यासारखें करून उमातारा ह्मणाली "केवढें भाग्य माझें हें ! आज उठल्याबरोबर कोणाचें तोंड पाहिलें होतें न कळे".

हेम०—माझें भाग्य. भाग्य नसतें तर तुझी भेट होती कां ?

उमा०—समजलें तें सर्व. आज मला येऊन दहा दिवस झाले, इतक्या दिवसांत एकदां तरी भेटायला यायचें होतें ? बरें तें असो. तब्येत ठीक आहे ना ? बिंदुताई बरी आहे ना ?

हेम०—हो बरी आहे. तुझी तब्येत चांगली आहे ना ?

उमा०—आहे. पण आज काय उद्देशानें इकडे येणें केलें ? इतका वेळ येथें थांबल्याबद्दल बिंदुताई रागावायची तर नाहीं ना ?

हेम०—तुला भेटायला येण्याचें किती दिवसांपासून तिच्या मनांत आहे, पण फुरसतच होत नाहीं. कांहीं असो, उद्यां परवां तिला येथें पाठवितोंच.

उमा०—मग उद्यांच पाठवा. पाठवाल ना ?

हेम०—उद्यांच येईल. ती देखील तुला भेटायला फार उत्सुक झाली आहे. तूं सासरीं असतांना नेहमीं तुझ्या आईजवळ ती तुझा समाचार विचारते.

उमा०—तें मला माहीत आहे. लहानपणापासून आमचें एकमेकांवर भारी प्रेम. एक क्षण जरी आह्मी एकमेकांच्या दृष्टिआड झालों तरी आह्मांला करमत नसे. निरंतर आह्मी एकत्र राहूं असे लहानपणीं विचार करीत होतों. पण लहानपणचे विचार कधीं सिद्धीस गेले आहेत कां ? मनांतले विचार मनांतच राहिले. पण उद्यां मुलांसुद्धा बिंदुताईला पाठवून द्याच.

हेम०—पाठवीन, खास पाठवीन.

उमातारेला अतिशय आनंद झाला. बापाच्या द्रव्यतृष्णेनें, आईच्या श्रीमंतीच्या अभिमानानें व स्वतःच्या सासरच्या श्रीमंतीनें उमातारेचें लहानपणचें आपल्या बहिणीवरचें प्रेम किंचितूही कमी झालें नव्हतें हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. धनपूरच्या धनेश्वरवंशाच्या पुत्रवधूचें सौंदर्य व श्रीमंती पाहून तिच्या स्वभावासंबंधानें आह्मांला थोडी शंका पडली होती, पण वरील संवादावरून ती दूर झाली. मग इकडच्या तिकडच्या कांहीं गोष्टी झाल्यावर उमातारा ह्मणाली "उठा तर आतां, इतक्या दिवसांनीं आमच्या घरीं आलां तर फराळ करून जा. घरांत फराळाची तयारी आहे."

इतकें बोलून उमातारा घरात जावयास निघाली. हेमचंद्रही तिच्या पाठोपाठ निघाला. स्वैंपाकघरांत जाऊन पहातो तों तेथें पान वाढून तयार होतें. पानाशेजारीं दोन शामदानें लाविलीं होती. पानावर नानातऱ्हेचीं पक्वान्नें व पानाच्या उजव्या बाजूला निरनिराळे पदार्थ रुप्याच्या वाट्यांत भरून ठेविले होते. पानावर एक रुप्याचें ताट ठेवलें असून त्यांत भाताची मूद व वर उत्कृष्ट वरण वाढलें होतें. असला अपूर्व भोजनसमारंभ हेमचंद्रानें पाहिला नसल्यामुळें तो थोडा गोंधळून गेला.

उमातारा ह्मणाली "करा आरंभ आतां, आमच्या गरिबाच्या घरची मीठभाकरी गोड करून घ्या."

मेहुणीशीं नानाप्रकारची थट्टामस्करी व विनोद करीत हेमचंद्र भोजन करूं लागला. ज्या वर्षी बिंदूचें लग्न झालें त्याच्या पुढल्या वर्षी उमातारेचें लग्न झालें. उमातारा अतिशय सुंदर व गौरवर्ण, पण हेमचंद्राच्या मतें बिंदूचे नेत्र अधिक पाणीदार व चेहरा अधिक तेजःपुंज. हेमचंद्राचें मत पक्षपाताचें असूं शकणार, ह्मणून त्याची साक्ष आपल्या उपयोगी नाहीं. गांवांतील लोक ह्मणत कीं बिंदु काळी व उमा

गोरी आणि ह्मणूनच ती एवढ्या श्रीमंताच्या घरीं पडली. मुलगी सुंदर असल्याशिवाय धनपूरच्या जहागिरदाराच्या मुलानें तिला पसंतच केली नसती. ती सुंदर ह्मणूनच तिला तें स्थळ मिळालें.

एवढ्या मोठ्या घराण्याशीं संबंध केल्यामुळें तारिणीबाबूला व त्याच्या पत्नीला अनेक त्रास सोसावे लागत. बरोबरच आहे. श्रीमंताच्या लाथाबुक्क्या देखील खातील, पण गरिबाचा एक शब्द देखील सोसणार नाहींत.

मोठ्या घराण्याशीं संबंध जोडल्यामुळें तारिणीबाबूचें थोडें प्रस्थ वाढलें होतें. बड्या लोकांमध्यें त्याची गणना होऊं लागली होती. इतका फायदा झाल्यावर सोयऱ्याच्या घरांतल्या लोकांचे दोन वेडेवांकडे शब्द अगर थोडासा त्रास कोण सोसणार नाहीं ?

उमातारेला श्रीमंतीचें सुख मिळालें हें खरें, पण इतर सुख तिला मिळालें कीं नाहीं हें आह्मांला माहीत नाहीं. पण ह्या कथानकांत जर आपली कधीं धनपूरच्या जहागिरदाराच्या मुलाशीं गाठ पडली तर कळेल. एवढें मात्र आह्माला माहीत आहे कीं जहागीरदाराचा मुलगा जसजसा वयांत येऊं लागला तसतशी त्याची रूपलालसा वाढत जाऊन चोहोंकडे फांकूं लागली. जाऊं द्या तें. आपल्याला काय श्रीमंताशीं करावयाचें आहे ? आपण गरिबाची हकीकत लिहीत आहों.

उमातारेच्या सासरीं तिला अनेक त्रास सोसावे लागत. गरिबाची मुलगी ह्मणून तिला सर्वांचीं बोलणीं सोसावीं लागत. पण आंगभर दागिने असले ह्मणजे सर्व त्रास सोसण्याचें सामर्थ्य येतें. सोनें व जवाहिर पाहिलें कीं मनांतल्या अनेक दुःखांचा ऱ्हास होतो असें वाटतें. ह्या शास्त्रांत आमची विशेष गति नाहीं. कारण, सोनें व जवाहिर आमच्या फारसें दृष्टीस पडलें नाहीं. हिऱ्याच्या तेजानें मनाचें मालिन्य किती दूर होतें हें ठरविणें हें त्या त्या शास्त्रां-

तील निष्णातांचें काम आहे. उमातारिशीं अनेक तऱ्हेचें संभाषण करितां करितां व अलंकारांनीं भूषित अशा तिच्या शरीराकडे वारंवार पहातां पहातां हेमचंद्र अगदीं गोंधळून गेला, इतकें मात्र आह्मी सांगूं ! तिच्या त्या रत्नविभूषित कपाळावर व हरिणीप्रमाणें विलोल नेत्रांवर या वयांतच चिंतेची छाया त्याला दिसून आली. मग खरोखर ही चिंतेचीच छाया होती कां वायूनें हलणाऱ्या समोरच्या त्या शामदानाच्या चंचल प्रकाशाची ती छाया होती ?

षष्ठ परिच्छेद.

कामाकाजाची हकीकत.

फराळ आटोपून हेमचंद्र तारिणीबाबूच्या बैठकखान्यात आला, त्या ठिकाणीं तारिणीबाबू दिव्यापाशीं एक कागद वाचीत बसला होता. त्याचें शरीर स्थूल, वर्ण कृष्ण, नेत्र लहान परंतु पाणीदार, डोक्यावर टक्कल व डोक्याचे कांहीं केंस पिकलेले होते. त्याच्या आचारव्यवहारांत डौल व गर्व नसे. कारण, जे अर्थसंचय करणारे त्यांच्याजवळ डौल व गर्व नसावयाचाच. ते सर्व चाळे आयत्या पैशांवर चैन करणाऱ्यांना सुचावयाचे. हेमचंद्र आलेला पाहून तारिणीबाबूनें हातांतला कागद खालीं ठेवला आणि चष्मा काढीत काढीत तो ह्मणाला " या जावईबोवा बसा. " हेमचंद्र त्याच्या शेजारीं बसला.

इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर हेमचंद्रानें आपल्या कामाच्या गोष्टीचा प्रस्ताव केला.

हेम०—फार दिवसांनीं आपली भेट झाली, मोठा आनंद झाला. आपली अनुमति असेल तर कांहीं कामासंबंधानें आपणाला विचारीन ह्मणतों.

तारिणी०—अनुमति कशाला पाहिजे? काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा.

हेम०—माझ्या सासऱ्याच्या जमिनीसंबंधानें मी कांहीं विचारणार आहें.

तारिणी०—विचारा, खुशाल विचारा.

हेम०—त्या जमिनीची पूर्वीपासूनची काय हकीकत आहे ती आपणांला माहीत असेलच.

तारिणी०—हो, माहीत आहे. हरिदासाच्या बापाच्या पूर्वी त्याचा बाप त्या जमिनीची लागवड करवीत असे. हरिदासाचा आजा तो माझाही आजाच. त्यावेळीं मी लहान होतों, पण ती गोष्ट माझ्या पक्की ध्यानांत आहे. आजोबा वारल्यावर आमचे वडील सर्व जमिनीची लागवड करवूं लागले. हरिदासाचा बाप वडील मुलगा पण तो व्यवहारचतुर नसल्यामुळें आमच्या वडिलाकडेच जमिनीची सर्व व्यवस्था आली. पुढें हरिदासाचा बाप विभक्त झाल्यावर त्याच्या चरितार्थाकरितां आमच्या वडिलांनीं त्याच्याकडे कांहीं बिघे जमीन लागवडीकरितां दिली इतकेंच. ही सर्व हकीकत तुह्मांला माहीत नाहीं असें वाटतें आणि असणार तरी कोठून? तुह्मी त्यावेळीं लहान होतां.

हा सर्व कोटिक्रम ऐकून हेमचंद्राला आश्चर्य वाटलें व हंसूं आलें. पण आज काय तो सोक्षमोक्ष झाल्याशिवाय येथून उठावयाचें नाहीं असा मनाचा निश्चय असल्यामुळें हेमचंद्रानें आपलें हंसणें दाबलें आणि तो ह्मणाला "पूर्वीची हकीकत माझ्यापेक्षां आपणांला जास्त माहीत आहे यांत संशय नाहीं. पण माझें एवढेंच विचारणें आहे कीं, आमच्या सासऱ्याकडे जी जमीन होती तिजवर त्यांच्या गरीब मुलींचा कांहीं हक्क आहे कीं नाहीं?"

"एवढ्या लहान वयांत बिचारी बिंदु आईबाप नाहींसे होऊन पोरकी झाली हा विचार मनांत येतांच काळीज फाटून जातें. आज जर तिचा बाप असता तर अशा सोन्यासारख्या जावयाची व तिची अवस्था अशी कां होती? व मला इतके पैसे खर्च करून त्याच्याकडची जमीन

आपल्या ताब्यांत कां घ्यावी लागती ? असो. परमेश्वराची इच्छा ! हरिदास गेला यामुळें सर्व भार मजवर येऊन पडला. त्याजकडची जमीन आपल्या ताब्यांत घेण्याला मला जितका खर्च आला त्या मानानें फायदा नाहीं. पण करावयाचें काय ? वडिलार्जित जमीन आपल्या डोळ्यांदेखत दुसऱ्याच्या घरांत तर घालवावयाची नाहीं ना ? ''

हेम०— एकुण मग त्यांच्या मुलींना त्या जमिनीपासून कांहीं मिळण्याची आशा नाहीं तर ?

तारिणी०—आशा कसली ? आह्मी आपलीं ह्मातारीं जुनीं माणसें, तुह्मी नवे तरणे शिकलेसवरलेले लोक, सर्व हकीकत सांगितल्याशिवाय तुह्मांला तरी कसें कळणार ? जशी माझी उमा तशीच बिंदु. जोंपर्यंत माझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत उमा व बिंदु ह्या दोघींत मला मुळींच भिन्न भाव नाहीं. यांत काय तें समजा. मग आशा कसली आणि निराशा कसली ?

हेमचंद्राला तारिणीबाबूचा कावा कळून आला. नंतर इकडच्या तिकडच्या पुष्कळ गोष्टी झाल्यावर हेमचंद्र पुन्हां एकवेळ ह्मणाला "आपल्याला राग येणार नसला व आपली अनुमति असेल तर आणखी एक गोष्ट विचारावयाची आहे. "

तारिणी०—खुशाल विचारा, तुह्मी माझ्या मुलासारखे. तुमच्यावर राग कसला ?

हेम०—आमचे सासरे आपल्या हयातींत ज्या जमिनीची वहिवाट करीत होते ती त्यांच्याकडे खंडानें होती असें मला नाहीं वाटत.

तारिणी०—कशाला वाटेल ? तुह्मी शिकलेसवरलेले लोक, तुमची खात्री ब्रह्मदेवाच्यानेंही होणार नाहीं. अलीकडच्या मंडळींचें भावाभावांशीं देखील पटत नाहीं, तुमची गोष्ट काय सांगावी ? आह्मी आपले जुन्या काळचे लोक, एकत्र राहणें आह्मांला आवडतें, आमचे वाडवडील करीत आले तें सोडावयाचें नाहीं. माझा भाऊ हरिदास आज असता तर ही

सर्व जमीन मल्लिकघराण्याची असून तिचे हिस्से करतां यावयाचे नाहींत हें सांगतां, पण आतां तें काय कामाचें ?

हेम०—ती जमीन खंडानें असो कीं कशी असो, मला वाटतें आमचा त्यावर थोडा तरी वारसा पोंचतो. आमच्या श्वशुराकडे जी जमीन होती ती माझ्या स्त्रीच्या नांवें मीं वहिवाटीस घेतली तर आपल्याला मान्य आहे कां ?

तारिणीबाबू बिलकुल न रागावतां किंचित् हांसून ह्मणाला " तुह्मी स्वभावतः बुद्धिमान् शिवाय शिकलेले असे असून असें कसें ह्मणतां ? पिढीजात चालत आलेली मल्लिक घराण्याची जमीन विभक्त कशी करतां येणार ? तसें करतां आलें असतें तर जमिनीच्या किंमतीच्या दसपट पैसे खर्च करून ती मीं आपल्या ताब्यांत कशाला घेतली असती ? ह्मणून ह्मणतों कीं, या सर्व गोष्टींचा विचार करून मग काय तें विचारा. अशी असंगत गोष्ट विचारल्यावर मी उत्तर तरी काय देणार ? अरे हरि, एक चिलीम भरून आण पाहूं. रात्र बरीच झाली. कालरात्रीं चांगली झोंप आली नाहीं व आज आंगही थोडें कणकण करताहे, तर लवकर निजावें आतां.

हेमचंद्राला थोडा राग आला. पण त्यानें विचार करून पाहिलें कीं, आपण ह्मणत होतों ती गोष्ट असंगत खरीच. कारण, तारिणीबाबूसारख्या बड्या गृहस्थानें दहा वर्षें ज्या जमिनीचा उपभोग घेतला ती जमीन त्याला सोडायला सांगणें ह्मणजे असंगत नव्हे का ? क्षणभर स्तब्ध राहून हेमचंद्र पुन्हां ह्मणाला " आपली जर निजायची वेळ झाली असली तर आपली अधिक खोटी करूं इच्छीत नाहीं. आपली अनुज्ञा असेल तर एकच प्रश्न विचारतों आणि जातोंच. "

तारिणी०—अशी उतावळी का ? इतक्या दिवसांनीं तुमची भेट झाली, मोठा आनंद झाला. जाण्याची इतकी घाई का ? या उन्हाळ्यामुळें आंग कचकच करताहे इतकेंच. मला निजायला जायला अद्याप

अवकाश आहे, तुह्मांला विचारावयाचें असेल तें सर्व खुशाल विचारा.

हेम०—ती जमीन सोडण्याचा आपला इरादा नाहीं हें मला पूर्वींच कळलें आहे, पण त्याबद्दल आह्मांला कांहीं मोबदला मिळेल का ? त्यासंबंधानें सरकारदरबार न करितां आपसांत हें प्रकरण मिटवावें अशी माझी फार इच्छा आहे. सरकारांत हें प्रकरण गेलें तर आमचा हक्क शाबीत होईल कीं नाहीं ह्याचा आपणच विचार करा. पण माझी तशी बिलकुल इच्छा नाहीं.

हेमचंद्र मोठा करारी मनुष्य आहे. त्यानें मनांत आणलें तर सरकार-दरबाराचा तो प्रसंग आणील आणि ह्याकरितां तो वकिलाची सल्लामसलत विचारतो आहे आणि तसें झालें तर त्याचा परिणाम काय होईल हें तारिणीबाबूला माहीत होतें. सबब आपसांत हें प्रकरण मिटविण्यास तो फारसा नाखुष नव्हता. कांहीं थोडीशी रक्कम देऊन हरिदासाच्या जमिनीचें स्वामित्व खरेदी करण्याचें आपलें मत त्यानें पूर्वींच व्यक्त केलें होतें, पण ती रक्कम फारच कमी होती.

तारिणी०—सरकारदरबारांत जाण्याचा तुमचा विचार असला तर मलाही तोच मार्ग स्वीकारावा लागेल. पण तें अतिशय खर्चाचें काम. वडिलार्जित जमीन आपल्या हातून न जाऊं देण्याबद्दल वाटेल तो खर्च करण्यास मी समर्थ आहें. पण तुमच्याच्यानें तो खर्च झेंपेल कीं कीं नाहीं ह्याचा तुह्मीच विचार करा. तेव्हां तो मार्ग सोडून देऊन आपसांत ह्या प्रकरणाचा निकाल लावावयाचा असेल तर उचलून दोन पैसे बिंदूला द्यायला मला वाईट का वाटेल ? आह्मी आपले मूर्ख मनुष्य. तुमच्याप्रमाणें कायदेकानूंची आह्मांला माहिती नाहीं. पण नोकरी करतां करतां माझा जन्म गेला. शेंकडों मोकद्दमे पाहिले. मोकद्दमा करून मल्लिक घराण्याच्या वडिलार्जित जमिनीचा कांहीं हिस्सा सोडावा लागेल असें मला वाटत नाहीं. इच्छा असेल तर करून पहा. पण तो विचार सोडून देऊन मला न दुखवितां काम करून घेण्याची

इच्छा असेल तर शिस्तीनें बोला, मी तें मान्य करीन. हें पहा मी फार सांगत नाहीं, एकच गोष्ट सांगतों ती ही कीं, त्या सर्व जमिनीच्या स्वामित्वाबद्दल तीनशें रुपये मी देतों. माझ्यासारख्याला तीनशें रुपयांची रक्कम ह्मणजे हलकी नाहीं, डोक्याचा घाम काढावा लागेल, पण बिंदु माझ्या मुलीसारखी, तिला लहानाची मोठी केली, तिचें लग्न केलें, तिच्याकरतां ह्मणूनच इतकी तरी रक्कम द्यावयाची, नाहीं तर काय ह्मणून ? हें जर मान्य असेल तर पहा. नसेल मान्य तर तुह्मांला योग्य दिसेल तें करण्यास तुह्मी मुकत्यार आहां.

हेम०—तीनशें रुपये ह्मणजे फारच कमी होतात. त्या जमिनीचें सालिना उत्पन्न दोनशें रुपयांचें आहे.

तारिणी०—त्यांत लागवडीचा खर्च, सरकारसारा व मजुरीचा खर्च वगैरे वजा जातां बाकी काय उरतें ह्याचा हिशेब केला आहे का ?

हेम०—थोडें उरतें खरेंच.

तारिणी०—त्या जमिनीप्रीत्यर्थ मला किती खर्च करावा लागला आहे ! माहीत आहे का ?

हेम०—तें माहीत नाहीं.

तारिणी०—तर मग तीनशें रुपये कमी होतात का जास्ती होतात हें कसें समजतें ? हें पहा, आतां जास्त बोलण्याची आवश्यकता नाहीं. माझें वचन एक, ह्याहून जास्ती मला देतां येत नाहीं. तीनशेंवर एक रुपया जरी मागितला तरी मी देणार नाहीं. मीं सांगितलेलें मान्य नसेल तर तुह्माला योग्य दिसेल तो मार्ग स्वीकारा.

हेमचंद्रानें मनाशीं थोडा वेळ विचार केला. इतकी थोडी रक्कम घेऊन जमिनीवरचा हक्क सोडण्याचें त्याच्या जिवावर आलें, पण स्त्रीचा सदुपदेश मनांत आणून तो ह्मणाला " कृपा करून आपण जें काय द्याल तें मला कबूल आहे. "

तारिणीबाबूचें स्वाभाविक प्रसन्न मुख आतांपर्यंत थोडें म्लान झालें

होतें, तें हेमचंद्राच्या उत्तरानें पुन्हां प्रफुल्लित झालें आणि तो मोठ्या आनंदानें ह्मणाला " माझें ह्मणणं तुह्मी मान्य कराल हें मला माहीतच होतें. तुमच्यासारखा समजुतदार मनुष्य आजकाल विरळा. तुमची परीक्षा केल्याशिवाय कां मीं बिंदु तुह्माला दिली ? तुह्माला कलकत्त्यास पाठशाळेचें शिक्षण मिळालें. पाठशाळेचें शिक्षण मिळालेलीं मुलें समजुतदार व हुशार असावयाचीं नाहींत तर काय खेडेगांवचीं उनाड मुलें असतील ? आज तुमची भेट झाल्यानें मला किती आनंद झाला आहे तो सांगतां येत नाहीं. अरे हरि, जावईबोवाकरितां दोन विडे आण पाहूं. "

हेम०—नको आतां, आपली निजावयाची वेळ झाली. मी जातोंच.

तारिणी०–निजायची वेळ इतक्यांत कोठली ? बारा वाजल्याशिवाय मला झोंप येत नाहीं. शिवाय काल रात्रीं खूप झोंप घेतली आहे, त्यामुळें आज लवकर झोंप यायची नाहीं.

हेमचंद्र थोडा हंसला, पण कांहीं बोलला नाहीं.

तारिणी०—इतक्या दिवसांनीं तुह्मी आलेले, तुह्मांला जायला सांगून का झोंप घ्यावयाची ? हें पहा, सांगितलेली रक्कम घेऊन एक पावती लिहून द्या. बाकी तुमच्यासारख्याजवळून पावती घेण्याची कांहीं आवश्यकता नाहीं, तुमचा शब्द ह्मणजेच पावती आहे, पण चाल आहे ह्मणून घ्यायची इतकेंच.

हेम०—कोणतेंही काम चालीप्रमाणें केलें ह्मणजे चांगलें.

तारिणी०—ह्मणूनच सुचविलें. तुह्मी शिकलेले लोक, तुह्माला हें सुचविण्याची आवश्यकता नाहीं. आणखी असें पहा, तुह्मी पावती द्याल तशीच बिंदूकडूनही एक पावती द्या व त्यावर तुमची साक्ष घाला ह्मणजे कागद रजिष्टर करण्याची जरूर नाहीं, पण पद्धत आहे.

हेम०—अवश्य, मी आपली साक्ष घालतों व कागदही रजिष्टर करतों. ह्यासंबंधानें जें जें कांहीं अवश्य कर्तव्य असेल तें तें सर्व करण्यास माझी हरकत नाहीं.

तारिणी०-हें तुह्माला सांगायला का पाहिजे ? हा कागद करायचा ह्मणजे स्टांपाचा खर्च, रजिष्टरीचा खर्च, रजिष्टरकचेरींत जाण्यास गाडीखर्च वगैरे मिळून १० रुपयांहून कमी रुपये पुरणार नाहींत. वास्तविक ह्मटलें तर हा खर्च मीं बिंदूवर पाडूं नये, पण तीनशें रुपयांची रक्कमच मला डोईजड झाली आहे, ह्मणून निरुपाय आहे.

हेमचंद्र हंसला आणि मनांत ह्मणाला ' एकाद्या मैफलींत सहज ह्यांचे शंभर रुपये उडतात पण दहा रुपयांत माझा महिन्याचा प्रपंच भागतो. ' नंतर उघड ह्मणाला " त्यालाही माझी कांहीं हरकत नाहीं."

तारिणी०—तुमच्यासारख्या समजूतदार मनुष्याची समजूत पाडणें कठीण का आहे ?

याप्रमाणें त्या व्यवहारचतुर तारिणीबाबूनें सर्व गोष्टीं आपल्या मनाप्रमाणें कबूल करून घेतल्या आणि त्या भाबड्या हेमचंद्रानेंही त्याला कांहीं हरकत घेतली नाहीं. अशा रीतीनें दीड प्रहर रात्र होईपर्यंत हेमचंद्राची वारंवार प्रशंसा करून व वर्धमानास लवकरच एक मोठी नोकरी लावून देण्याचें आश्वासन देऊन तारिणीबाबूनें हेमचंद्रास निरोप दिला. हेमचंद्रही सासऱ्याला धन्यवाद देत घरीं आला.

तारिणीबाबू व हेमचंद्र ह्यांचें बाह्योपचारीं गोडगोड भाषण झालें खरें, पण त्यांच्या मनांतली अढी कांहीं दूर झाली नाहीं. घरीं येतांना हेमचंद्र मनाशीं ह्मणाला ' प्रख्यात शायलॉक ज्यू देखील ठरावांत कांहीं सूट देईल. पण ह्या श्रीमंत व प्रख्यात तारिणीबाबूकडून एक पैचीही सूट मिळणार नाहीं. ' तारिणीबाबूही आपल्या बिछान्यावर पडून आपल्या गृहिणीला ह्मणाला " आजकालच्या पोरांची अक्कल पहा कशी आहे ती ? आपला हेमचंद्र माझ्यावर फिर्याद करायला निघाला आहे. लाज नाहीं वाटत असें बोलायला ? जाईल लवकरच धुळीचे दिवे खात. " गृहिणीनें हें भाषण मुळींच ऐकलें नाहीं, ती एका सुखस्वप्नांत निमग्न होती.

सप्तम परिच्छेद.

लहानपणचा मित्र.

दीड प्रहर रात्र उलटून गेल्यावर हेमचंद्र घरीं आला आणि पाहतो तों आपली गृहिणी आपल्या वाटेकडे डोळे लावून बसलेली आहे. पति दृष्टीस पडतांच बिंदूच्या तोंडावर आनंदाची छटा चमकूं लागली व हंसत हंसत पतीस ह्मणाली " आपल्याला घराची आठवण झाली हें भाग्यच समजावयाचें. मला वाटलें घराचा रस्ता चुकलाबिकला कीं उमातारेशीं बोलतां बोलतां घरीं जाण्याची शुद्धच राहिली नाहीं. "

हेम०—इतका रोष कां ? रात्र फार झाली कीं काय ?

बिंदु (हांसून) छे, फार रात्र कोठली ? संध्याकाळपासून आपला एक स्नेही आपली वाट पहात बसला आहे.

हेम०—कोण ? कोण आला आहे ?

" आंत येऊन पहा ना. " असें ह्मणून बिंदु घरांत गेली व हेमचंद्र तिच्या मागून गेला.

घरांत जातांच एक गौरवर्ण तरुण पुरुष हेमचंद्राच्या दृष्टीस पडला. तो कोण हें प्रथम हेमचंद्रानें ओळखिलें नाहीं. हें पाहून बिंदु हंसूं लागली. थोडा वेळ गेल्यावर हेमचंद्र ह्मणाला " काय शरत् ! तूं कलकत्त्याहून केव्हां आलास ? तुझ्यांत किती बदल झाला आहे ! तुला मीं कालीतारेच्या लग्नांत पाहिलें होतें. त्यावेळीं तूं वर्धमानास शिकत होतास. तेव्हां तूं सात आठ वर्षांचा असशील. आतां चांगला पुरुष झाला आहेस; दाढीमिशा देखील आल्या; कसा तूं ओळखतां येणार ?

शरत्—नऊ वर्षांत पुष्कळ फरक होईल यांत शंका कसली ? माझ्या आक्का (कालीतारा) चें लग्न झाल्यावर लवकरच बाबा वारले. नंतर माझी आई माझ्या शिक्षणाकरितां वर्धमानास येऊन राहिली.

त्यामुळें गांवीं येणें झालें नाहीं. माझी प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर मी कलकत्त्यास गेलों व आई परत येथें येऊन राहिली. त्यामुळें या सुट्टींत येथें आलों. नऊ वर्षांत माझ्यांत पुष्कळ फरक दिसला यांत नवल कसलें ? तेव्हां मी काय पहात होतों आणि आतां काय पहातों आहे ! बिंदु माझ्यापेक्षां सारी दोन वर्षांनीं मोठी. लहानपणीं ती आणि मी एकत्र खेळत असूं, मी मल्लिकांच्या घरीं जाई अगर बिंदु सुधेला घेऊन आमच्या घरीं येई व नंतर आह्मी परसांत जाऊन पेरू पाडून खात असूं. तीच बिंदु आज गृहिणी होऊन दोन मुलांची आई झाली आहे.

बिंदु हंसत हंसत ह्मणाली " तूं बोलूं नकोस अगदीं. लहानपणच्या तुझ्या दांडगाईनें व खोड्यांनीं आंबराईतल्या आंब्यांना फल राहत नसे आणि आतां मोठ्या पांडित्याच्या गोष्टी सांगतो आहेस. त्यावेळीं तुझ्यासारखा व्रात्य मुलगा तूंच होतास. "

शरत्—तें देखील तुझ्याचकरितां. तुझी चुलती तुला हिरवे आंबे खाऊं देत नसे, ह्मणून मी संध्याकाळीं चोरून तुला आणून देत असे कीं नाहीं सांग पाहूं !

हेमचंद्र मोठ्यानें हंसला आणि ह्मणाला " परस्परांचें गुणवर्णन पुरें. मला सर्व माहीत आहे. मी देखील कधीं कधीं तुमच्या घरीं येत असे. त्यावेळीं सुधा ४।५ वर्षांची होती. सुधे, तुझी आक्का तुला कडेवर घेऊन घोषांच्या घरीं जात असे तें आठवतें कां ? शरत्‌ची आठवण आहे कां ? "

सुधा–शरत्‌ची थोडी थोडी आठवण आहे, माझी आक्का स्वतः पेरू पाडून खात असे, पण मला पाडतां येत नसल्यामुळें शरत्‌बाबू मला कडेवर घेऊन पेरू पाडून देत असे.

हेमचंद्रानें पत्नीस विचारलें " सर्वांचीं जेवणींखाणीं झालीं ना ? शरत्‌चें जेवण झालें कीं नाहीं ? "

शरत्—हो झालें. बिंदूनें आज कच्च्या आंब्याचें पन्हें करून वाढलें. तसलें पन्हें मीं कधींही खाल्लें नाहीं.

बिंदु---आपण लहान असतांना झाडाखालीं हिंडून आंबे पाडीत होतों तेव्हां नाहीं का खाल्लें ?

शरत्---तेव्हां खाल्लें होतें, पण तेव्हां असें छानदार बनत नसे.

हेम०---सुधेचें व तुझें जेवण झालें का ?

बिंदु---सुधेचें झालें, मी आतां जेवतेंच. आपण कांहीं खात नाहीं का ?

हेम०---नाहीं. तुझ्या काकाच्या घरीं आकंठ भोजन झालें. आतां बिलकुल भूक नाहीं. तूं लवकर जेवण आटोप, रात्र फार झाली.

बिंदु स्वैंपाकघरांत गेली. सुधा इतका वेळ हेमचंद्राकरितां जागत बसली होती, ती आतां एक चटई हांतरून त्यावर पडली तों तिला गाढ झोंप लागली.

हेमचंद्र व शरच्चंद्र इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत हांतरुणावर पडले. तालुष्करच्या बसु व घोष घराण्यांचा परस्पर संबंध होता. हेमचंद्राची व शरच्चंद्राची लहानपणापासून ओळख होती व त्यांचें परस्परांवर प्रेम होतें. ह्यावेळीं परस्परांचें थोडें संभाषण झाल्यावर त्यांना परस्परांचे स्वभाव चांगल्या रीतीनें कळले. या जगांत आपल्या ओळखीचे अनेक लोक असतात, पण त्यांत मनाचें ऐक्य थोड्यांशींच असतें आणि सर्व तऱ्हेनें आपल्याशीं साम्य असणारे अतिच अल्प असतात. अशांची गांठ पडली ह्मणजे आपलें त्यांच्याशीं तादात्म्य होतें. असाच प्रकार हेमचंद्र व शरच्चंद्र ह्यांचा झाला. थोड्याशा भाषणानेंच त्यांचें बंधुप्रेम जडलें. थोड्या वेळानें भोजन वगैरे आटोपून बिंदु त्या ठिकाणीं आली आणि सुधेच्या मानेखालीं उशी नव्हती, सबब तिचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन तिच्या केशगुच्छांशीं खेळत बसली.

पुष्कळ वेळ संभाषण झाल्यावर हेमचंद्रानें विचारलें " शरत्, तूं एफ्. ए. चा अभ्यास करीत आहेस. सहा सात महिन्यांनीं तुझी परीक्षा होऊन तूं त्यांत पास होणार व स्कॉलरशिप् मिळविणार यांत संशय नाहीं. पण त्यानंतर काय करावयाचें तूं ठरविलें आहेस ? "

शरत्— तें कांहीं अद्याप निश्चित ठरलें नाहीं. बी. ए. व्हावें अशी माझी इच्छा आहे, पण आईचें ह्मणणें असें आहे कीं, एवढी परीक्षा झाली ह्मणजे घरीं राहून आपलें कामकाज पहावें तें चांगलें. मग पहावें पुढें काय होतें तें. माझें घरचें उत्पन्न फार झालें तर सातआठशेंचें आहे. बी. ए. होऊन एखादी चांगली नोकरी मिळाली, तर करण्याची फार इच्छा आहे, ह्मणजे आईलाही मजजवळ राहतां येईल. घरचें काम कोणावरही सोंपवितां येईल.

हेम०—त्याचा विचार ही परीक्षा झाल्यावर मग करतां येईल. या सहा सात महिन्यांत चांगला सपाटून अभ्यास करून ही परीक्षा पास होऊन स्कॉलरशिप मिळीव.

शरत्—माझ्याही मनांत तेंच आहे. लवकर कलकत्त्यास जाऊन अभ्यास सुरू करावा ह्मणजे तें साधेल. पुष्कळदां माझ्या मनांत येतें कीं, तुह्मींही एकवेळ कलकत्त्यास चलावें; या कुग्रामवस्तींत कायमचें तुह्मी राहणार कीं काय ? नऊ वर्षांपूर्वीं तरी तुह्मी कलकत्त्यास होता. पण बिंदुताईनें कलकत्ता कधींच पाहिला नाही. ह्मणून ह्मणतों, तुह्मी दोघेही एकवेळ याना ? हीं नांगरणीपेरणीचीं कामें आटोपलीं ह्मणजे या आणि माझ्याच घरीं रहा आणि पुन्हां कापणीच्या वेळीं परत जा वाटलें तर.

हेम०—शरत्, तुझें आमच्यावर प्रेम, ह्मणून तुझें हें ह्मणणें ठीक आहे, पण आह्मीं तेथें येऊन काय करावें ? तूं शिकशील, परीक्षा देशील, कदाचित् नोकरी मिळविशील; पण मीं तेथें येऊन काय करावें ? सांग पाहूं.

शरत्—कां, तुला कांहीं उद्योग मिळणार नाहीं कीं काय तेथें ? तुमचें इतकें शिकणेंसंवरणें होऊन या खेडेगांवांतच आयुष्य काढणार कीं काय ? तुमच्यासारख्या सुशिक्षित मनुष्याला कलकत्त्यास नोकरीची कांहीं वाण आहे कीं काय ?

हेम०—माझें शिक्षण फारसें नाहीं. कांहीं उद्योग नसला ह्मणजे मो

याचीत बसतों इतकेंच. मजपेक्षां विद्येनें शेंकडोंपट अधिक असे अनेक लोक नोकरीकरितां किती प्रयत्न करीत असतात तें मीं कलकत्त्यास असतांना पाहिलें नाहीं कीं काय ? शिवाय अंगीं गुण असला तरीही एवढ्या अवाढव्य शहरांत त्याचा परिचय लोकांना पटावा कसा ? ह्मणून मला वाटतें गेलों तसें परत यावें लागेल.

शरत्—समजा, तसेंही झालें तरी हरकत काय आहे ? मेहेरबानी करून तुह्मी आलां आणि माझ्या घरीं राहिलां तर तुह्मांला कांहीं खर्च करायला नको, सर्वांनीं कलकत्ता पाहिल्यासारखें होईल आणि नोकरीचाही प्रयत्न करतां येईल. माझी खात्री आहे कीं, तुमच्यासारख्या गुणी मनुष्याच्या गुणाचें चीज झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. त्यांतूनहीं नाहीं जमलें तर आलें परत; त्यांत काय बिघडलें ?

थोडा वेळ विचार करून हेमचंद्र ह्मणाला " शरत्, तूं मला आपल्या घरीं राहण्याचा आग्रह करतो आहेस हा तुझा मोठेपणा आहे, पण यदाकदाचित् मी कलकत्त्यास आलोंच तर निराळें बिऱ्हाड करून राहीन, तुझ्या अभ्यासाला व्यत्यय आणणार नाहीं. तें कांहीं असो, या बैठकीला या गोष्टीचा निकाल लागावयाचा नाहीं; तारिणीबाबूंनीं मला वर्धमानास बोलाविलें आहे, तूं कलकत्त्यास बोलावितो आहेस, मलाही वाटतें कीं, एकदां कोठें तरी जाऊन दैवाची परीक्षा पहावी. मग विचार करून तुझ्या सल्ल्यानें काय तें ठरवूं. "

शरत्—बिंदुताई, एक वेळ कलकत्ता पाहण्याची तुह्मी इच्छा आहे कीं नाहीं ?

बिंदु—इच्छा पुष्कळ आहे, पण उपयोग काय ? तेथें ह्मणतात फार खर्च लागतो, आह्मी गरीब लोक, आमच्याजवळ कोठला आला आहे इतका पैसा ?

शरत्—केला तर खर्च होतो नाहीं तर कोठूनहोणार ? मी खात्रीनें सांगतों कीं, तुह्मी माझ्या घरीं राहिलां तर माझ्या अभ्यासाला बिलकुल

व्यत्यय यायचा नाहीं. अभ्यास करून करून कंटाळा आला ह्मणजे तुमच्याशीं चार गोष्टी बोलत बसलों ह्मणजे मनाचा शीण जाऊन अभ्यास करण्यास दुप्पट हुशारी येईल.

बिंदु—मग अभ्यासाचा काळवेळ न पाहतां सारखा आमच्याशीं लहानपणच्या पेरू पाडण्याच्या गोष्टी बोलत बसशील; मग खूप अभ्यास होईल !

शरत्—शिवाय कधीं कधीं सध्यांचें मिळमिळीत अन्न खाऊन तोंडाला अरुचि आली तर तुझ्या हातचें आंब्याचें पन्हें पिऊन तोंडाला रुचि आणतां येईल. एकंदरींत नुकसानीपेक्षां फायद्याचेंच कलप जास्त आहे असें विचारांतीं मला वाटतें.

बिंदु—सध्यां तुला अनुकुल ग्रह आलेले दिसताहेत. हक्काची पन्हें करून देणारी लवकरच घरीं येणार आहे असें ऐकतें तें खरें ना ?

शरत्— कोण ?

बिंदु— कां, कांहीं माहिती नाहीं वाटतें ? तुझ्या आईनें तुझें लग्न ठरविलें आहे ना ?

शरत् थोडा लाजला आणि ह्मणाला " त्या गोष्टी कशाला पाहिजेत ? "

हेम०— खरेंच तुझ्या आईनें तुझें लग्न ठरविलें आहे कीं काय ?

शरत्—आईचा इतका आग्रह नाहीं, पण आक्काची फार इच्छा आहे. तिनें वर्धमानास एक मुलगी पसंत करून ठेविली आहे आणि परवां येथें आल्यापासून ती आईचें मन वळविते आहे. पण मीं आईला आणि आक्कालाही साफ सांगितलें आहे कीं, ही परीक्षा पास झाल्याशिवाय व एखादी चांगली नोकरी मिळाल्याशिवाय मला विवाह कर्तव्य नाहीं.

बिंदु—कालीतारेची आणि माझी कित्येक दिवसांत गांठ नाहीं. लहानपणीं कालीतारा, मी आणि उमातारा एकत्र खेळत असूं. कालीतारा माझ्याहून सहा महिन्यांनीं लहान व उमा कालीतारेहून सहा महि-

त्यांनीं लहान. अलीकडे वर्ष सहा महिन्यांत देखील आमच्या गांठी पडत नाहींत. उद्यां तुझ्या घरीं जाईन आणि आणखी एखाद्या दिवशीं उमातारेच्याही घरीं मला गेलें पाहिजे.

शरत्—उद्यां माझी आक्का उमातारेच्या घरीं जाणार आहे. तूंही उद्यांच तेथें गेलीस तर दोघींच्याही गांठी पडतील.

बिंदु—तर मग तेंच चांगलें. कालीतारेला भेटण्याविषयीं मी फार उत्सुक झालें आहें. कालीचें लग्न माझ्या आधीं झालें. तेव्हां-पासून बिचारीनें किती तरी कष्ट सोसले. शरत्, तुझ्या आईनें जाणून-बुजून अशा ठिकाणीं कशी मुलगी दिली ? लग्नाचे वेळीं मीं तिचा नवरा पाहिला होता, लोक ह्मणत त्यावेळीं त्याचें वय चाळीस वर्षांचें होतें.

शरत्—ताई, त्या संबंधानें आतां कांहीं विचारूं नकोस. आईच्या मनांत नव्हतें, पण असें घराणें या साऱ्या प्रांतात दुसरें मिळावयाचें नाहीं अशी लोकांनीं बाबांना भीड घातल्यामुळें त्यांनीं रुकार दिला; मग आई काय करणार ? लग्न झाल्यापासून मीं पोरीचा घात केला असें ह्मणून ती नेहमीं दुःख करीत असते. माझ्या मेहुण्याचें वय सध्यां पन्नास वर्षांचें आहे. शिवाय तो जात्या रोगी आणि अशक्त. माझ्या आक्काची तेथें बिलकूल बूज नाहीं, सकाळपासून रात्रीपर्यंत ती सारखे कष्ट करीत असते. दोन वेळां जेवणाला काय फुरसत मिळेल तेवढीच. पण इतकें असूनही ती नेहमीं संतुष्ट असते. आमच्या संसारांत घरोघरीं जशा धर्म व पतिपरायण स्त्रिया आहेत तशा पूर्वींच्या ऋषींच्या वेळीं होत्या का नाहीं हें माहीत नाहीं.

कालीतारेच्या स्थितीचा विचार करितां करितां बिंदूच्या डोळ्यांना पाणी आलें.

बराच वेळ गेल्यावर शरत् ह्मणाला " ताई, आतां मी जातों, रात्र फार झाली, उद्यां पुन्हां येईन. जोंपर्यंत मी येथें आहें तोंपर्यंत रोजच येत जाईन; आणि मेहरबानी करून तुह्मी जर कलकत्त्यास आलां तर माझ्या आनंदाला सीमा नाहीं.

बिंदु हंसून ह्मणाली " बरें तर. कलकत्त्यास जायचें कीं नाहीं तें उद्यां ठरवूं. शिवाय कालीतारेची गांठ पडली ह्मणजे तुझ्या लग्नाची-ही काय हकीकत आहे त्याची चौकशी करून येईन. त्यासंबंधीं तुला आतां काळजी करायाला नको. "

हेमचंद्र व बिंदु यांचा निरोप घेऊन शरच्चंद्र निघून गेला. सुधा अद्यापही निजली होती. तिच्या सुंदर चेहऱ्यावर चंद्राचे किरण पडले होते व तिचे केस तिच्या दंडावर पडले होते. तिच्या चेहेऱ्यावर आनंदाची छटा दिसत होती, मग ती एखादें सुखस्वप्न अनुभवीत होती कीं काय न कळे.

घरांतून बाहेर पडल्यावर आकाशाकडे पहात पहात शरच्चंद्र मनाशीं बोलूं लागला " मी वर्धमानास व कलकत्त्यास अनेक श्रीमंत व गरीब लोकांचीं कुटुंबें पाहिलीं. पण आज या सामान्य कुटुंबांत जी सरलता, अकृत्रिम प्रेम व आनंद हीं दृष्टीस पडलीं तशीं कोठेंही पहाण्यांत आलीं नाहींत. परमेश्वरा, हेमचंद्राला व त्याच्या कुटुंबाला नेहमीं सुखी ठेव. लहानपणापासून एकटा राहिल्यानें व नेहमीं अभ्यासांत निमग्न राहिल्यामुळें माझें हें जीवित अगदीं शुष्कप्राय होऊन गेलें होतें. पण हेमचंद्र व बिंदुताई यांच्या प्रेमानें तें पुन्हां टवटवीत झालें. परमेश्वर करो आणि यांचा माझा समागम चिरकाल राहो ! अशा प्रकारचे विचार करीत करीत शरच्चंद्र घरीं गेला.

अष्टम परिच्छेद.

बिंदूच्या मैत्रिणी.

दुसरे दिवशीं सकाळीं लवकर उठून, सडासंमार्जन आटोपून घराच्या मागीलदारच्या पुष्करिणीवर बिंदु भांडी घांशीत बसली होती. इतक्यांत पुढच्या दारावर कोणीं थाप मारिली. हेमचंद्र व सुधा अद्यापही उठलीं नव्हतीं. सबब बिंदूनें स्वतः येऊन दार उघडिलें आणि

पहाते तों सनातनाची स्त्री बाहेर उभी. लहानपणापासून बिंदु तिला कैवर्तदिदी ह्मणत असे. त्याच नांवानें तिला हाक मारून ती ह्मणाली, "आज सकाळींच इकडे कोणीकडे ? हातांत काय आहे तुझ्या ?"

सनातनपत्नी—फार दिवसांत तुमची गांठ पडली नाहीं ह्मणून आज मुद्दाम भेटायला आलें. आपल्या सुधाताईला ताजें दहीं फार आवडतें, काल घरीं दहीं तयार झालें, ह्मणून तिच्याकरितां थोडें घेऊन आलें आहें. सुधाताई उठली का ?

बिंदु—अद्याप उठली नाहीं. दिदि, तुह्मी गरीब माणसें, रोज रोज दहींदूध कशाला आणून देतेस ? अशानें तुमचा कसा निभाव लागेल ?

स० प०—घरचीं गुरें, आणलें थोडें ह्मणून त्यांत काय वेंचतें ? गुरेंढोरें सर्व तुमचीं. तुमच्या जिवावर तर आमचें पोट चाललें आहे. धन्याचा माल धन्यानें खायचा नाहीं तर खायचा कोणी ?

बिंदु—दे ठेवून तर मग ह्या शिंक्यावर. जेवायच्या वेळीं भाताबरोबर खाईल. दिदि, तुझ्या घरचें दहीं सुधेला फार आवडतें अं.

बिंदु स्वैंपाकघरांत जाण्यास निघाली होती, इतक्यांत सनातनपत्नी पुन्हां एकवार मोठा हुंदका काढून स्फुंदत ह्मणाली, "मीं ऐकलेंतें खरें का ?"

बिंदु— काय खरें ?

सना० पत्नी— मीं ऐकलें तें.

बिंदु— काय ऐकलेंस तूं ?

सना० पत्नी— मग वाटतें खरेंच तें. इतक्या दिवसांनीं काय हा प्रसंग ! सुधाताई एक दिवस दृष्टीस पडली नाहीं तर मला चैन पडत नाहीं.

इतकें बोलून ती अधिकच मोठ्यानें रडूं लागली. शोकावेगानें तिचें विशाल शरीर कांपूं लागलें. घरांत हेमचंद्र निजला होता, तो या रडण्याचा अवाज ऐकून जागा झाला आणि मोठ्यानें ह्मणाला "घरांत रडतें आहे कोण ?" इतकें बोलून लागलीच तो बाहेर आला आणि रडत कोण होतें, असें त्यानें आपल्या पत्नीस विचारिलें.

बिंदु—कोणी नाहीं, कैवर्तविंदीनें कांहीं अमंगल बातमी ऐकली म्हणून ती रडते आहे.

हेम०—कोण सनातनाची पत्नी कीं काय ? तिच्या घरीं कोणी आजारीबिजारी आहे कीं काय ?

हेमचंद्र आलेला पाहून सनातनाच्या पत्नीची मोठी तारांबळ उडाली. तिनें आपलें रडणें जरा आंवरलें आणि घाईघाईनें तोंडावर बुरखा घेतला व डोळ्याचें पाणी पुसून ती हळूच म्हणाली,

" कांहीं अमंगळ बातमी नाहीं, पण कांहीं ऐकलें त्याची चौकशी करण्याकरितां इकडे आलें. "

बिंदु—तें काय ? म्हणून मीं तिला शेंकडों प्रकारांनीं विचारलें, पण कांहीं नाहीं. तुम्ही तरी एकवेळ विचारून पहा काय आहे तें !

हेम०—बायकांच्या गोष्टी बायकांना कळतील तशा आम्हां पुरुषांना कळावयाच्या नाहींत. मी एक वेळ शरत्‌कडे जाऊन येतों.

असें म्हणून हेमचंद्र घराबाहेर पडला.

सना०पत्नी—तर मग मीं ऐकलें तेंच खरें.

बिंदु—तुला कांहीं भूतबीतसंचार तर झाला नाहीं ना ? असें काय करते आहेस तूं ? ऐकलेंस काय, तें सांगत कां नाहींस !

सना० पत्नी—शरत्‌बाबूंच्या घरीं सकाळीं ऐकलें तें.

बिंदु—काय ऐकलेंस.

सना० पत्नी—गरीबाच्या बोलण्यावर रागावूं नका. खरें कीं खोटें तें मला माहीत नाहीं. पण आज सकाळीं घोषांच्या घरच्या सर्व चाकरमाणसांनीं मला सांगितलें तेव्हांपासून माझ्या काळजानें ठाव सोडला आहे. पाहिजे तर पहा माझ्या छातीला हात लावून.

बिंदु—मला पहायला आतां वेळ नाहीं, मी आपल्या कामाला जातें.

असें म्हणून ती स्वैपाकघरांत जावयास निघाली. सनातनपत्नीनें तिचा पदर धरून तिला थांबविलें आणि बोलण्यास सुरवात केली.

" बिंदुताई, अशा रागावूं नका. तुमच्याकरितां माझें काळीज तुटतें ह्मणून तर येथवर आलें, नाहींतर कशाला आलें असतें ? सुधा एक दिवस दृष्टीस पडली नाहीं तर माझी स्थिति काय होते ! (बिंदु जाऊं लागते) अंहः अशा जाऊं नका, मी काय सांगतें तें ऐका. घोषांच्या घरचीं चाकरमाणसें सांगत होतीं कीं, तुह्मी आह्मांला सोडून कलकत्त्यास जाणार ह्मणून. खरें कां तें ? आमच्यावर कां रागावलां ? आह्मांला सोडून कां चालला ? " (रडूं लागते)

इतका वेळ बिंदूनें गंभीर मुद्रा धारण केली होती, पण आतां तिला हंसूं कोसळलें आणि ती ह्मणाली, " एवढ्याचकरतां का इतका वेळ एवढा गोंधळ केलास ? रडूं नकोस अशी. आमचें जायचें अद्याप पक्कें ठरलें नाहीं. काल शरतूनें सहज बोलतां बोलतां गोष्ट काढली होती इतकेंच. आमचें कसचें जाणें होतें ! तेथें कोण खर्च ! "

सना० पत्नी—छे, तेथें कशाला जातां ? तेथें गेल्यावर आचारविचार रहात नाहीं, तेथें आपला सब गोळंकार. तुह्मी आपला सोन्यासारखा संसार तेथें जाऊन बिघडवूं नका. शरत्‌बाबूचें काय, त्याला बायको ना पोर; तो काय कॉलेजांत शिकतो आहे ह्मणे. कॉलेजांतलीं पोरें काय वाटेल तें करतात, समुद्राच्या पार विलायतेला देखील जातात ह्मणे. बिंदुताई, विलायत कोठें आहे ग ?

बिंदु—विलायत किती तरी दूर आहे ! ह्मणतात लंकेच्याही पलीकडे फार दूर.

सना० पत्नी—लंकेला गेलेलें माणूस कां कोठें जिवंत राहतें ? माणूस लंकेला गेलें कीं त्याचें पिशाच बनतें व तें माणसांचीं काळजें खाऊं लागतें. तें नकोच आपल्याला. तुह्मी विलायतेला जाऊं नका आणि कलकत्त्यालाही जाऊं नका. येथें राहून आपला सुखानें संसार करा. मी जातें आतां. बिंदु हंसत ह्मणाली " बरें, ये तर. "

सना० पत्नी—आजचें दहीं कसें काय आहे व सुधेला आवडलें कीं नाहीं तें मला सांगा बरें का ?

बिंदु—सांगेन बरें.

सनातनपत्नी कांहीं पावलें पुढें जाऊन पुन्हां परत आली आणि ह्मणाली, " गरीबाचें सांगणें ध्यानांत असूं द्या बरें. कशाला कलकत्त्यास जातां ? आहे काय तेथें ? "

बिंदु—बरें पाहूं. आमचें कांहीं जायचें अद्याप नक्की ठरलें नाहीं, आणि गेलोंच कदाचित् तर थोड्या दिवसांकरतां. कापणीच्या वेळीं आह्मांला परत आलेंच पाहिजे. बाहेर राहून आमचा निभाव कसा लागणार ?

सनातनपत्नी आनंदित होऊन घरीं जाण्यास निघाली. सनातन पहाटे जागा होऊन पहातो तों आपल्या शेजारीं आपली गृहिणी नाहीं असें पाहून विस्मित झाला. विरहवेदनेनें तो व्यथित झाला होता कीं सकाळच्या प्रहरच्या आपल्या शिव्या खायच्या टळल्या याबद्दल आपल्याला भाग्यवान् मानीत होता तें आह्मांला पक्कें माहीत नाहीं. पण तें सुखदुःख जगांतल्या इतर सुखदुःखाप्रमाणेंच चिरकाल टिकणारें नव्हतें. कारण, तितक्यांतच आंगणांत आपल्या स्त्रीची विशाल सावली पडलेली पाहून व तिचा कंठस्वर ऐकून सनातन घाबरून उठला.

त्याच दिवशीं दुपारीं हरिमती नांवाची वृद्ध गवळण आपल्या विधवा सुनेला बरोबर घेऊन बिंदूला भेटावयास आली. हरिमतीचा मुलगा जिवंत असतांना तिची स्थिति चांगली होती, तिच्याजवळ दोन पैसे होते, थोडी जमीन होती, घरांत दुभत्या गाई होत्या, त्यांच्या दुधाच्या विक्रीनें तिचा संसार छान चाले. मुलगा गेल्यावर जमिनीची व्यवस्था पाहण्यास कोणी उरलें नसल्यामुळें तिची फार दैना उडाली. गाईही एकीमागून एक विकल्या गेल्या, सध्यां फक्त दोन गाई शिलक होत्या, त्यांच्या दुधावर संसारखर्च भागत नसे. सासवासुना नेहमीं बिंदूच्या घरीं जात व अडीभडचणीच्या वेळीं बिंदूच्या घरचें कामकाज करीत. हरिमतीचा सर्व तऱ्हेनें परामर्श घेण्यासारखी बिंदूची स्थिति नव्हती. पण

शेतांतलें धान्य आलें ह्मणजे थोडेंसें धान्य ती तिला देई, थंडीच्या दिवसांत एखादें वस्त्र विकत घेऊन देई व ह्मातारी कधीं आजारीबिजारी पडली तर कांहीं औषध वगैरे देऊन तिचा समाचार घेई. यामुळें हरिमतीचा बिंदूवर फारच लोभ जडला होता. बिंदु कलकत्त्यास जाणार ही बातमी ऐकून ती आज आली होती. तिनें रडून फार आकांत केला. अखेरीस बिंदूनें तिचें शांतवन करून व तिच्या सुनेस एक जुनी साडी देऊन तिची रवानगी केली.

हरिमती निघून गेल्यावर एक कोष्ट्याची सून बिंदूला भेटावयास आली. तिचा वर्ण काळा होता, नवऱ्याचें तिच्यावर प्रेम नव्हतें व अशक्त असल्यामुळें तिच्या हातून कामकाज होत नसे, ह्मणून नेहमीं तिला सासूच्या शिव्या खाव्या लागत. गेल्या हिवाळ्यांत तिच्या पाठींत कळा निघत असल्यामुळें तिच्यानें पाण्याच्या घागरी आणवत नसत, ह्मणून तिच्या सासूनें तिला यथास्थित झोडपली होती. ती बिचारी रडत रडत बिंदूकडे गेली. तिला औषधपाणी करण्याला बिंदूजवळ पैसे नव्हते, पण घरांत राकेल तेल होतें, तें रोज ती आपल्या हातानें तिच्या पाठीला चोळी. चार पांच दिवसांत पाठीच्या कळा बंद झाल्या. तेव्हांपासून तिचें बिंदूवर प्रेम जडलें व फुरसत मिळाली ह्मणजे ती तिजकडे जात असे.

कोष्ट्याची सून जाते न जाते इतक्यांत हिरा भोईण बिंदूकडे आली. तिच्या नवऱ्याला रोजगारांत चांगले पैसे मिळत, पण ते सर्व दारूंत फस्त होत. दारू पिऊन घरीं आल्यावर तो बायकोला यथास्थित मारी. बिंदूनें एक दिवशीं हेमचंद्राला सांगून हिरेच्या नवऱ्याची चांगली कानउघाडणी करविली. तेव्हांपासून हेमचंद्राच्या व तारिणीबाबूच्या भीतीनें तो बायकोला मारीनासा झाला. हिरा आज आपल्या मुलाला नवा आंगरखा घालून बिंदूकडे आली आणि ह्मणाली, " तुमच्या आशीर्वादानें आज दोन पैसे शिलक राहिले आहेत. किती दिवसांत घराची डागडुजी

झाली नव्हती, तीही झाली व मुलाकरतां कपडेही करविले." बिंदूनें मुलाला आशीर्वाद देऊन तिला निरोप दिला.

त्यानंतर गांवांतील दुसऱ्या अनेक स्त्रिया बिंदूला भेटावयास आल्या. त्या सर्वांनाच बिंदु आपल्याला सोडून जाणार याबद्दल फार वाईट वाटलें. कारण, परोपकाराचीं अनेक कृत्यें करून बिंदूनें सर्वांना आपलेंसें करून घेतलें होतें, तेव्हां अशा सद्गुणी मैत्रिणीचा वियोग कोणाला बरें दुःखद होणार नाहीं !

नवम परिच्छेद.

बालपणच्या मैत्रिणी.

संध्याकाळच्या वेळीं बिंदु आपल्या चुलतीच्या घरीं गेली. त्या ठिकाणीं तिच्या बालपणच्या मैत्रिणी कालीतारा व उमातारा ह्या फार दिवसांनीं तिला भेटल्या. या तिन्ही मैत्रिणी सध्यां निरनिराळ्या तीन संसारांतल्या गृहिणी झाल्या होत्या, पण त्यांचें लहानपणचें परस्पर प्रेम किंचितूही कमी झालें नसल्यामुळें त्यांची भेट झाल्याबरोबर त्यांच्या अनेक सुखदुःखांच्या गोष्टी निघून ती रात्र त्यांनीं मोठ्या आनंदांत घालविली.

कालीतारा लहानपणापासूनच अतिशय कृष्णवर्ण होती, पण एके काळीं तिच्या चेहेऱ्यांत नेटकेपणा व गोंडसपणा होता. हल्लीं तिचें मुख निस्तेज झालें होतें, डोळे खोल गेले होते व मानेचे हाड निघालें होतें. लहानपणीं ती अति सरळ स्वभावाची होती व तो गुण अद्यापही तिच्या अंगीं कायम होता. घरांत पडलेलें सर्व काम ती करी, दोन वेळ जेवी आणि कोणी कांहीं बोललें तर मुकाट्यानें सहन करी.

बिंदु—कालि, आज किती दिवसांनीं तुझी गांठ पडली ! मीं कांहीं बाई, तुला प्रथम ओळखिलें नाहीं.

काली—बिंदुताई, गांठ पडणार कशी ? लग्न झाल्यापासून मी वर्ध-मानासच असतें, माहेरीं कोठलें आतां वारंवार यायला सांपडणार ?

उमा०—कांग तूं माहेरीं येत नाहींस ? मी तर दरदुर्गोत्सवाचे वेळीं येतें.

काली०—तुझी गोष्ट कशाला पाहिजे. तुझ्या घरीं नोकरचाकर पुष्कळ आहेत, कामकाजाचा लकडा नाहीं, आले मनांत कीं चाललें माहेरीं. माझी गोष्ट तशी नाहीं, मुलांमाणसांचें घर, कामाचा रगाडा फार व शिवाय नोकरचाकर ठेवण्याची चाल नाहीं. मग मी जाऊन कसें चालणार ? आतां आलें आहें ह्मणजे काय, वन्संनी माझें काम कर-ण्याचें दोन दिवस मेहेरबानीनें कबूल केलें आहे ह्मणून. पांच चार दिव-सांत मला परत गेलेंच पाहिजे. त्यांच्यावर तरी किती दिवस भार टाकावयाचा ?

बिंदु—मी तर ऐकतें कीं तुमचें उत्पन्न मोठें, घरीं गाड्या, घोडे पुष्कळ, मग घरांत नोकरचाकर कां ठेवीत नाहींत ?

काली०—उत्पन्न फारसें नाहीं, खर्च मात्र अवाढव्य आहे, थोडें कर्जही झालें आहें असें ऐकतें—बाकी मला पक्कीशी माहिती नाहीं. आमचा एक बागेंत बंगला आहे. तब्येत चांगली नसल्यामुळें घरचें राहणें तेथेंच असतें. घरीं बहुतेक येणें होतच नाहीं, मग कामकाज कसचें पाहणार ? आमच्या सासुबाईच सर्व कारभार पाहतात. घरांत नोकर ठेवण्याची चाल नाहीं ह्मणून सुनांनाच घरचीं कामें करावीं लागतात.

बिंदु—कर्ज झालें आहे ह्मणतेस तर खर्चाची थोडी काटकसर कां करीत नाहींत ? मी ऐकतें कीं तुझा नवरा नेहमीं साहेबांना खाने देतो, गाड्या घोडे ठेवतो—तें कशाकरितां ? आपला आदा पाहून खर्च करावा असें नाहीं का तुला सांगतां येत ?

काली०—तुला वेड लागलें कीं काय ? भीडमर्यादा सोडून देऊन

मला तसें सांगतां येईल कीं काय ? एखादे वेळीं घरीं येणें झालें ह्मणजे सासूबाई मात्र कधीं कधीं सांगतात.

बिंदु—त्यावर ते काय ह्मणतात ?

काली०—ह्मणतात ' नांवालौकिकाप्रमाणें सर्व केलेंच पाहिजे, न करून कसें चालतें ? ' साहेब लोकांत त्यांचें भारी वजन आहे. वर्धमानास जितक्या ह्मणून कमेटचा व सभा आहेत त्या सर्वांत त्यांचें नांव आहे. साहेब लोकांच्याकडे नेहमीं भेटायला जावें लागतें आणि प्रकृति तर अशी; मग गाडीघोड्यांशिवाय कसें जातां येणार ?

सरलस्वभाव कालीतारेचें हें पतिगौरववर्णन ऐकून बिंदु किंचित् हंसली, पण अभिमानी उमेला मात्र त्याचें मोठें वैषम्य वाटलें.

बिंदु—बरें कालि, तुमच्या घरांत मुख्य कर्ती मुखत्यारीण कोण ?

काली०—मला सख्खी सासू नाहींच, तीन चुलतसासवा आहेत, त्याच कुलमुख्त्यारणी. त्यांतली जी वडील आहे ती फारच सज्जन, कोणाच्या कश्शांत नाहीं बापडी, मधली आहे ती फार रागीट. सुना तिला थरथर कांपत असतात. परवां एक दिवस माझी चुलत जाऊ घरांतून कढत दूध आणीत असतांना तिचा पाय ओच्यांत अडकून तें सर्व दूध तिच्या अंगावर सांडलें. बिचारीचें अंग भाजलें, पण आतां सासूबाई काय ह्मणतील या भीतीपुढें तिला स्वतःच्या दुःखाचें कांहींच वाटलें नाहीं. कांहीं वेळानें सासूबाई घाटावरून आल्या आणि त्यांनीं जो कांहीं तोंडाचा पट्टा सुरू केला तो बेसुमारच. जाऊबाईंना रडतां भुई थोडी झाली. तीन दिवस त्यांनीं अन्न घेतलें नाहीं.

उमा०—तुलाही अशीच बोलते कां ?

काली०—सुखासुखी नाहीं शिव्या देत, अन्याय घडला तर देतात, त्याशिवाय कसें चालतें ?

उमा०—तुझी सासू जेव्हां तुला बोलते तेव्हां तूं काय करतेस ?

काली०—मुकाट्यानें मुळुमुळु रडतें, दुसरें काय करणार सांग

पाहूं ! अभिमानिनी उमा हंसून ह्मणाली " मी तर नाहीं बाई, कोणाचें बोलणें ऐकून घेणार. मला नाहीं कोणीं न ह्मटलेलें खपत. "

काली०—हें बघ बिंदुताई, सासरीं जर कोणी बोललें तर काय करायचें बरें ? एक जबाब दिला तर दहा शब्द ऐकून घ्यावे लागतात. तेव्हां आपलें कोणीही कांहीं बोललें तरी उलट उत्तर न देतां स्वस्थ बसावें ह्मणजे झालें. बोलण्यानें अंगाला भोंकें तर पडत नाहींत ना ?

बिंदु—तूं करतेस तेंच चांगलें. होतां होई तों सर्वांची मर्जी राखून असावें, त्यांतून एखादे वेळ चुकलें तर इलाज नाहीं. तुझी धाकटी सासूही रागीट आहे ह्मणून ऐकतें तें खरें का ?

काली०—रागीट खऱ्याच, पण मधल्या सासुबाईच्या मानानें कांहींच नाहीं. रागावल्या ह्मणजे दोन शब्द बोलतात आणि खोलींत जाऊन मनाशीं जळफळत बसतात. मधल्या सासुबाईच्या तोंडाला खळ ह्मणून पडायचाच नाहीं, त्यांचा थोडा खाजगी कुणगा आहे. त्या आपल्या मुलांना चांगलेंचुंगलें खायला करून देतात आणि धाकट्या सासुबाईच्या मुलांच्या समोर जाऊन खायला सांगतात. धाकट्या सासुबाईच्या मुलांना कांहीं खायला मिळत नाहीं, तीं बिचारीं टकटकां तोंडाकडे पहात बसतात. मुलामुलांचीं यामुळें नेहमीं भांडणें लागतात. एके दिवशीं आमच्या धाकट्या भाउजींनीं याबद्दल घरांत कागाळी सांगितली. घरांतून मधल्या सासुबाईची पुष्कळ समजूत घातली, पण कांहीं नाहीं. अखेरीस कंटाळून परत बागेंत जाणें झालें.

उमा०—एकूण शाबास आहे त्यांची !

काली०—घरांत नेहमीं इतके भांडणतंटे होतात कीं बोलायची सोय नाहीं. मी आपलें सर्व मुकाट्यानें ऐकून घेतें, कुणाच्या कश्शांत पडत नाहीं.

बिंदु— तुझ्या सास्वा किती वयाच्या आहेत ?

काली०–वय कांहीं फार नाहीं. मोठ्या सासुबाईचें आणि घरां-

तलें वय एक. मधल्या सासुबाई धाकट्या भाऊजींपेक्षां ५।७ वर्षांनीं लहान. आमचे मामंजी आमच्या आजेसासऱ्याचे ज्येष्ठ चिरंजीव. ते जर आंज असते तर ७० वर्षांचे असते. त्यांच्या पाठीवर १५।१६ वर्षें त्यांना कांहीं भावंड झालें नाहीं. त्यानंतर तीन भाऊ झाले. आमच्या सासुबाई जेव्हां ३० वर्षांच्या होत्या, तेव्हां चुलत सासुबाईंचीं नुकतीं कोठें लग्नें झालीं होतीं. त्याच्यानंतर दोन एक वर्षांनीं घरांतलें प्रथम लग्न झालें.

उमा०—तुझ्या आते सासूबाईही घरींच असतातना ?

काली०—हो. दोन आतेसास्वा व एक मावससासू अशा तिघीजणी आहेत. तिघीही विधवा आहेत. त्यांचीं मुलेंबाळें, नातवंडें सर्व आमच्याच घरीं असतात. शिवाय एक मामेसासूही आहे, ती सधवा आहे खरी, पण तिचा नवरा कोठें दूरदेशीं रोजगाराकरितां गेला आहे. तेथें ह्मणतात त्यानें दुसरें लग्न केलें आहे. तेरा वर्षांत घरीं आला नाहीं कीं एक पैसा पाठविला नाहीं. त्याचे दोन्ही मुलगेही येथेंच असतात, त्यांचीं लग्नें देखील येथेंच झालीं.

उमा०—ते मुलगे तरी कसे काय आहेत, शाळेंतबिळेंत जातात का ?

काली०—धाकटा बरा आहे, शाळेंत जातो व अभ्यास करतो. वडील ह्मणजे नुसते दादा आहेत. त्यांनाही कांहीं नोकरी देवविली होती, पण तेथून कांहीं पैशांवर ताव मारून स्वारी फरारी झाली. सर्वांना वाटलें, आतां स्वारीला कारागृहवास खास भोगावा लागणार, पण नुकसान वगैरे भरून देऊन घरांतून स्वारीची सुटका करविली. तेव्हांपासून त्यांनीं अगदीं ताळच टाकला आहे. रोज दारू प्यायची आणि घरीं आल्याबरोबर 'पैसे दे' ह्मणून बायकोला झोडपायची. तिनें बिचारीनें कोठले पैसे द्यायचे ? अंगावर होते नव्हते तेवढे सर्व दागिने दिलेन बिचारीनें, न देऊन करणार काय ?

उमा०— तुझा मोठाच संसार आहे ह्मणावयाचा.

काली०— मग ह्मणतें काय ! तूं श्रीमंताची सून, तीन जावा तीन ठिकाणीं, सासूबाई स्वैंपाक करायला, तुला कामाचा रगाडा काय असतो तें कशानें माहीत असणार ? दोघे दीर घरींच असतात. तुझा नवरा कलकत्त्यास असतो ना !

उमा०—हो, एक वर्ष झालें, तेव्हांपासून तेथेंच राहणें आहे. मलाही बोलावणें झालें आहे व येत्या ज्येष्ठांत कीं आषाढांत सासूबाई माझी रवानगी करून देणार आहेत.

काली०—हो, शरत् सांगत होता कीं तुझ्या नवऱ्यानें एका मोठ्या रस्त्यावर एक टोलेजंग हवेली खरेदी केली आहे व त्यांत उंची उंची सामान ठेवलें आहे. सुंदर गाड्याघोडेही आहेत, शिवाय गांवाबाहेर एक बाग विकत घेण्याचा विचार चालला आहे. उमा, खरो-खर तूं मोठी भाग्यवान् !

उमेच्या सुंदर ओष्ठांवर हास्य विलसूं लागलें व तिचे नेत्र थोडे निस्तेज दिसूं लागले. ती ह्मणाली, " सुंदर घर व गाडीघोड्यांत जर सुख असेल तर मी सुखी खरी, पण मनांतली व्यथा कशी सांगतां येणार ? " उमेनें एक दीर्घ निश्वास सोडला.

थोडा वेळ तिघीही गप्प बसल्या, नंतर उमा पुन्हां ह्मणाली, " आपण लहान असतांना येथें एक संन्यासी आला होता आणि त्यानें माझा हात पाहिला होता, आहे का त्याची आठवण ?

बिंदु—मला नाहीं कांहीं आठवत.

उमा०—हें काय ताई, तूं माझ्याहून मोठी आणि तुला नाहीं आठ-वत! नाहीं ? कालीला कदाचित् आठवत असेल.

काली०—अंहं:, मला नाहीं आठवत.

उमा०—ती गोष्ट माझ्या मनाला फार लागली ह्मणून मलाच फक्त आठवतें. ह्याच वैशाखाच्या महिन्यांत ह्याच सुमारास आपण येथें खेळत होतों. इतक्यांत एक जटाधारी संन्यासी आला. त्याला पाहतांच

आपण सर्व घाबरलों व लटलट कांपूं लागलों. संन्यासी अगदीं जवळ आला आणि ह्मणाला " मुलींनों, भिऊं नका, एक एक पैसा घेऊन या, ह्मणजे तुमचा हात पाहून तुमचें भाग्य सांगतों. " त्याच दिवशीं आईनें मला चार पैसे दिले होते, ते मीं संन्याशाला दिले. नंतर माझा हात पाहून तो मला ह्मणाला " मुली, कांहीं काळजी करूं नकोस, तूं मोठ्या श्रीमान् कुळांत पडशील. " नंतर हात दाखविण्याकरितां कालीनेंही घरांतून एक पैसा आणून त्याला दिला. त्यावर संन्यासी ह्मणाला, " तुझ्या दैवीं श्रीमंती नाहीं, पण घर बरें मिळेल. "

बिंदु हसून ह्मणाली " त्या जटाधारी बोवानें माझी काय व्यवस्था केली ? "

उमा—तेंच सांगतें. तुझी आई घाटावर गेली होती, बोवाला द्यायला तुजजवळ पैसा नव्हता. तूं नुसताच आपला हात दाखविलास, तेव्हां तो ह्मणाला, " तुझ्या दैवीं द्रव्यही नाहीं व चांगलें घरही नाहीं. कशी तरी ओलीकोरडी मठभाकरी खाशील झालें. " इतकें बोलून हातांतले सर्व पैसे तुझ्या हातावर ठेवून तो संन्यासी निघून गेला.

बिंदु—हो, आतां मला आठवलें. गावांतले लोक त्या संन्याशाला रमाप्रसाद सरस्वती ह्मणत असत. तोच ना ?

उमा—हो हो, तोच. तुझी आई घाटावरून आल्यावर मीं तिला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां तिनें तुझे डोळे पुसून तुला ह्मणाली, " कांहीं हरकत नाहीं, गरीबीचाच संसार करून सुखानें नांद ह्मणजे झालें. खरें सुख श्रीमंतींत किंवा मोठ्या कुळांतच केवळ नसतें. " बिंदुताई, ती गोष्ट माझ्या मनांत पक्की बिंबली. श्रीमंतींतच जर सुख असतें तर जगांत सुखाचा अभाव राहता ना.

बिंदु—उमा, लहानपणची कोठली एक गोष्ट आठवून तूं डोळ्यांतून पाणी काढते आहेस हें काय ? तुला कसली वाण आहे सध्यां ? तूं जर असें करायला लागलीस तर आह्मीं काय करावें ?

उमा—मला दुःख ह्मणून कसलेंही नाहीं आणि असलें कदाचित् थोडें बहुत तर त्याबद्दल मी खंती बाळगीत नाहीं. पण कलकत्त्यास जायचें ठरल्यापासून माझ्या मनांत, कोण जाणें कोणास ठाऊक, भलतेनसलतेच विचार यायला लागले आहेत. पुढें काय दैवीं आहे तें एका परमेश्वरास माहीत. बिंदुताई, तूंही कलकत्त्यास जाणार आहेस व काली वर्धमानास राहणार. वर्धमान ह्मणजे कलकत्त्यापासून चार तासांचा रस्ता; तेव्हां माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं, लहानपणीं जशा आपण सख्ख्या बहिणींप्रमाणें परस्परांशीं वागत होतों तशाच पुढेंही वागूं आणि सुखानें काळ काढूं.

उमाचें हें भाषण ऐकून बिंदु व काली या दोघींना गहिंवर आला. त्यांनीं आपल्या पदरानें तिचे डोळे पुसले आणि तिचें अनेक प्रकारें शांतवन करून त्या आपल्या घरीं गेल्या.

दशम परिच्छेद.

कलकत्त्यास आगमन.

यानंतर थोड्या दिवसांनीं हेमचंद्र सपरिवार कलकत्त्यास गेला. निघण्याच्या आदले दिवशीं बिंदूनें आपल्या सर्व मैत्रिणीच्या घरीं जाऊन त्यांचा निरोप घेतला. निरोप देतेवेळीं सर्वांच्या डोळ्यांतून अश्रु वाहिले.

जायच्या दिवशीं मोठ्या पहाटेस उठून बिंदु आपल्या चुलतीचा निरोप घेण्यास गेली. चुलतीचें बिंदूवर खरें प्रेम असल्यामुळें ती जाणार हें ऐकून तिला गहिंवर आला आणि ती ह्मणाली " बिंदु, जशी माझी उमा तशीच तूं. तुला निरोप द्यायचें माझ्या जिवावर आलें आहे, पण काय करणार ? इलाज नाहीं. परमेश्वरकृपेनें हेमचंद्राला चांगला रोजगार मिळून तूं सुखांत आहेस असें ऐकलें ह्मणजे मला

मूठभर मास येईल. उमाही लवकरच कलकत्त्यास जाणार. आमच्या जावईबोवांनीं नवें घर बांधलें आहे, बागबगीचे केले आहेत, गाडीघोडे ठेवले आहेत असें परवां पोषांचा शरत् सांगत होता. बरोबरच आहे, श्रीमंतांना काय कमी आहे ? बोलून चालून जहागीरदार ते. एकदां मी विहिणीच्या घरीं गेलें होतें, तेथला थाट काय सांगावा ! खालच्या मजल्यापासून तिसऱ्या मजल्यापर्यंत मारे हंड्याझुंबरें लागलीं आहेत, शेंकडों नोकर काम करताहेत इत्यादि काय काय ह्मणून प्रकार सांगूं ? त्या दिवशीं पन्नास बायका मुली जेवायला होत्या, त्या सर्वांना रुप्याचीं ताटें मांडलीं होतीं. आमच्या विहिणींचा थाट तर काय विचारायलाच नको. तूं कलकत्त्यास गेलीस ह्मणजे तुला तें सर्व वैभव पहावयास सांपडेल. जा, सुखानें रहा. वारंवार उमेच्या घरीं जात जा व दोघीजणी सख्ख्या बहिणीप्रमाणें वागा बरें. इ. इ.

नंतर बिंदू शरत्च्या आईचा निरोप घेण्याकरितां तिजकडे गेली. शरत् कलकत्त्यास राहिल्यापासून त्याची आई घरांत एकटीच रहात असे. शरत्नें आईची पुष्कळ समजूत करून घरांत एक मोलकरीण ठेविली होती, घरांत स्वैपाकाकरितां एक बाई ठेवण्याचें शरत्च्या मनांत फार होतें. पण त्याच्या आईनें ती गोष्ट मुळींच कबूल केली नाहीं. घर चांगलें प्रशस्त होतें, घरांत एक दिवाणखाना होता. शरत् कलकत्त्याहून आला ह्मणजे त्याची बैठक तेथेंच असे. घराच्या मागें एक सुंदर पुष्करणी होती व तिचें पाणी अमृताप्रमाणें गोड होतें.

शरत्ची आई गोरी व सडपातळ होती. पतिनिधनापासून ती आपल्या शरीराची बिलकुल काळजी वाहत नसे. उन्हाळा असो, थंडी असो, बारा महिने अठराकाळ ती मोठ्या पहाटेस स्नान करी व एक प्रहरभर पूजा अर्चा करी, नंतर स्वहस्तानें स्वैपाक करी. पतीच्या मृत्यूमुळें व मुलीच्या काळजीमुळें दिवसेंदिवस ती अगदीं वाळत चालली, व तिच्यावर अकालीं वार्धक्याची कळा दिसूं लागली. सारा दिवस ती ईश्वरनामस्मरणांत व पारमार्थिक विचारांत घालवी. शरत् चांगला

विद्वान् व कीर्तिमान् व्हावा एवढीच काय ती तिची इहलोकची आशा उरली होती.

हेमचंद्र, बिंदु व सुधा यांना आशीर्वाद देऊन ती वृद्धा ह्मणाली, " जा बरें, ईश्वर तुमचें कल्याण करो व उत्तरोत्तर तुमची भरभराट होवो ! शरत् नांवालौकिकास यावा एवढीच माझी अखेरची इच्छा आहे. बाळा शरत्, ह्यांच्या खाण्यापिण्याचे बिलकुल हाल होऊं देऊं नकोस. बिंदूच्या मुलाची व सुधेची चांगली तरतूद ठेव. "

सुधेचा विचार मनांत येतांच ह्मातारीच्या डोळ्यांतून अश्रु वाहू लागले. वैधव्यदुःख काय असतें याचा अनुभव तिला असल्यामुळें सुधे-संबंधानें तिचें काळीज कळवळलें.

नंतर इकडच्या तिकडच्या पुष्कळ गोष्टी झाल्यावर शरत्च्या आईनें त्या सर्वांना चांगला उपदेश केला व कलकत्त्यास मोठ्या सावधगिरीनें राहण्यास सांगितलें. शरत्लाही झटून अभ्यास करण्यास सांगितलें; सर्वांनीं तिच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचें वचन दिलें. शरत्नें तर इतकेंही सांगितलें कीं ज्या दिवशीं तुझ्या उपदेशाविरुद्ध माझ्या हातून वर्तन घडेल तो दिवस माझ्या आयुष्याचा शेवटचा समज.

सर्वजण निघून गेले, ते दृष्टीच्या आड होईपर्यंत ह्मातारी त्यांच्या रस्त्याकडे पहात राहून नंतर मोठ्या कष्टानें घरांत गेली. हेमचंद्र घरीं आला आणि पाहतो तों सनातन कैवर्त घरीं उभा. बिंदूनें आदल्याच दिवशीं आपली जमीन त्याजकडे खंडानें दिली होती त्याबद्दल आपली कृतज्ञता दाखविण्याकरितां तो भेटावयास आला होता. त्याची पत्नी ही सुधेचें आवडतें दहीं घेऊन त्याजबरोबर आली होती. बिंदूनें तिला पुष्कळ नको ह्मणून सांगितलें, पण तिनें कांहीं ऐकलें नाहीं. ती ह्मणाली, गाडींत जर ठेवायला जागा नसली तर मी स्टेशनापर्यंत आणून पोंचवितें. इतकें ह्मटल्यावर तिचा निरुपाय झाला. गाडी चालूं झाली व ती सर्व मंडळी दोन प्रहरच्या सुमारास वर्धमान स्टेशनावर दाखल झाली.

नंतर स्टेशनाशेजारच्या एका घरांत त्यांनीं स्वैपाक वगैरे करून मोजनें आटोपलीं व ते स्टेशनावर येऊन गाडीची वाट पहात बसले.

दोन वाजल्यावर गाडी सुटण्याची वेळ होती. दीड वाजला नाहीं तोंच सर्व स्टेशन माणसांनीं भरून गेलें. पुष्कळ दिवसांत ष्टेशनवर गेला नसल्यामुळें हेमचंद्र त्या जनसमूहाचें मोठ्या औत्सुक्यानें निरीक्षण करूं लागला. निरनिराळ्या प्रांतांतील नानातऱ्हेचे लोक नानातऱ्हेच्या उद्देशानें स्टेशनावर जमलेले पाहून हेमचंद्राच्या मनांत अनेक तऱ्हेचे विचारतरंग उभे राहिले. मारवाड बिकानेरचे मारवाडी मोठमोठालीं गांठोडीं घेऊन व्यापाराकरितां कलकत्त्यास निघाले आहेत, गया, पाटणा वगैरे प्रांतांतील काटक व बहुश्रमी बिहारी लोक चाकरीकरितां कलकत्त्यास चालले आहेत. काशी, प्रयाग वगैरे तीर्थयात्रा आटोपून कित्येक बंगाली लोक परत घरीं चालले आहेत. बंगाली स्त्रिया जात्या अशक्त व गृहप्रिय, पण तीर्थयात्रेच्या उद्देशानें घराबाहेर पडल्या ह्मणजे कसलेही कष्ट न जुमानतां त्या मथुरा, वृंदावन, पुष्कर व द्वारकेपर्यंतही जाऊन येतात. शाळेंतील विद्यार्थी सुट्टी संपल्यामुळें परत कलकत्त्यास निघाले आहेत. चाकरीकरितां परदेशीं गेलेले कित्येक लोक परत आपल्या घरीं निघाले आहेत. अशा तऱ्हेचे निरनिराळे लोक पाहून हेमचंद्राला मोठी मौज वाटली.

दोन वाजल्यावर गाडी सुटली व पांच वाजतां कलकत्त्यास पोंचली. शरत्‌नें एक भाड्याची गाडी ठरविली आणि ते सर्वजण गाडींत बसून भवानीपुरास शरत्‌च्या घरीं जावयास निघाले;

हावऱ्याच्या पुलावर गाडी येतांच गंगेच्या प्रवाहात हजारों तारवें व नावा व पलीकडच्या कांठावरील मोठमोठे घाट व उंच उंच इमारती पाहून बिंदूला मोठा विस्मय वाटला. पुढें गाडी जेव्हां बडाबाजार व चिनाबाजारांत आली तेव्हां तर दोघी बहिणी आश्चर्यानें अगदीं थक्क झाल्या. रस्त्याच्या दोहोंबाजूला मोठमोठालीं दुकानें लागलीं आहेत. कापडवाल्यांच्या दुकानांत देशी व विलायती कापड, बनारसी साड्या,

मच्छलीपट्टनचीं चिटें, फ्रान्सचें रेशमी कापड, तसेंच युरोपांतील निरनिराळ्या देशाचे गालिचे, पडदे वगैरे सामान खच्च भरलें आहे. जवाहिरवाल्यांच्या दुकानांत नानाप्रकारचें जवाहीर व सोन्यामोत्याचे दागिने व्यवस्थितरीतीनें मांडले आहेत. कांचवाल्याच्या दुकानीं शेंकडों हंड्या, झुंबरें, दिवालगिऱ्या, दिवे लटकले आहेत. कासारांच्या दुकानांत अनेक तऱ्हेचीं भांडीं पडलीं आहेत. सुतार, लोहार आपआपल्या कामांत निमग्न झाले आहेत, रस्ते माणसांनीं फुलून गेले आहेत, गाड्यांच्या गर्दीमुळें माणसांना वाट मिळत नाहीं इत्यादि सर्व प्रकार पाहून बिंदू मनाशीं ह्मणाली, अहाहा ! केवढें हें अफाट शहर ! इतके लोक कोठून व काय कामाकरितां येथें आले असावेत, ! इतक्या जिनसा कोण खरेदी करीत असेल ! इ. इ.

संध्याकाळच्या सुमारास बिंदूची गाडी चिनाबाजारच्या बाहेर पडून मैदानाच्या रस्त्याला लागली. मैदानावरील इंग्रजी व्यापाऱ्यांचीं प्रासादतुल्य उंच उंच दुकानें पाहून आपण झोंपेंत आहों कीं जागृत आहों याचा बिंदूला भ्रम पडला. नंतर वाटेनें जातां जातां किल्ला व लाट साहेबांचा बंगला त्यांच्या दृष्टीस पडला. यावेळीं अंधार पडूं लागला असल्यामुळें इंद्रपुरीतुल्य चौरंगींत विद्युद्दीप प्रकाशीत केले होते. ईडन गार्डनमध्यें बँड सुरू होता. भारतवर्षाच्या राजधानीची ही अपूर्व शोभा पाहून बिंदु व सुधा आनंदसागरांत पोहूं लागल्या.

पुढें गाडी चालतां चालतां दिवसाच्या व प्रवासाच्या परिश्रमानें थकून सुधा हेमचंद्राच्या अंगाला टेंकून झोंपीं गेली. बिंदूचेही डोळे मिटूं लागले होते. शरत्नें बिंदूच्या वडील मुलाला मांडीवर निजविलें होतें. जसजसें घर जवळ येऊं लागलें तसतसें पुढें काय होणार, आपला हेतु सफल होईल कीं नाहीं इत्यादि विचारांनीं हेमचंद्राचें अंतःकरण व्याप्त झालें. अखेरीस ते सर्व घरीं येऊन पोंचले.

एकादश परिच्छेद.

कलकत्त्याचा बडाबाजार

बिंदु—बाळसुधे, एकवेळ इकडे ये पाहूं.

सुधा— ताई, मला हाक मारलीस होय ?

बिंदु— हीं एवढीं चिरगुटें धुऊन ठेविलीं आहेत तीं माडीवर वाळत घाल. मी विहिरीच्या दोन घागरी पाणी घेऊन येतें. आठ वाजून गेले, आतां गवळण दूध आणील तें चुलीवर ठेव. येथें विहिरीच्या पाण्यानें स्नान करण्यापेक्षां आपल्या खेडेगांवचे तलाव चांगले, वाटेल तितकें पाणी घेतां येतें. शिवाय येथल्या विहिरीच्या पाण्याला घाण तरी किती मारते, पाहिलेंस ना ?

सुधा— मला वाटतें, कलकत्त्याचें तुला सर्व कांहीं वाईट दिसतें. येथें नळाचें पाणी किती छान असतें. पिण्याकरितां आपण एक घागर आणतों तें पाणी किती स्वच्छ व गोड असतें तुला माहीत नाहीं ?

बिंदु०—तुझी कलकत्त्याची प्रशंसा पुरे झाली.

सुधा०—येथें तुला काय गैर दिसतें सांग पाहूं. केवढें अफाट शहर, दुकानें किती, बाजार किती, गाड्याघोडे किती, आपल्या तालपुष्करास यांतलें कांहीं तरी आहे काय ?

बिंदु०—नसलें तर नसो, पण त्याची सर का कलकत्त्याला येणार आहे ? तेथें घरासभोंवतीं जागा किती प्रशस्त, हवा किती चांगली, तेथले लोक परस्परांशीं किती मिळूनमिसळून वागतात, त्यांतलें येथें कांहीं दिसतें कां ? ज्यांच्या घरीं गाड्याघोडे आहेत त्यांच्या घरीं आहेत. सर्वांच्या तर घरीं नाहींत ना ? पांच-पांच सातसात मजली घरांना कां नुसतें चाटायचें आहे ? घरांत हवा यायची नाहीं, सूर्यप्रकाशाचें नांव नाहीं, सर्व व्यवहार असल्या अंधारमय व कोंदटलेल्या जागेंत. शेजाऱ्यापाजाऱ्याकडे जाईन म्हटलें तर सोय

नाहीं. मेण्याशिवाय घराबाहेर पडतां येत नाहीं—माझी तर अगदीं पिंज-ऱ्यांतल्या पक्ष्याप्रमाणें स्थिति झाली आहे.

सुधा—असें कां ह्मणतेस ? त्या दिवशीं आपण गाडी करून चिडि-याबागेंत गेलों होतों तेव्हां आपण किती तरी मौज पाहिली. ! नुसतें गाडींत बसून निघालें कीं, अनेक मौजेच्या गोष्टी दृष्टीस पडतात.

बिंदु—मला गाडींतून फिरावयास जाणें बिलकुल आवडत नाहीं. आपलें तालपुष्कर किती तरी छान, तेथें मोकळ्या हवेंत फिरावयास सांपडतें, सर्वांच्या घरीं जातां येतें, सर्वांच्या ओळखी असतात, येथें कोणाची तरी ओळख आहे का ?

सुधा—एकदम कशी ओळख होणार ? होतां होतां होईल. त्यादि-वशीं देवी प्रसन्नबाबूची मुलगी आली होती, ती माझ्याशीं कितीवेळ बोलत बसली होती. शिवाय चंद्रनाथबाबूंनीं काल आपल्याकडे किती-तरी खाण्याच्या जिनसा पाठवून दिल्या.

बिंदु—तूं ह्मणतेस तें खरें, पण आपण येथें आहों तोंपर्यंतच त्यांची ओळख, पुढें काय आहे ? ते पडले मोठे लोक. आपल्याशीं दोन गोड शब्द बोलतात ही त्यांची कृपा आहे इतकेंच.

सुधा—शिवाय शरत् रोज संध्याकाळीं आपल्याकडे येऊन किती गोष्टी सांगतो. ताई, खरोखर त्या गोष्टी मला फार आवडतात.

बिंदु—वा:, शरत्सारखा मुलगा फारच विरळा. परीक्षेकरितां त्याला फार अभ्यास करावा लागतो, तरी तो आपली खबर घेण्याकरितां इकडे येण्यास कधींही चुकत नाहीं. जोंपर्यंत आपण त्याच्या घरीं होतों तोंपर्यंत त्याला अभ्यासाला फुरसतच मिळत नसे. सदासर्वकाळ आमच्या तरतुदींत निमग्न. त्याला पैशाचा, का विद्येचा कसलाच अभिमान नाहीं. शिवाय दयाळुही तसाच.

सुधा—ही पहा गवळण आली.

बिंदु—कांग, आज तरी चांगलें दुध आणलें आहेस; का कालच्या

सारखेंच पाणी मिसळून आणलें आहेस ? तुझ्या कलकत्त्यास नळाच्या पाण्याला तोटा नाहीं व तुजजवळ दुधाचा तोटा नाहीं, नुसता पांढरा रंग राहिला ह्मणजे बस.

गवळण—छे, छे, तुमच्या घरीं तसलें दूध देऊन कसें चालणार ? तुह्मी थोडें जिभेवर ठेवून पहाना वाटलें तर.

बिंदु—नको ठेवायला. आमच्या तालपुष्करास आह्मी रोज पाऊण शेर दूध घेत होतों. त्यांत आमची चंगळ होत होती; पण येथें तूं सवाशेर दूध घालतेस तेवढ्यानें मुलांचें सुद्धां भागत नाहीं.

गव– खेडेगावांतल्या सारखें दूध येथें कसें मिळणार ? तेथें वैरणकाडीचा फारसा खर्च नसतो, गुरांना चरायला मुबलक असतें. त्यामुळें तीं दूधही पुष्कळ आणि चांगलें देतात. आमच्या ठाणबंदी गुरांचें तसें का आहे ?

बिंदु— काल तुला दहीं आणावयास सांगितलें होतें तें आणलें आहेस का ?

गव—हो, हें पहा आणलें आहे.

बिंदु– काय, हें चार पैशाचें दहीं ?

गव०—चार पैशाचें दहीं आणखी किती असणार ? पाहिजे तर तुह्मी आपल्या मोलकरणीला बाजारांत चौकशी करायाला पाठवा आणि तिनें जर जास्ती येतें ह्मणून सांगितलें तर मला मुळींच पैसे देऊं नका. मग तर झालें ना ? कालीमातेची शपथ मी तुह्मांस फसवीत असेन तर.

बिंदु०—सुधे, हें बघ तुझ्या आवडत्या कलकत्त्यांतलें चार पैशाचें दहीं त्यांत थोडें पाणी घातल्याशिवाय कालवणाला तरी पुरे पडेल कां ? ही पहा मोलकरीण आली.

मोल०—काय बाईसाहेब ?

बिंदु०—आज जरा लवकरच बाजारांत जा. आज घरांतून दहा वाजतां येणें व्हायचें आहे, तर भाजी वगैरे लवकरच आण. कांग येथें कोबी, परवरें, वगैरे भाज्या मिळत नाहींत कां ?

मोल०—न मिळायला काय झालें ? सर्व कांहीं मिळतें, पण अति महाग. कोबीच्या एकेका फुलाला व कांद्याला चार चार सहा सहा पैसे पडतात व परवरें दोन आणे तीन आणे शेराखालीं मिळतच नाहींत.

बिंदु—तूं हें सांगतें आहेस तरी काय ? कलकत्त्यांतले लोक कांहीं खातपीत नाहींत वाटतें. नुसते गाड्याघोडेच उडवितात.

मोल०—खातपीत नसायला काय झालें ? ज्याला जशी ऐपत असेल तसें तो खातो पितो. आह्मी रोज भाजीकरितां पैसा अधेला खर्च करणार, त्यांत चांगल्या भाज्या कोठल्या येणार ?

बिंदु—बरें, वांगीं, मुळें, तर मिळतील ना ?

मोल०—सध्यां वांग्यामुळ्याचें नांव काढूं नका. त्यांना देखील भारी दर. आमच्या घरीं चार चार दिवसांत भाजीपाल्याचें दर्शन नसतें. तुमच्यासारख्याकडून आह्माला पोटाला मिळतें ह्मणून आमचा येथें निभाव लागतो, नाहींतर उपासमारीचाच प्रसंग !

बिंदु—तुला जी चांगली वाटेल ती भाजी आण व एक पैशाच्या कैऱ्या घेऊन ये ह्मणजे पन्हें तरी करूं. आमच्या गांवीं भाज्या व कैऱ्या कधीं विकत आणाव्या लागत नसत. येथें पहावें तों सर्व विकत आणावें लागतें.

नंतर बिंदूनें मोकरणीला पैसे देऊन बाजारांत पाठविलें व आपण आंगधुणें आटोपून स्वयपाकघरांत चूल पेटविण्याच्या उद्योगास लागली. नंतर तिनें दूध तापवून मुलें उठलीं होतीं त्यांना खाऊं पिऊं घातलें. थोड्या वेळानें मोलकरीण बाजार करून आली. तिच्याजवळ मुलांना ठेवून बिंदु पन्हां स्वयपाकाच्या उद्योगास लागली. घरांत मोलकरणीशिवाय दुसरें कोणी नसल्यामुळें दोघी बहिणीच स्वयपाक करीत असत. नवीन बिन्हाडांत आल्यापासून कोठींचें काम सुधेनें आपल्याकडे घेतलें होतें. तिनें सर्व साहित्य काढून ठेविलें, भाज्या चिरल्या, तांदूळ धुतले व भोंवतालचें इतर सर्व काम करून टाकलें. नंतर बिंदु स्वयंपाकास लागली.

आरंभीं कांहीं दिवस शरत्च्या घरीं राहून नंतर हेमचंद्रानें भवानी-पुरांत एक लहानसें घर भाड्यानें घेऊन स्वतंत्र बिऱ्हाड केलें हें वाचकांना माहीत आहेच. निराळें बिऱ्हाड करूं नये ह्मणून शरत्नें आपली पराकाष्ठा करून पाहिली, पण आमच्या राहण्यानें तुझ्या अभ्यासास व्यत्यय येईल ह्या सबबीवर हेमचंद्रानें तें मान्य केलें नाहीं. शरत्चा अखेर निरुपाय झाला.

भवानीपुरांत शरत्बाबू पुष्कळ दिवस असल्यामुळें त्याची बरेच जणांशीं ओळख होती. त्या मंडळीशीं हेमचंद्राचाही परिचय जडला. त्यांपैकीं कोणी हायकोर्ट वकील होते, कोणी मोठमोठ्या दुकानचे मुनीम होते, कांहीं नुसते कफल्लक पण बढाईखोर मात्र होते. हेमचंद्राचा वरील मंडळीशीं परिचय झाल्यावर कित्येकांनीं त्यास आपल्या घरीं एक दोन वेळ भोजनास निमंत्रण केलें, कित्येकांनीं नूतन शिष्टसंप्रदायाप्रमाणें " आपल्या ओळखीमुळें " आह्मांला फार आनंद झाला एवढेंच शब्दांनीं व्यक्त केलें. कित्येक हेमचंद्र आपल्याकडे कांहीं स्वार्थहेतूनें आला आहे असें जाणून त्यास तासांचे तास दिवाणखान्यांत तिष्ठत बसवून आपण घराचे बाहेर पडण्याचे वेळीं त्याची गांठ पडतांच हस्तिदंती नमस्कार करून " आज फार ' बिझी ' असल्यामुळें आपली गांठ घेण्यास सवड झाली नाहीं " अशी वरवर दिलगिरी दाखवून दाराशीं उभ्या असलेल्या माडींत बसून निघून जात. अशाप्रकारच्या नूतन परिचित मंडळीचा हेमचंद्रास अनुभव आला.

लहानपणीं हेमचंद्र कलकत्त्यास होता त्यावेळीं बडा बाजार हाच कलकत्त्यांतील सर्वांत मोठा बाजार असा त्याचा समज होता, पण हल्लीं बड्या बाजारापेक्षांही अधिक मोठा बाजार कलकत्त्यास आहे व त्यांतल्या वखारी मालांनीं अगदीं गच्च भरल्या आहेत व तो माल खरेदी करण्याकरितां गिऱ्हाइकांच्या उड्यावर उड्या पडताहेत असें त्यास आढळून आलें. अंगीं गुण किंवा विद्या असली ह्मणजे नावलौकिक होतो, असा पुस्तकीज्ञानानें विद्यार्थीदशेंत त्याचा समज झाला

१० सं.

होता, पण तो समज लवकरच दूर झाला व त्याला असें आढळून आलें कीं नांवलौकिक हा पदार्थ कमी अधिक किंमतीनें बाजारांत विकत मिळतो. कोणी मोठमोठे खाने देऊन, कोणी गार्डन पार्ट्या करून, कोणी पैसे देऊन, कोणी गरिबांना लुबाडून मारे नांवलौकिकाची खरेदी करण्यांत गर्क झाला आहे असें त्याच्या प्रत्यहीं नजरेस येऊं लागले.

ह्या बड्या बाजारांत कोठें कोठें "देशहितैषिता," "समाजसंस्कार वगैरे विलायती मालाची विलायती दरानें विक्री चालली होती. त्या बाजारांतही लोकांची खूप गर्दी असून कौन्सिलहॉल, टाउनहॉल, म्युनासिपाल हॉल वगैरे सार्वजनिक इमारती गिऱ्हाईकांच्या गलबल्यानें अगदीं दुमदुमून गेल्या होत्या. ह्या बाजाराच्या अगदीं समोर दुसऱ्या एक प्रकारच्या मालाची विक्री चालली होती, दुकानदार कंठशोष करून आपल्या मालाची प्रशंसा करीत होते—तो माल ह्मणजे "समाजसंरक्षण" हा माल अस्सल देशी, ह्यांत विलायतीची बिलकुल भेसळ नाहीं. हेमचंद्रानें त्या मालाचा मासला पाहिला तों माल सोळा आणे विलायती. विलायतीं पात्रांत भरलेला, विलायती मसाला घातलेला पण वरून मात्र देशी तुपाचा हात लावलेला. अशा प्रकारचा गरमागरम माल खरेदी करण्यासाठीं गिऱ्हाईकांच्या झुंडीच्या झुंडी त्या बाजाराकडे लोटत होत्या व आपल्याला हवा तितका माल खरेदी करीत होत्या.

त्यापुढें साधुत्वाचा बाजार, शास्त्रीय ज्ञानाचा बाजार, पांडित्याचा बाजार—हेमचंद्र पाहणार तरी किती ? तें सामान्य पांडित्य नव्हे, असाधारण पांडित्य; एक शास्त्रांत नव्हे, सर्व शास्त्रांत; एक भाषेंत नव्हे, अनेक भाषांत; एक विषयांत नव्हे, सर्व विषयांत; कोणत्याही विषयांत कमी जास्त नाहीं, सर्वांत सारखें प्रावीण्य. त्या गाढ पांडित्याच्या लाटांनीं सर्व बाजार कर्दममय झाला होता. हेमचंद्राच्यानें त्याठिकाणीं उभें राहवेना, तो तेथून झटकन् निघून गेला.

. त्यानंतर धर्माचा बाजार, यशाचा बाजार व परोपकारितेचा बाजार पाहून हेमचंद्र अगदीं थक झाला. अमुक एक पदार्थाची ह्मणजे खरेदी-विक्री होत नाहीं असा पदार्थच कलकत्त्यास त्याला आढळेना. ज्यांत दोन पैसे फायदा होईल अशा प्रत्येक वस्तूंचें तेथें दुकान असावयाचेंच. मालाचे गुणावगुण कांहीं असोत, पण दुकानावर मात्र एक मोठा भपकेदार " साइनबोर्ड " लटकावून ठेवला कीं गिऱ्हाईकांच्या उड्यावर उड्या पडावयाच्या. लहानपणीं तो येथें असतांना बड्या बाजारांतील व्यापाऱ्यांच्या शहाणपणाची प्रशंसा करीत असे; पण हल्लीं ह्या नव्या बड्या बाजारांतील व्यापाऱ्यांचें चातुर्य पाहून तो आश्चर्यचकित होऊन गेला.

कलकत्त्यांत बरेच दिवस राहणें झाल्यामुळें कांहीं खराही माल त्याच्या दृष्टीस पडे. तो माल ह्मणजे खरी देशहितैषिता, परोपकारिता वगैरे. पण तो माल एखाद्या गलिच्छ व भिकार दुकानांत असल्यामुळें त्याची चौकशी करणार कोण व त्याला गिऱ्हाईक तरी कोठलें आढणार ? अशा स्थितीमुळें तो माल नुसता पडूनच राहिला होता.

द्वादश परिच्छेद.

लहान तोंडीं मोठा घांस.

आषाढ महिना सुरू झाल्यामुळें आकाश मेघाच्छादित होऊन वर्षाकालास आरंभ झाला. कलकत्त्यास आपल्यास कांहीं रोजगार मिळावा अशी हेमचंद्राची फारशी इच्छा नव्हती. कोठें संधान जुळलें तर ठीक, नाहीं तर सहा महिन्यांनीं परत आपल्या गांवीं जाण्याचा त्याचा आधींपासून संकेत होताच. तरी पण त्यानें रोजगार धंदा मिळविण्याच्या कामीं प्रयत्न करण्यास कसर केली नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखा तो त्या उद्योगांत असे.

संध्याकाळचे वेळीं तो दमून भागून घरीं येत असे. घरीं आल्याबरोबर बिंदु गोड भाषणानें त्याचे श्रम परिहार करण्यास तत्पर असे. स्वामिसेवा व मुलांची शुश्रूषा हींच काय तीं बिंदूचीं आद्य कर्तव्यें असत. ह्यां कामांत ती सकाळपासून संध्याकाळपर्यंत निमग्न असे, यामुळें ती हल्लीं विशेष कृश व म्लान दिसूं लागली होती.

रोज संध्याकाळीं शरत् हेमचंद्राची गांठ घेण्याकरितां येत असे. सर्वजण एके ठिकाणीं बसून पुष्कळ रात्र होईपर्यंत त्यांच्या नानाप्रकारच्या गप्पा गोष्टी चालत. कलकत्त्यास जें कांहीं नवें पाहिलें असेल त्याच्या गोष्टी हेमचंद्र सांगे; शरत् कॉलेजांतल्या गोष्टी, पुस्तकांच्या गोष्टी आपल्या शिक्षकाच्या व सहाध्यायांच्या गोष्टी, सुखदुःखाच्या गोष्टी वगैरे सांगत असे. गोष्टी सांगतांना त्याचा उत्साह, धर्मपरायणता व दृढ प्रतिज्ञाहीं क्षणोक्षणीं व्यक्त होत असत. जगांतील विश्वासघात व दुष्टाचरणाच्या गोष्टी सांगूं लागला ह्मणजे तो अगदीं लाल होई व त्याच्या डोळ्यांतून ठिणग्या पडताहेत कीं काय असा भास होत असे.

शरत्च्या गोष्टी ऐकून हेमचंद्राला व बिंदूला अतिशय आनंद होत असे व त्याचा तो उल्हास व आवेश पाहून तीं त्याला धन्यवाद देत असत. बालिका सुधा देखील निद्रा विसरून एकाग्रचित्तानें त्याचें अमृततुल्य भाषण ऐकत बसे.

कलकत्त्यास जें जें कांहीं नवीन दृष्टीस पडे त्याची हकीगत हेमचंद्र संध्याकाळच्याच बैठकींत सांगत असे. एके दिवशीं बड्या बाजाराच्या वैभवाचें वर्णन करीत असतां हंसत हंसत ह्मणाला "शरत्, देशहितैषिता, परोपकारिता वगैरे मनुष्यमात्राचे प्रधान गुण खरे, पण त्या सद्गुणांच्या नांवावर तुमच्या कलकत्त्यांत कोण लबाडी चालली आहे तें पाहून मोठें आश्चर्य वाटतें! आमच्या खेडेगांवांत स्वदेशहितैषिता कमी हें मला मान्य आहे, पण त्या मानानें तेथें लबाडीही कमीच."

शरत्– आपलें ह्मणणें रास्त आहे, मोठमोठ्या शहरीं लबाडी फार,

पण खरे सद्गुण कलकत्त्यांत आढळत नाहींत कीं काय ? खरी देशहितैषिता, सत्याचरण, विद्यानुराग, यशोलिप्सा वगैरे मानवहृदयास उन्नत करणारे सद्गुण येथें आपल्या दृष्टीस पडले नाहींत काय ?

हेम०— नाहीं असें मी ह्मणत नाहीं. येथें जी खरी देशहितैषिता दृष्टीस पडते, स्वदेशोन्नतीसाठीं येथें जे प्रयत्न चालले आहेत त्याची तोड खेडेगावांत सांपडावयाची नाहीं. इतकेंच नव्हे तर पुस्तकांशिवाय अन्यत्र कोठेंही दृष्टीस पडणार नाहीं. विद्याभिरुचिही तशीच. मी कलकत्त्यास येईपर्यंत खरी विद्याभिरुचि ह्मणजे काय याची मला कल्पनाही नव्हती. केवळ ज्ञानोपार्जनाकरितां व स्वदेशबांधवांस शहाणे करतां यावें ह्याच हेतूची विद्याभिरुचि कलकत्त्यास दृष्टीस पडली. शरत्, कलकत्त्यास अनेक सद्गुण माझ्या नजरेस आले. पण ज्या ठिकाणीं सद्गुण आहेत, त्याच ठिकाणीं त्याच्या दसपट ढोंगही पण असतें. येथें खरे देशहितैषी जर दहा लोक असतील तर शंभर लोक नुसती बडबड करणारे व पोकळ फुशारकी मारणारे असतील. माझ्या मतें वाईट तें हेंच.

शरत्—हा दोष त्यांचा का आमचा ? बिंदुताई, ह्या चटईत ढेंकूण आहेत वाटतें.

बिंदु०:—कां चावताहेत कीं काय ?

शरत्—चावत नाहींत, पण आपलें विचारिलें, आहेत कीं काय !

बिंदु—आमच्या घरांत ढेंकणाचें नांव नाहीं. कारण, मी रोज सर्व हंथरुणें व बिछाने उन्हांत घालतें. घरांत घाण ह्मणून मुळींच राहूं देत नाहीं.

शरत्—त्या दिवशीं मी आणि हेमबाबू देवीप्रसन्न बाबूंच्या घरीं गेलों होतों. त्या घरीं देखील ढेंकूण दृष्टीस पडले नाहींत. याचें कारण काय बरें असावें बिंदुताई ?

बिंदु—दुसरें कारण काय, स्वच्छता. घरांत केरकचरा झाला कीं यांची उत्पत्ति झालीच ह्मणून समजावें.

शरत्—त्याचप्रमाणें समाजही निर्मल राहला नाहीं कीं त्यांत लबाडीचें बीज शिरणारच. आह्मी जर परनिंदेची हांव धरली तर परनिंदेचा व्यापार सुरू झालाच. एखाद्या अहंमन्याच्या वायफळ बडबडीला भुलून जर आह्मी त्याचे देव्हारे माजवूं लागलों तर तसल्या मूर्खपणाचीही बाजारांत किंमत येणार. देशहिताच्या नुसत्या वल्गनेला आह्मी जर भाळूं लागलों तर तसलें देशहित गल्लोंगल्लीं बोकाळूं लागेल. जो माल लोकांना पसंत असतो त्या मालाची चढाओढीनें भराभर विक्री होते. ज्या सद्गुणाची आह्मांला आवड त्याची बाजारांत रेलचेल असावयाचीच. तेव्हां हा दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे.

बिंदू—तें समजलें, पण बिछान्यांत ढेंकूण झाले तर बिछाना उन्हांत टाकतां येतो; चिरगुटापांघरुणांत झाले तर तीं परटाकडे धुवावयास देतां येतात तसें समाजांत कीटकांचें बीज शिरलें ह्मणजे काय उपाय करावयाचा ? समाजाला का परटाकडे पाठवितां येतें का उन्हांत टाकतां येतें ?

शरत्—समाज निर्मल राहण्याचाही उपाय आहे. ज्याप्रमाणें सूर्याच्या उष्णतेनें बिछान्यांतील ढेंकूण बाहेर पडतात त्याप्रमाणें खऱ्या शिक्षणाच्या प्रभावानें समजांतील अनिष्टकर जंतु बाहेर पडून नाहींसे होतात. शिक्षणानें जर तें साध्य झालें नाहीं, तर तें खरें शिक्षणच नव्हे. देशहितैषितेच्या नुसत्या वल्गनेला जर आह्मी भाळलों नाहीं तर तिला कोण विचारणार ? तेव्हां एकंदरींत असली ही बेगडी सामग्री उत्पन्न होत आहे ती केवळ आपल्याच मूर्खपणामुळें.

हेम०—शरत्, तुझा उत्साह पाहून मोठा आनंद होतो, पण केवळ शिक्षणाच्या योगानें समाजांतील प्रतारणा व प्रवंचना ह्यांचा एकदम लोप होईल असें मला वाटत नाहीं. शिक्षित व सुधारलेल्या देशांत जितकी प्रतारणा आहे तितकी आपल्या देशांत नाहीं. मनुष्यहृदयांत जोंपर्यंत सुप्रवृत्ति व कुप्रवृत्ति या दोहींचें वास्तव्य आहे तोंपर्यंत जगांत धर्माचरण

व प्रतारणा हीं राहणारच. तथापि खऱ्या शिक्षणाच्या योगानें समाजाची कर्तव्यसाधनवासना उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाईल असें माझेंही मत आहे.

बिंदु—तुमच्या कॉलेजांत असलें शिक्षण मिळत नाहीं का ?

शरत्—बिंदुताई; कॉलेजांतील शिक्षणाला बरेच लोक नांवें ठेवतात तसें मी करीत नाहीं. ज्या शिक्षणाच्या योगानें आह्माला सुधारलेल्या राष्ट्रांतील महात्म्यांचें जीवनचरित व त्यांच्या अचाट कृतींचें ज्ञान व सृष्टिनियमांचें ज्ञान प्राप्त होतें त्या शिक्षणाला वाईट कां ह्मणावयाचें ? ह्या शिक्षणापासून ज्यांना फायदा करून घेतां येत नाहीं, तो त्यांच्या स्वभावाचा दोष, शिक्षणाचा नव्हे. कलकत्त्यास जी थोडीबहुत खरी देशहितैषिता व खऱ्या उन्नतिची इच्छा आज दिसते आहे ती पन्नास वर्षांपूर्वीं होती त्यापेक्षां अधिक आहे. त्याचें कारण केवळ सध्यांचें शिक्षण व ह्याच शिक्षणाच्या योगानें आणखी पन्नास वर्षांनीं हे सद्गुण जास्त दिसूं लागतील यांत संशय नाहीं. कित्येक शतकें लोटल्यानंतरही पाश्चात्य सुधारलेल्या राष्ट्रांशीं आपल्याला बरोबरी करतां येईल कीं नाहीं याचा संशय आहे; पण परमेश्वरकृपेनें दिवसेंदिवस आपलें पाऊल पुढें पडत चाललें आहे. आत्मविसर्जन व कर्तव्यसाधनांत अतिशय उत्साह व नेट हा उन्नतीचा एक मार्ग आहे. त्या आत्मविसर्जनांत व निष्काम कर्तव्यसाधनांत आपण किती प्रवीण झालों आहों याचा विचार करूं लागलों ह्मणजे काळीज करपून जातें.

गोष्टी होतां होतां फार रात्र झाली, ह्मणून शरत् घरीं जाण्याकरितां उठला. त्याच्या बरोबर हेमचंद्र दरवाजापर्यंत आला आणि बाहेर पाहतो तों स्वच्छ चांदणें पडलें होतें व सुंदर वारा वाहत होता ह्मणून दोन पावलें, चार पावलें करतां करतां तो शरत्बरोबर बराच दूर गेला. रस्त्यानेंही त्यांच्या गोष्टी चालल्याच होत्या. देवीप्रसन्नबाबू हवा खाण्याकरितां सहज बाहेर पडला होता. त्याची हेमचंद्र व शरत् यांशीं सहज गांठ पडल्यामुळें तोही त्यांच्या बरोबर शरत्च्या घरापर्यंत गेला.

देवीप्रसन्नबाबूबरोबर परत येतांना हेमचंद्र ह्मणाला, " मीं कॉले-जांतील अनेक विद्यार्थी पाहिले, अनेकांशीं माझें संभाषण झालें. पण शरत् प्रमाणें उद्योगी, उत्साही कर्तव्यतत्पर असे विद्यार्थी फारच थोडे माझ्या पाहण्यांत आले. "

देवीबाबू ह्मणाला " खरेंच, मुलगा मोठा चांगला व गुणी आहे, आईबापांचें नांव राखील. पण ह्या विद्यार्थीदशेंत लहान तोंडीं मोठा घांस घेण्याची त्याला संवय लागली आहे. त्यामुळें पुढें तो फाजील न निघो ह्मणजे झालें. "



त्रयोदश परिच्छेद.

देवीप्रसन्नबाबू.

भवानीपुरांतल्या कायस्थमंडळींत देवीप्रसन्नबाबूंचा मोठा लौकिक. त्याचें वय पन्नास वर्षांचें होतें तरी त्याच्या शरीराची काठी बळकट व स्थूल होती. त्याच्या चेहऱ्यावर सदा हास्य विराजित असे व त्याचें मिष्ट भाषण ऐकून सर्वांना आनंद होत असे. लहानपणीं त्याची स्थिति फार गरीबीची असल्यामुळें त्याला अनेक कष्ट भोगावे लागले होते व त्यामुळें त्याचें लिहिणें शिकणें फारसें न होतां थोड्याशा वेतनावर त्याला एका साहेबाच्या दुकानांत नोकरी पतकरावी लागली. त्या ठिकाणीं पुष्कळ वर्षेंपर्यंत त्याची बढती वगैरे कांहीं झाली नाहीं. पुढें दुकानाचा मालक जेव्हां विलायतेस निघाला त्यावेळीं त्याची अनेक आर्जवें व विनंति केल्यावरून त्यानें ह्या पुरातन नोकराला बढती दिली. दैव एकदां उघडूं लागलें कीं, उत्तरोत्तर त्याचा उत्कर्षच होत जातो. पुढें दोनचार वर्षें दुकानाची भरभराटच होत गेल्यामुळें देवीप्रसन्नबाबूवर साहेबाची विशेष मर्जी बसली व मुख्य मुनिमाची जागा त्यानें देवीबाबूस दिली. आतां देवीबाबूचा हात चांगलाच चालूं लागला हें सांगावयाची अवश्यकता नाहींच. त्यानें पुष्कळ पैसे खर्च करून आपलें वडिलोपार्जित घर दुरस्त करून उत्तम रीतीनें शृंगारिलें. घराला एक सुंदर दिवाणखाना केला व त्यांत तो संध्याकाळीं आपल्या मित्र मंडळीशीं व कामकाजाकरितां येणाऱ्या मंडळीशीं गप्पागोष्टी बोलत बसे.

हळूंहळूं देवीबाबूचा लौकिक वाढत चालला. त्याच्या घरीं प्रतिवर्षी दुर्गोत्सव मोठ्या थाटानें होत असे व तो पाहण्यास भवानीपुरचे सर्व लोक येत. शिवाय घरांत एक देवाची स्थापना केली होती त्याच्या पूजाअर्चेसंबंधानें व इतर व्रतवैकल्यासंबंधीं पुष्कळ दानधर्म होत असे. देवीबाबूच्या नातेवाईकांपैकीं दोघी तिघी निराश्रित स्त्रिया आपल्या मुलाबाळांसह त्याच्याच घरीं कायमच्या रहात असत, यामुळें देवीबाबूचें घर सदां माणसांनीं गजबजलेलें असे.

हेमचंद्र कलकत्त्यास आल्यानंतर थोड्याच दिवसांत त्याचा देवीबाबूशीं परिचय झाला व तो वारंवार देवीबाबूच्या घरीं जाऊं लागला. देवीबाबूचा बैठकखाना मोठा अप्रतीम तऱ्हेनें सजविला होता. जमिनीवर एक मोठा रुजामा घालून त्यावर स्वच्छ सरपोस पसरले होते, व ठिकठिकाणीं भिंतीस टेंकून लोड व तक्ये ठेवले होते. छतास उत्तम रंग दिला होता व अनेक उंची उंची हंड्या झुंबरें टांगलीं होतीं. भिंतीवर अनेक हिंदु देवदेवतांच्या तसबिरी लावल्या होत्या. अशा ह्या सुंदर दिवाणखान्यांत बसलें ह्मणजे कोणालाही आनंद होत असे.

हेमचंद्र वेळ सांपडला ह्मणजे देवीबाबूकडे जात असे व प्रसंग सांपडला ह्मणजे आपला कलकत्त्यास येण्याचा हेतू त्यास सांगत असे. देवीबाबू नुसतीं पोकळ अश्वासनें देऊन ह्मणे " तुमच्यासारख्या सुशिक्षिताला नोकरीला काय तोटा? मी तुह्मांला साहेबाकडे नेऊन नोकरी देववीन. तुमच्यासारख्याकरितां जर आह्मीं आपलें वजन खर्च करावयाचें नाहीं तर कोणाकरितां करावयाचें?" इत्यादि भाषणानें हेमचंद्राचें समाधान होत असे. देवीबाबूचा प्रधान गुण ह्मटला ह्मणजे हा होता कीं, त्याजकडे कोणी कांहींही मागावयास गेला कीं, नुसतीं पोकळ अश्वासनें देण्यांत तो कधींही कसूर करीत नसे.

बोलण्याप्रमाणें जरी त्याच्या हातून कृति घडत नसली तरी लोकांचें आदरआतिथ्य करण्यांत तो मोठा सढळ होता. त्यानें दोन तीन वेळां हेमचंद्र व शरत् ह्यांस भोजनास बोलाविलें व आपल्या स्त्रीशीं हेमचंद्राच्या स्त्रीची ओळख व परिचय व्हावा ह्मणून तिलाही आपल्या स्त्रीकडून बोलावणें पाठविलें. वरच्या कामकाजामुळें बिंदूला फुरसत सांपडत नसे; तरी पण देवीबाबूच्या स्त्रीकडून आलेल्या आमंत्रणाचा अनादर करितां येईना, सबब ती वेळांत वेळ काढून आपल्या मुलांना व सुधेला बरोबर घेऊन देवीबाबूच्या घरीं गेली. देवीबाबू त्यावेळीं आफिसांत गेले असल्यामुळें दिवाणखान्यांत सर्वत्र शांतता होती, पण बिंदूनें आंत जाऊन पाहिलें तों सर्व घर गजबजलेलें दिसलें. कांहीं दासी अंगण झाडीत होत्या, कांहीं चिरगुटें वाळत घालीत होत्या व कांहीं सर्वांत मोठें महत्वाचें काम ह्मणजे परस्परांत कलह करीत होत्या. कलकत्त्यांतील मोलकरणींचा केवढा तोरा, प्रत्यक्ष मालकिणींचा देखील

एखादा वेडावांकडा शब्द ऐकून घ्यावयाच्या नाहींत, मग इतरांचें नांव कशाला? जर एखाद्या गृहिणीच्या तोंडून चुकून एखादा वाकडा शब्द निघाला तर त्या दहा शब्द बोलून बोलणारणीला आपण मोठी चूक केली असें वाटावयास लावतात. त्यांच्या भांडणाचा कर्णकटु मासला वाचकांना कंटाळवाणा व अश्लील वाटेल सबब देत नाहीं.

स्वैपाकघरांत कांहीं वृद्ध स्त्रिया बसल्या होत्या. कांहीं स्वैपाक करण्यांत निमग्न होत्या व कांहीं मुलांना मांडीवर घेऊन गप्पा मारीत होत्या. इतक्यांत बिंदूचा मेणा आलेला पाहून एक दासी फिदी फिदी हंसत ह्मणाली, "हा मेणा कोणाचा?" त्यावर दुसरीनें उत्तर दिलें, "तुला माहीत नाहीं का? ह्या कोण आल्या आहेत त्या? ह्या कोणी शेजारच्या गांवच्या नुकत्याच येथें आलेल्या कायस्थ जातीच्या सभ्य स्त्रिया आहेत. ह्या भवानीपुरांत राहतात. ह्यांतील ही जी वडील स्त्री दिसते आहे तिच्या नवऱ्याला आपल्या बाबूसाहेबांच्या कचेरींत कांहीं नोकरी मिळणार आहे, दुसरी जी पोरसवदा दिसते आहे ती तिची धाकटी बहीण. ती बालविधवा आहे. आपल्या बाईसाहेबांनीं त्यांना बोलावणें पाठविलें होतें." त्यावर पहिली दासी पुन्हां ह्मणाली, "ह्या कसल्या कायस्थ, अंगावर दोन दागिने नाहींत, लोकांच्या घरीं अशा कंगाल वेषानें जाण्याची ह्यांना लाज कशी वाटत नाहीं?" दुसरी दासी ह्मणाली, "अग, ह्या खेडेगांवांतून येथें आलेल्या, त्यांना अद्याप शहरच्या रीतरिवाजाची माहिती नाहीं." "ती होणार कधीं? दोन मुलांची आई झाली आतां माहिती होणार केव्हां?" "अग, आणखी असें पहा, गरिबाच्या घरीं दागिने कोठले?" "मग असल्या भिकारड्यांना बाईसाहेबांनीं बोलावणें तरी कशाला धाडलें? आपल्या बाईसाहेबांना इतकी अक्कल असती तर आणखी काय पाहिजे होतें? आपल्या गुणाची येथें कांहीं तरी बूज आहे का? बरें पण ह्यांत बाईसाहेबांचा तरी काय दोष? जसे आईबाप तशी मुलगी, पैसा असला ह्मणजे स्वभाव तर पालटत नाहीं ना?" अशा तऱ्हेनें स्वतःची प्रौढी व यजमानणीची व तिच्या आईबापांची निंदा चालली होती.

बिंदु व सुधा यजमानणीच्या खोलींत गेल्या. बाईसाहेबांचे अंगाला तेल लावणें चाललें होतें. एक दासी बाईसाहेबांचे केस विंचरीत होती व दुसरी

त्यांच्या छातीला हळूं हळूं तेल चोळीत होती. बाईसाहेबांना काळजाचा रोग होता, (श्रीमंतांच्या स्त्रियांना असा कांहीं तरी रोग असावयाचाच.) ह्मणून वैद्यानें सांगितलें होतें कीं, रोज स्नानाचें पूर्वी एक तास तेलानें मालिस करीत जा. यजमानीणबाई देवी बाबूप्रमाणें सदृढ नव्हत्या. त्यांचें शरीर अगदीं कृश, चेहरा निस्तेज, व स्वभाव फार तापट व गरम असे. त्यांच्या ह्या तापट स्वभावाचा परिणाम प्रत्यहीं घरांतील सर्व माणसांच्या अनुभवास येई. खुद्द देवी बाबुलाही असल्या स्वभावापुढें हार खावी लागे असें ऐकिवांत आहे. देवीबाबूनें स्वत: गरिबींत दिवस काढले असल्यामुळे त्याचें आचरण पूर्ववत नम्र असे पण नवीन वैभव प्राप्त झालेल्या श्रीमंताच्या गृहिणीच्या अंगीं नम्रपणाचा अभाव असल्यामुळे तिचा तो द्रव्यमद वारंवार अनावर होत असे.

बिंदू आलेली पाहून यजमानीण बाईने प्रश्न विचारिला " कांहो, तुह्मी कोठल्या ? "

बिंदु—आह्मी तालपुष्करच्या बोस घराण्यांतल्या. आह्मी नुकत्याच येथें आलों आहो. आपल्याकडून बोलावणें आलें, पण कामामुळे फुरसतच मिळाली नाहीं. आज वेळांत वेळ काढून कसे तरी येतां आलें.

यजमानीण—हां, हां, आलें ध्यानांत. बसा तर मग. नवीन कोणी माणसें आलीं म्हणजे शेजाऱ्या पाजाऱ्याकडे भेटावयाला जाण्याची जुनी रीत असे, पण अलीकडे ती रीत बुडाली. अलीकडच्या लोकांना कोणाकडेच जायाला नको. तुह्मी आलां, मोठें छान झालें. बरें पण, तुमचें तालपुष्कर कोठें आहे ? तेथें कांहीं खानदानीचे लोक आहेत का ?

बिंदू—हो, तीस चाळीस खानदानीचीं घराणीं आहेत, शिवाय इतर लोकांचीही वस्ती आहे. वर्धमान जिल्ह्याचें नांव आपणाला माहीत आहे कीं नाहीं, त्याच जिल्ह्यांत काटोवापसून ८।१० कोसावर पश्चिमेच्या बाजूस तालपुष्कर गांव आहे.

यजमानीण—हो हो. काटोवा माहीत आहे. आमच्या येथल्या सर्व मोलकरणी तेथल्याच आहेत. (नंतर किंचित् स्मित करून) ही तुमची बहीण वाटतें ? अरेरे, बिचारीवर केवढा प्रसंग कोसळला आहे ! ईश्वराची

मर्जी, सर्वांच्याच दैवीं सुख कोठलें आलें आहे ? सर्वच श्रीमंत कोठून असणार? ईश्वर कोणाला श्रीमंत करतो, कोणाला दरिद्री करतो.

इतक्यांत बाईसाहेबांचे केस विंचरीत असलेली दासी ह्मणाली, "हें तर खरेंच. ईश्वराच्या दयेनें आमच्या बाबू साहेबांना जसें श्रीमंतीचें सुख आहे तसें सर्वांना कोठलें असणार ? ह्या सर्व दैवाच्या गोष्टी आहेत."

त्यावर अंगाला तेल चोळीत असलेली दासी ह्मणाली, "नुसत्या श्रीमंतीला काय घेऊन बसली आहेस ? त्यांची विद्वत्ता किती, नांवलौकीक केवढा, साहेब लोकांत केवढी प्रतिष्ठा, मला वाटतें, ऋद्धि सिद्धि त्यांच्या अगदीं आज्ञांकित दासी आहेत."

आपल्या मनाजोगें बोललेलें भाषण ऐकून बाई साहेबांची मुद्रा प्रसन्न झाली आणि त्या ह्मणाल्या "किती वेळ मालीस करते आहेस, दमली नाहींस का ? दुसऱ्या दासी गेल्या कोणीकडे ? कामाच्या वेळीं एकीचा देखील ठिकाण नसावयाचा. सगळ्याजणी स्वैपाकघरांत बसल्या असतील. कामाची काळजी आहे कां कोणाला ?"

वरील भाषण जरा खड्या सुरांत झाल्यामुळें तारेच्या बातमीप्रमाणें ती बातमी ज्या ठिकाणीं त्या सर्व साळकाया माळकाया बसल्या होत्या त्या ठिकाणीं पोंचली. ज्या नुसत्या चकाट्या पिटींत होत्या त्यांच्या चकाट्या बंद झाल्या, ज्या पेंगत होत्या त्यांची झोप गेली व सर्वजणी धांवत धांवत बाईसाहेबांच्या खोलींत आल्या.

एकदासी—कायगे, आज काळीज दुखणें कसें काय आहे ? मी स्वैपाक घरांतल्या कामांत गुंतलें असल्यामुळें मला आतांपर्यंत यायला फावलें नाहीं. तूं हो जरा पलीकडे, मी थोडा वेळ मालिस करतें.

यजमानीण—वा, झाली का फुरसत यायला ? इकडे माणसाचा जीव जात असला तरी तुह्माला दाद कोठें असते ? हें माझें दुखणें कसचें कमी होणार ? घरांतील माणसें पाहतील संवरतील, सेवा शुश्रुषा करतील तर कांहीं गुण यायचा! 'कोणी कोणाचें नाहीं' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

दासीपैकीं दोघीजणी कांहींएक प्रत्युत्तर न देतां बाईसाहेबांच्या दोन

बाजूला बसल्या व मालीस करूं लागल्या. बाईसाहेब तोंडाला तेल चोळीत चोळीत बिंदूशीं पुन्हां बोलूं लागल्या—

यजमानीण—तुमचीं मुलें मोठीं चांगलीं दिसतात, पण अशीं अशक्त का ?

बिंदु—जन्मापासूनच तीं अशीं आहेत. शिवाय त्यांना कधीं कधीं तापही येतो. धाकट्या मुलाला पोटांत रोग झाला होता पण आतां बरा आहे.

यजमानीण—हां, म्हणूनच अशीं अशक्त. मुलांची अशी हेळसांड नका करीत जाऊं. चांगलें दूध दिल्याशिवाय तीं अंग धरणार नाहींत. आम्ही आमच्या मुलांना शेराशेराचा रतीब लावला आहे. असें केल्याशिवाय कां कोठें मुलें सुधारतात ?

बिंदु—दूध आहे पण तें गवळ्याचें येथलें रतिबाचें, अर्धे दूध आणि अर्धे पाणी! त्यानें काय होणार ?

यजमानीण—तुम्ही गवळ्याच्या घरचें दूध मुलांना कसें पाजतां कोणास ठाऊक ? आमच्या घरीं आम्ही गवळ्याला पाऊल टाकूं देत नाहीं. आमच्या घरीं गाई म्हशी आहेत; शिवाय परवा कचेरींतल्या एका साहेबाची एक ८० रुपायांची म्हैस विकत घेतली, ती वेळेस पांच शेर दूध देते. घरच्या गुरांचें दूध असल्याशिवाय मुलांच्या अंगीं लागत नाहीं. गवळ्याच्या घरचें दूध म्हणजे नुसतें गंगाजळ.

बिंदु—सर्वांची स्थिति सारखी कोठून असणार? आपल्यासारखें वैभव सर्वांच्याच दैवीं नसतें. जें काय मिळेल त्यावरच चालविलें पाहिजे.

यजमानीण—कांहीं करा, पण मुलांची हेळसांड करूं नका. तुम्हाला लागेल तर रोज आमच्या घरून दूध नेत जा, येथें कांहीं कमती नाहीं.

एकदासी—येथें दूध दह्याची इतकी चंगळ असते कीं, नोकर चाकरांना देखील पुरून उरतें. तुम्हाला जरूर लागेल तेव्हां अवश्य येऊन घेऊन जांत जा. आमच्या बाईसाहेब म्हणजे साक्षात् अन्नपूर्णा आहेत.

दुसरी दासी—जसें ऐश्वर्य तसाच दानधर्म. ह्या घराच्या जिवावर शेंकडों जणांचीं पोटें चाललीं आहेत.

यजमानीण—तुमच्या यजमानांना कांहीं नोकरी चाकरी मिळाली का? आमच्या बाबुसाहेबाकडे गेले होते ना?

बिंदू—हो, गेले होते, पण अद्याप कांहीं जुळलें नाहीं. आपण मनावर घेतले तर नोकरी मिळण्याला काय उशीर!

यजमानीण—साहेब लोकांत बाबूसाहेबांचें मोठें वजन आहे त्यामुळें त्यांची शिफारस कधीं वाया जायची नाहीं. आमच्या शेजारच्या एका गरीब मुलाची अगदीं अन्नान्न दशा होती, त्याला कांहीं तरी नोकरी लावून द्या असें मीं घरांत सांगितलें मात्र, तों लागलीच दोन चार दिवसांत साहेबाकडून नोकरी देवविली. शिवाय त्या मित्रबाबूच्या घरच्या एका गृहस्थाची अशीच स्थिति होती, त्याची आई एके दिवशीं मजकडे आली आणि डोळ्यांत आंसवें आणून ह्मणाली, " आह्मांला रोज अर्धपोटी रहावें लागतें आहे, तर मजवर दया करून माझ्या मुलाला कोठें तरी नोकरी लाऊन द्या " इत्यादि. तेव्हां काय करणार? तिच्याही मुलाला नोकरी लावून दिली. सध्यां सर्वांचीच अशी दशा झाली आहे, पैसा कोणाजवळही राहिला नाहीं, सर्वच दरिद्री, पैशाकरितां हापापलेले, सर्व येऊन माझ्या दाराशीं धरणें घेऊन बसतात. माझी तब्येत ही अशी, मी तरी काय करणार? तरी पण तुह्मी आपल्या यजमानांना बाबूसाहेबाकडे पुन्हां जायला सांगा; मग पाहूं काय होतें तें.

सुमारें दीड घंटा मालिस विधि झाल्यावर बाईसाहेब स्नानास उठल्या,

जात्या गंभीर स्वभावाची असल्यामुळें संसारांतील अनेक कष्ट सहन करण्याचें बिंदूला कांहीं वाटत नसे, पण बडे लोकांच्या घरीं जाऊन त्यांची हांजी हांजी करण्याचा धडा अद्याप तिला मिळाला नसल्यामुळें हा पहिलाच प्रसंग तिला मोठा कठिण वाटला. नंतर यजमानीण बाईचा निरोप घेऊन बहीण व मुलासह बिंदू परत बिन्हाडी आली.

चतुर्दश परिच्छेद.

नवीन बाबू.

कलकत्त्यास आल्यावर कित्येक आठवडे सुधा मोठी आनंदांत होती, कारण

तेथे रोज रोज नव्या नव्या गोष्टी दृष्टीस पडत. जिकडे जाव तिकडे नवीनच दृश्य यामुळे तिला मोठी करमणूक होई. कलकत्यातील प्रचंड ग्रीष्मकाल खेडेगांवांतील ग्रीष्मकालापेक्षा अधिक कडक, पण त्याला देखील सुधेनें कांहीं दाद दिली नाही; पण हळूं हळूं तिचे शरीर कृश होऊं लागले, डोळे खोल गेले व हातांत अवसान उरले नाहीं, तथापि ती नेहमीं गृहकृत्यांत अगर बाल्योचित खेळांत निमग्न असे. यामुळें तिच्या शरीरांत झालेला हा फरक हेमचंद्र व बिंदू यांच्या लक्षांत आला नाहीं.

वर्षाऋतूच्या प्रारंभीं सुधेला ज्वर येऊं लागला. तिला आपले शरीर जड वाटूं लागलें ह्मणून ती निजावयाच्या खोलींत जाऊन एक चटई पसरून त्यावर निजली.

संध्याकाळचे वेळीं बिंदु सहज त्या खोलींत गेली आणि सुधा अद्यापही निजलेली पाहून तीस ह्मणाली, "बाळ, अशा अवेळी का निजलीस? या वेळी निजणें चागले नाही, चल आपण गच्चीवर जाऊं."

सुधा—नाहीं आक्का, मी नाही आज गच्चीवर येत.

बिंदू—कां, आज तब्येत बरी नाही की काय? तुझे तोंड सुकल्यासारखे दिसतें आहे.

सुधा—आक्का, मला जरा आज कसेसेच वाटते आहे, शिवाय डोकेही थोडे दुखते आहे.

बिदूने सुधेच्या अंगाला हात लावून पाहिले तो अंग अतिशय तापलेलें, तेव्हां ती ह्मणाली, "आज तुला ताप आला आहे, अशी चटईवर निजूं नकोस, मी तुला हंथरूण घालून देते त्यावर नीज."

सुधा—नाही आक्का, माझी तब्येत काही बिघडली नाहीं, मी अशीच थोडा वेळ निजते,

बिंदू—असे करूं नकोस, तुझ्या अंगांत ताप भरला आहे, डोके दुखतें आहे तेव्हां असे भुईवर निजणे चागले नाहीं.

बिदूनें बिछाना घातला व त्यावर तिला निजविलें, आणि आपण तिच्या शेजारी बसली.

रात्री हेमचंद्र व शरत् आले व बराच वेळ सुधेच्या हंथरुणाजवळ बोलत

बसलें, रात्र बरीच झाली असें पाहून बिंदूनें उभयतांस भोजनास उठावयास सांगितलें, शरत् ह्मणाला मी घरीं भोजन करीन, तेव्हां एकटा हेमचंद्रच बिंदूसह स्वैपाकघरांत गेला,

हेमचंद्र भोजनास बसला. इकडे एकटा शरत् सुधेच्या जवळ बसून तिची शुश्रूषा करूं लागला. तिचे अंग अतिशय तापले होते, डोळे लाल झाले होते, व ती वेदनेनें ह्या कुशीवरून त्या कुशीवर लोळत होती व नुसते पाणी पाणी करून शिरोवेदनेमुळें मंद मंद रडत होती. शरत् तिच्या डोळ्याचें पाणी वारंवार पुशीत होता, व ग्लानीनें शुष्क झालेल्या तिच्या तोंडात थेंब थेंब पाणी घालीत होता. थोड्याच वेळात हेमचद्र भोजन आटोपून आला व रात्र फार झाली असें पाहून त्यानें शरत् यास घरीं जाण्यास सांगितले. पण सुधेची तब्येत चांगली नसल्यामुळे आज मी घरीं जात नाही असे त्यानें सांगितलें. इतक्यांत बिंदूही भोजन आटोपून आली, तिला शरत् ह्मणाला, "थोडे अन्न असेल तर मी खाऊन घेतों."

बिंदू—सुधा आज जेवली नाहीं, ह्मणून भात उरला आहे. पण तूं कशाला उगाच जागतोस, आह्मी दोघे आहो तिची शुश्रूषा करावयाला, तूं जा घरीं आतां. रात्र फार झाली.

शरत्—छे ताई, तुझ्या मुलाचीही तब्येत आज चांगली नाहीं, तुला त्याच्याजवळ बसलें पाहिजे, शिवाय हेमबाबूंनाही आज बरेच श्रम झाले आहेत, त्यांना जर थोडी झोप मिळाली नाहीं तर त्यांचीही तब्येत बिघडेल. ह्मणून ह्मणतों कीं, आह्मी दोघेजण आळीपाळीनें जागत बसूं.

बिंदु—तर मग तूं खाऊन घे; चल मी तुला वाढतें.

शरत्—ताट वाढून येथेंच आणून ठेव, मग मी खाईन.

बिंदु—मग कशाला, आतांच खाऊन घे. मग भात निवून जाईल.

शरत—ताई, मला निवलेलाच भात आवडतो तूं आपली ताट वाढून आणून ठेव कशी.

बिंदूनें स्वयपाक घरांत जाऊन ताट वाढून आणिलें आणि एका कोपऱ्यांत झाकून ठेविलें, आणि मुलांना पतीच्या अंथरुणावर निजवून आपण सुधेच्या अंथरुणाजवळ येऊन बसली. शरत् अद्यापही रोग्याची शुश्रूषा करीत होता.

शरत्—हेमबाबू, आपण आतां नीजा, मी कांहीं वेळानें आपणाला उठवीन आणि मग निजेन. सुधेला आज मनस्वी ताप आला आहे तेव्हां आपणांपैकीं एकानें जागत बसणें चांगलें.

हेमचंद्र निजला. बिंदू व शरत् जागत बसली. सुधेला झोप येत नव्हती, तिच्या अंगाची लाही होत असल्यामुळें ती तळमळत पडली होती व पाणी, पाणी करून विवळत होती.

मध्यान्ह रात्र उलटून गेल्यावर बिंदूच्या अतिशय आग्रहावरून शरत्नें भोजन केलें. पाहटे तीन वाजण्याच्या सुमारास सुधेचा ताप उतरला व तिला झोप लागली.

सुधेला झोप लागलेली पाहून बिंदू ह्मणाली, ' शरत् तूं आतां घरीं जा आणि थोडा वेळ स्वस्थ नीज. सर्व रात्र जागत बसलास तर तुझी तब्येत बिघडेल.

शरत्०—बिंदुताई, तुला तरी सर्व रात्र जागरण कसें चालेल? सारादिवस काम करून तूं दमली आहेस, शिवाय पुन्हां सकाळपासून काम आहेच. मी एक दिवस नाहीं कालेजांत गेलों तर चालेल.

बिंदु—मला जागरणाची संवय आहे, मला कांहीं व्हायचें नाहीं. पुरुषांना जाग्रण सोसावयाचें नाहीं. माझें ऐक, आणि घरीं जा आतां. सकाळीं वाटलें तर एक वेळ इकडे येऊन जा.

शरत्चा निरुपाय झाला व तो घरीं जाऊन सुमारें चार वाजतां अंथरुणावर पडला.

सकाळीं सहा वाजतां उठून शरत्चंद्र आपल्या ओळखीच्या नवीनचंद्र नामक एका डाक्तराकडे गेला. नवीनचंद्र हा नुकतांच मेडिकल कॉलेजांतून पास होऊन आपल्या धंद्यास लागला होता. तो अतिशय खटपटी, बुद्धिमान् व आपल्या धंद्यांत चांगलाच प्रवीण होता. पण धंद्यास नुकतीच सुरवात असल्यामुळें तो प्रसिद्धीस आला नव्हता. त्याचा वडील भाऊ चंद्रनाथबाबू भवानीपुरांतला एक प्रख्यात वकील होता, त्याच्या सहाय्यानें नवीनचंद्रानें एक औषधालय घातलें होतें, पण त्यांत विशेष फायदा होत नसे. आपल्या खटपटीनें व मेहेनतीनें आपल्याला पुढें चांगले दिवस येतील या आशेवर

त्यानें काम चालविलें होतें. एक दोन ठिकाणीं त्याचा चांगला लौकिक झाला होता, व ज्या ज्या ठिकाणीं त्याला दोन चार वेळ जाण्याचा प्रसंग येई त्या त्या ठिकाणचे लोक ह्याला आपला कायमचा " कुटुंबवैद्य " करीत.

नवीनचंद्राला बरोबर घेऊन शरच्चंद्र सात वाजतां हेमचंद्रबाबूच्या घरीं आला. नवीनचंद्रानें मोठ्या काळजीपूर्वक सुधेची तब्येत पाहिली. त्यावेळीं ताप थोडा कमी होता, पण नाडी मात्र फार जलद चालली होती. बराच वेळपर्यंत चिकित्सा करून नवीनचंद्र बाहेर आला. त्याचा चेहरा त्यावेळीं गंभीर दिसत होता.

बाहेर येतांच हेमचंद्रानें विचारलें, " कसें काय आहे? मला वाटतें, हल्लीं ताप उतरला आहे, आजच्या दिवस लंघन केल्यानें प्रकृति ठीक होईल. तुह्माला काय वाटतें?"

नवीन०— मला नाहीं वाटत लंघनानें कांहीं होईलसें. मला रेमिटंट तापाची लक्षणें दिसताहेत. सध्यां ताप कमी आहे खरा, तरी पण बराच आहे. दुपारीं पुन्हां वाढण्याचा संभव आहे.

हेमचंद्र थोडा घाबरला. कारण त्यावेळीं भवानीपुरांत रेमीटंट तापाची सांथ आली होती व बरेच लोक त्या तापाला बळी पडले होते. हेमचंद्रानें डाक्तरास विचारिलें " तर मग बरें होण्यास किती दिवस लागतील?"

नवीन०— आतांच कांहीं सांगतां येत नाहीं, आणखी एकवेळ तब्येत पाहिल्यावर उद्यां सांगेन. रेमीटंट ताप असावा हें खास; आणि तोच असला तर कांहीं दिवस त्रास भोगावा लागणारच. पण आपण कांहीं फिकीर करूं नका.

इतकें बोलून त्यानें कांहीं औषध दिलें आणि सांगितलें कीं, तिसरा प्रहरपर्यंत दोन दोन तासांनीं हें औषध देत जा. तिसराप्रहरीं मी पुन्हां येईन. आणखी हें पहा, सध्यां हिचें मस्तक फार तापलें आहे, डोळे लाल झाले आहेत ह्मणून सर्व दिवसभर हिच्या मस्तकावर बर्फ ठेवीत चला, तहान लागली तरी बर्फच अगर उसाचे दोन करवे द्या; व दिवसांतून चार वेळां अरारूटाची लापशी अगर साबूदाण्याची खीर खाऊं घाला. खाणें हेंच ह्या रोगाचें औषध आहे हें पक्कें ध्यानांत ठेवा.

नवीनचंद्र शरत्‌ला बरोबर घेऊन घराबाहेर आला आणि ह्मणाला, "शरत्, तुह्मास्रा एक काम केलें पाहिजे."

शरत्०— सांगा काय तें.

नवीन०— वेळ पाहून तुह्मी हेमबाबूंना कळवा कीं, मी या चिकित्सेबद्दल कांहीं घेणार नाहीं.

शरत्०—कीं बरें ?

नवीन०—तुमचा आमचा फार दिवसांचा स्नेहसंबंध. तेव्हां तुमचे स्नेही ते आमचे स्नेहीच. शिवाय त्यांची स्थितीही विशेष संपन्न दिसत नाहीं.

शरत्०—हेमबाबूंची गरिबी आहे खरी, पण तुह्मी पैसे न घेतां औषधोपचार करण्यापेक्षां थोडेसे पैसे घेऊन औषधोपचार कराल तर ते त्यांना अधिक आवडेल असें मला वाटतें.

नवीन०—माझें ह्मणणें एकाच. हा रोग लवकर बरा होईलसें मला वाटत नाहीं, मला वारंवार येथे यावें लागणार; तेव्हां, पैसे न घेतां जर मला येता आलें तर संकोच वाटणार नाहीं.

शरत्०—तुमची मर्जी. पण तुमच्या वेळेची किंमत आहे, तुह्माला द्रव्याची आवश्यकता आहे, पैसे घेतल्याशिवाय जर तुह्मी सर्वांचीच चिकित्सा करूं लागला तर तुमचें चालणार कसें?

नवीन०—माझ्या वेळेची किंमत नाहीं. माझी अद्यापि विशेषशी प्रसिद्धि झाली नसल्यामुळें मला पुष्कळ फुरसत असते, या एकट्या रोग्याचे पैसे घेतले नाहींत तर कांहीं मोठेसें नुकसान नाहीं; तेव्हां माझें ह्मणणें मान्य कराच.

शरत्‌नें त्याचें ह्मणणें मान्य केलें व नवीनचंद्र निघून गेला. नंतर शरत्‌नें औषध, बर्फ, उसाचे करवे वगैरे सामान बाजारांतून आणून ठेविलें व आपण रोग्याच्या शुश्रूषेकरितां तिच्या शेजारीं बसला, पण हेमचंद्रानें आग्रह करून त्यास कालेजांत पाठवून दिलें.

तिसरा प्रहरीं शरत् नवीनचंद्रासह पुन्हां आला. तव्येत पाहिल्यावर हा रेमीटंट तापच अशी नवीनचंद्राची खात्री झाली. नंतर त्यानें पूर्वीचें औषध

बंद करून नवीन एक औषध लिहून दिलें आणि सांगितलें कीं, संध्याकाळपर्यंत तीन वेळ व रात्रीं आपोआप जागी झाल्यास एक वेळ हें औषध द्या. नंतर शरत्‌ला सांगितलें कीं, खाण्याची व्यवस्था चांगली ठेवा, खाण्याच्या कामांत जर हयगय झाली तर लक्षण नीट नाहीं.

बरेच दिवस झाले तरी तापास उतार पडेना, असें पाहून शरत् हेमचंद्राचें ह्मणणें न जुमानतां रात्रंदिवस तेथें राहून मनोभावानें सुधेची शुश्रूषा करूं लागला. दहा बारा दिवसांत सुधा अतिशय निःशक्त झाली, तिला उठण्याची शक्ति राहिली नाहीं, तरीही तापाचा जोर कमी झाला नव्हता. सकाळीं ताप १०२ डिग्री व तिसरा प्रहरीं १०५ हा नित्याचा क्रम असे. अशी स्थिति पाहून नवीनचंद्रही घाबरून गेला, आणि ह्मणाला, " शरत्, १४ दिवसांनीं ह्या रोगाला जर उतार पडला नाहीं तर प्रसंग मोठा कठीण दिसतो. सुधा इतकी अशक्त झाली आहे कीं, ह्या यातना तिला जास्त दिवस सोसवणार नाहींत. "

तेराव्या दिवशीं नवीनचंद्र सर्व दिवसभर रोग्याच्या शुश्रूषेंत होता. तिसरा प्रहरीं ताप थोडा उतरला, पण फार कमी. यामुळें त्याला भरंवसा येईना, तेव्हां तो शरत्‌चंद्रास ह्मणाला, आज सर्व रात्रभर रोग्याची विशेष शुश्रूषा ठेऊन पहाटे ताप किती आहे तें लक्षपूर्वक पाहून टिपून ठेवा. ताप जर १००च्या खालीं गेला तर ताबडतोब पांच ग्रेन क्विनाईन द्या, आठाच्या सुमारास मी येईन. उद्यां अगर परवां जर उतार पडला नाहीं तर धडगत दिसत नाहीं.

शरत्‌नें ही गोष्ट बिंदूला किंवा हेमचंद्राला कळविली नाहीं. संध्याकाळचे सुमारास तो घरून भोजन आटोपून आला आणि सुधेच्या बिछान्याशेजारीं बसला. सर्व रात्रभर तो त्या जागेवरून हलला नाहीं.

पहाटेचा अरुणप्रकाश खिडकींतून थोडा थोडा दिसूं लागला. त्या वेळीं घरांत सर्वत्र सामसूम होती. हेमचंद्राला गाढ निद्रा लागली होती. बिंदू व सुधा या दोघींचाही पहाटेच्या सुमारास डोळा लागला होता, घरांत एक दिवा जळत होता व त्याचा निस्तेज होत चाललेला प्रकाश रोग्याच्या तोंडावर पडला होता.

शरत् हलकेंच उठला व त्यानें सुधेची नाडी पाहिली पण नाडी अतिशय जलद चालली असल्यामुळें त्याला कांहीं निर्णय करतां येईना. नंतर त्यानें थर्मामेटर लावलें व पांच मिनीटें झाल्यावर ते काढून घेऊन तो दिव्याजवळ गेला. दिव्याच्या मंद प्रकाशामुळें प्रथम त्याला नीट न्याहळेना, ह्मणून दिव्याची ज्योत थोडी मोठी करून त्यानें पाहिलें तों त्याच्या काळजांत धस्स झालें. त्यानें कपाळावर हात मारला व तो एकदम जमिनीवर पडला.

बिंदू एकदम जागी झाली. तिनें सुधेजवळ जाऊन पाहिलें तों तिला झोंप लागलेली. खिडकीपाशीं येऊन पाहते तों शरत् जमिनीवर निजलेला, तें पाहून ती ह्मणाली, हा आमच्याकरतां किती कष्ट सोसतो आहे पहा ! शरतनें कांहींएक उत्तर दिलें नाहीं. त्याच्या मनाला ज्या यातना होत होत्या त्यांत दुसऱ्याला कशाला तो भागीदार करील ?

आणखी एक आठवडा ताप राहिला. त्यामुळें सुधा इतकी अशक्त झाली कीं, तिला ह्या कुशीचे त्या कुशीवर वळण्याचें अवसान राहिलें नाहीं, तिच्या तोंडावर प्रेतकळा आली. तापाच्या विसाव्या दिवसापासून नवीनचंद्र रात्रंदिवस हेमचंद्राच्या घरींच राहिला. त्यानें शरतला एकांतीं सांगितलें, "शरत्, आतां तुमच्यापुढें मी कांहीं गुप्त न ठेवतां स्पष्ट सांगतों कीं, आणखी दोन दिवसांत जर हा ताप निघाला नाहीं, तर हिच्या जगण्याची बिलकुल आशा नाहीं. आणखी दोन दिवस मी औषध देईन, पुढें मला निरोप द्या. मी आपली शिकस्त करून पाहिली, आयुष्य मर्यादा वाढविणें ही गोष्ट ईश्वराधीन आहे."

बाविसावे दिवशीं संध्याकाळीं ताप थोडा उतरला. पण भरंवसा येईना. साऱ्या रात्रभर शरत् व नवीनचंद्र रोग्याच्या बिछान्याजवळ जागत बसले. सुधेला मात्र रात्रभर गाढ झोंप लागली होती. पण तें आरोग्य होण्याचें लक्षण कीं अशक्ततेमुळें मृत्यूचें पूर्वचिन्ह याचा, कांहीं निर्णय करतां येईना.

पहाटे चाराच्या सुमारास शरतनें थर्मामेटर लाविलें आणि तें पाहण्याकरितां तो खिडकीजवळ गेला. त्यानें काय पाहिलें तें समजलें नांहीं, पण तें पाहतांच तो निश्चेष्ट होऊन जमिनीवर पडला.

नवीनचंद्रानें शरत्च्या हातांतील थर्मामेटर घेतलें. आणीबाणीच्या प्रसंगीं

धैर्य देणें हेंच डाक्तराचें शौर्य, हें जाणून त्यानें हळूं हळूं शरत्चंद्राचा हात धरून त्यास उठविलें.

शरत्चंद्रानें निराशेच्या स्वरानें विचारलें, " मग आतां कांहीं जगण्याची आशा नाहींना ? ".

नवीन०—परमेश्वर तिला दीर्घायु करो. ईश्वरकृपेनं ती या अरिष्टांतून पार पडली.

थर्मामिटर पाहण्यांत शरत्ची चुकी झाली होती. त्यावेळीं ताप फक्त ९८ डिग्री होता. शरत्नें सुधेच्या अंगाला हात लाऊन पाहिला तों अंगांत बिलकुल ताप नाहीं. त्याला मोठा आनंद झाला व तो सकाळीं आपल्यां घरीं गेला. आठ दिवस सारखें जाग्रण झाल्यामुळें त्याचें तोंड सुकलें होतें, डोळे लाल झाले होते, पण त्याचें मन मात्र आज पूर्ण आनंदित होतें.

पंचदश परिच्छेद.

चंद्रनाथबाबू.

ताप बरा झाल्यावरही पुढें कित्येक दिवस सुधेला अंथरुणावरून उठण्याचें अवसान नव्हतें. अंगांत थोडीशी शक्ति आल्यावर ती थोडी थोडी घरांत हिंडूं लागली अगर शरत्च्या सहायानें कधीं कधीं गच्चीवरही जाऊन बसूं लागली. तिचें शरीर अतिशय क्षीण झाल्याकारणानें तिला उचलून गच्चीवर घेऊन जाण्यांत अगर गच्चीवरून खालीं आणण्यांत शरत्ला बिलकुल श्रम वाटत नसत.

सुधेची तब्येत चांगली सुधारल्यावर शरत् पुन्हां कालेजांत जाऊं लागला. पण प्रतिदिवशीं संध्याकाळीं तो हेमचंद्राच्या घरीं येई व सुधेशीं अनेक तऱ्हेच्या गप्पागोष्टी सांगून तिची करमणूक करून रात्रीं नवाच्या सुमारास परत घरीं जात असे. सुधाही प्रतिदिवशीं मोठ्या उत्कंठेनें त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसे व तो आला म्हणजे तिला अत्यानंद होत असे.

एके दिवशीं तीं दोघेजण गच्चीवर गप्पागोष्टी करीत बसलीं असतां हेमचंद्र

तेथें गेला आणि शरत्‌ला ह्मणाला, " शरत्, आज चंद्रनाथबाबूकडून आपणाला बोलावणें आलें आहे. मग चलावयाचें ना तिकडे ? "

शरत्०—हो, पण मी अगदींच विसरलों होतों. मला मनापासून कोठेंही जाणें आवडत नाहीं, मी आलों नाहीं तर चालावयाचें नाहीं का ?

हेम०—छे, सुधा आजारी असतांना चंद्रनाथबाबू व नवीनबाबू आपल्या घरीं रहात असत, तेव्हां त्यांच्या घरीं न जाऊन कसें चालणार ? चल, आतांच जाऊं आपण तिकडे.

शरत् व सुधा हीं उठलीं. हेमचंद्रानें सुधेचा हात धरून तिला हळूंहळूं खालीं आणिलें आणि हंथरुणावर निजवून ते दोघेजण घराबाहेर पडले. चालतां चालतां हेमचंद्र शरत्‌ला ह्मणाला, "शरत्, सुधेच्या अजारांत तूं जें काय आमच्याकरितां केलें आहेस त्याची फेड या जन्मीं तरी माझ्या हातून होणें शक्य नाहीं. आमच्याकरितां तुझ्या अभ्यासांत मात्र व्यर्थ व्यत्यय आला. आतां परीक्षेला दिवस थोडे उरले तर आतां झटून अभ्यास कर."

शरत् थोडा वेळ स्तब्ध राहिला आणि नंतर ह्मणाला, "अवकाश थोडा उरला खराच, आणि आतां झटून अभ्यास केलाच पाहिजे. सुधेची प्रकृति हल्लीं बरी आहे; पण फुरसत सांपडली ह्मणजे तिला गच्चीवर घेऊन जाऊन तिची करमणूक करण्यास बिंदुताईस सांगून ठेवा. नवीनचंद्रानें सांगितलें आहे कीं, तिचें मन नेहमीं प्रसन्न ठेवलें तर तिला लवकर शक्ति येईल." अशा गोष्टी बोलतां बोलतां ते चंद्रनाथाच्या घरीं येऊन पोंचले.

नवीनचंद्राचा वडीलभाऊ चंद्रनाथबाबू हा भवानीपुरांत मोठा प्रतिष्ठित गृहस्थ होता. त्याचें वय तीस वर्षांहून फारसें अधिक नव्हतें. तो मोठा विद्वान्, परोपकारी व प्रसिद्ध वकील होता. शिवाय तो सुबर्बन म्युनिसिपालिटीचा लोकनियुक्त सभासद असल्यामुळें लोकहितार्थ तो विशेष यत्न करीत असे.

त्याचें घर फारसें मोठें नव्हतें; पण तें व्यवस्थित रीतीनें सजविलें होतें. घराला एक लहानसा दिवाणखाना होता. हाच दिवाणखाना चंद्रनाथबाबूचें हपीस होतें. ह्या हपिसांत टेबल, खुर्च्या, दोन पुस्तकांचीं कपाटें व कांहीं सुंदर तसबिरी होत्या. टेबलावर दोन शामदानें जळत होतीं. चंद्रनाथ, नवीन,

हेमचंद्र व शरत् ह्यांच्या बराच वेळ गप्पागोष्टी चालल्या होत्या. चंद्रनाथबाबू स्वभावतः गंभीर व मितभाषी, पण स्वभावानें फार दयाळु होता. सुधेच्या आजारांत त्यानें हेमचंद्राला अतिशय सहाय्य केलें होतें, व नेहमीं गोड बोलून तो हेमचंद्राला संतुष्ट ठेवीत असे.

पुष्कळ वेळ गप्पागोष्टी झाल्यावर हेमचंद्र ह्मणाला, "येथें येऊन आपल्यासारख्या विद्वान लोकांशीं माझा परिचय झाला याबद्दल मला मोठी धन्यता वाटते आहे. आह्मी नेहमीं खेडेगांवांत राहणारे, खेडेगांवांत विद्वानांचा अभाव ह्मटला तरी हरकत नाहीं. शहरच्या लोकांची देशहिताकरितां काम करण्याची हिंमत व हुरूप खेडेगांवांत दृष्टीस देखील पडत नाहीं."

चंद्र०—हेमबाबू, येथल्या लोकांची देशहितैषिता नुसती ;तोंडांत. आणि जरी कदाचित् मनापासून असली तरी तसा प्रयत्न होत नाहीं. आह्मी यःकश्चित लोक. देशाकरितां आमच्या हातून काय होणार ? आमची योग्यता ती काय ! आणि आमच्या हातून होणार तरी काय ?

हेम०—जर प्रत्येकानें आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें यत्न केला तरी पुष्कळ होईल. कमेटीचे मेंबर या नात्यानें आपण अनेक लोकहिताचीं कामें केलीं आहेत व त्याबद्दल आपली फार प्रशंसा होत आहे असें माझ्या ऐकण्यांत आहे.

चंद्र०—कामें कसलीं आणि प्रशंसा कसली ? अधिकारी जें करतात तें होतें आणि आह्माला त्याला मान डोलवावी लागते. लोकनियुक्त सभासद निवडून देण्याचा अधिकार कलकत्त्याला मिळाला आहे. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांतील लोकांना लोकनियुक्त सभासद निवडून देण्याचा अधिकार देऊन लार्ड रिपननें आपलें नांव चिरसंस्मरणीय करून ठेविलें आहे; पण तो अधिकार बजावण्याची पात्रता आमच्या अंगीं येईल कीं नाहीं याचाच संशय आहे.

हेम०—माझी खात्री आहे कीं अवश्य येईल.

चंद्र०—ती पात्रता अंगीं आली ह्मणजे खरोखर पुष्कळ फायदा होईल.

तेथें गेला आणि शरत्‌ला ह्मणाला, " शरत्, आज चंद्रनाथबाबूकडून आपणाला बोलावणें आलें आहे. मग चलावयाचें ना तिकडे ? "

शरत्०—हो, पण मी अगदींच विसरलों, होतों. मला मनापासून कोठेंही जाणें आवडत नाहीं, मी आलों नाहीं तर चालावयाचें नाहीं का ?

हेम०—छे, सुधा आजारी असतांना चंद्रनाथबाबू व नवीनबाबू आपल्या घरीं रहात असत, तेव्हां त्यांच्या घरीं न जाऊन कसें चालणार ? चल, आतांच जाऊं आपण तिकडे.

शरत् व सुधा हीं उठलीं. हेमचंद्रानें सुधेचा हात धरून तिला हळूंहळूं खालीं आणिलें आणि हंथरुणावर निजवून ते दोघेजण घराबाहेर पडले. चालतां चालतां हेमचंद्र शरत्‌ला ह्मणाला, "शरत्, सुधेच्या अजारांत तूं जें काय आमच्याकरितां केलें आहेस त्याची फेड या जन्मीं तरी माझ्या हातून होणें शक्य नाहीं. आमच्याकरितां तुझ्या अभ्यासांत मात्र व्यर्थ व्यत्यय आला. आतां परीक्षेला दिवस थोडे उरले तर आतां झटून अभ्यास कर."

शरत् थोडा वेळ स्तब्ध राहिला आणि नंतर ह्मणाला, "अवकाश थोडा उरला खराच, आणि आतां झटून अभ्यास केलाच पाहिजे. सुधेची प्रकृति हल्लीं बरी आहे; पण फुरसत सांपडली ह्मणजे तिला गच्चीवर घेऊन जाऊन तिची करमणूक करण्यास बिंदुताईस सांगून ठेवा. नवीनचंद्रानें सांगितलें आहे कीं, तिचें मन नेहमीं प्रसन्न ठेवलें तर तिला लवकर शक्ति येईल." अशा गोष्टी बोलतां बोलतां ते चंद्रनाथाच्या घरीं येऊन पोंचले.

नवीनचंद्राचा वडीलभाऊ चंद्रनाथबाबू हा भवानीपुरांत मोठा प्रतिष्ठित गृहस्थ होता. त्याचें वय तीस वर्षांहून फारसें अधिक नव्हतें. तो मोठा विद्वान्, परोपकारी व प्रसिद्ध वकील होता. शिवाय तो सुबर्बन म्युनिसिपालिटीचा लोकनियुक्त सभासद असल्यामुळें लोकहितार्थ तो विशेष यत्न करीत असे.

त्याचें घर फारसें मोठें नव्हतें; पण तें व्यवस्थित रीतीनें सजविलें होतें. घराला एक लहानसा दिवाणखाना होता. हाच दिवाणखाना चंद्रनाथबाबूचें हपीस होतें. ह्या हपिसांत टेबल, खुर्च्या, दोन पुस्तकांचीं कपाटें व कांहीं सुंदर तसबिरी होत्या. टेबलावर दोन शामदानें जळत होतीं. चंद्रनाथ, नवीन,

राज्यकारभार चालविण्याचें कर्तृत्व हल्लीं आपल्या अंगीं राहिलें नाहीं. आपसांत तंटे व परस्पराला शिव्या देणें हेंच आह्मांला इतिकर्तव्य वाटूं लागलें आहे. क्रमाक्रमानें आपली उन्नति होऊन आपल्या अंगीं देशहिताचीं कामें करण्याची पात्रता येईल अशी माझी पक्की खात्री आहे. रात्र संपल्यानंतर ज्याप्रमाणें सकाळ ही खास व्हावयाची, त्याप्रमाणेंच अज्ञानानंतर ज्ञान हें मिळावयाचेंच.

शरत्०—आपलें भाषण ऐकून मोठा संतोष झाला. माझ्याही मनांत अशी आशा उत्पन्न होते. पण ह्या कामांत आपणाला लोकांची सहानुभूति कशी मिळणार ? आह्मांला जें प्रिय तें लोकांना अप्रिय वाटणार व आमच्या मार्गांत अनेक विघ्नें आणण्याचा लोक प्रयत्न करणार.

चंद्रनाथ—शरत, तुमच्या वयाचा मी असतांना मला देखील असेंच वाटे. इंग्रजी वर्तमानपत्रांतून आमच्या समाजाची केलेली थट्टा पाहून मनास दुःख होई. पण हें पहा, सहानुभूति वगैरे जें काय तुह्मी ह्मणतां त्यांत कांहीं विशेष राम नाहीं. जरी लोकांनीं उपहास केला तरी विशेष फिकीर करण्याचें कारण नाहीं. आपलें कर्तृत्व आपल्या पराक्रमावर आहे, लोकांच्या सहानुभूतीवर नाहीं, हें ध्यानांत ठेवून उद्योगाला लागलें पाहिजे.

नवीन०—हळूं हळूं आपली उन्नति होत आहे हें मला मान्य आहे, पण त्या उन्नतीची गति मात्र फार मंद आहे. राजकीय उन्नतीची गोष्ट लांबच राहिली, पण समाजोन्नतीची तरी स्थिति काय आहे ? समाजोन्नतीसंबंधानें आज अर्धें शतक समाजाग्रणींचा सतत प्रयत्न चालू आहे पण त्यापासून काय निष्पन्न झालें आहे ?

चंद्र०—हें तर मी सुचिन्ह समजतों. ज्या समाजाची उन्नति फार जलद होते त्याची अवनतीही तितक्याच जलद होणार हें खास समजावें. फ्रान्स देशाचा इतिहास तुह्माला अवगत आहेच. शंभर वर्षांमागें त्यांनीं एकदम आपली उन्नति करून घेण्याची भयंकर खटपट केली, त्याचा परिणाम काय झाला तो ध्यानांत आणा ह्मणजे मी काय ह्मणतों तें ध्यानांत येईल. समा-

ह्यांच्या चालीरीतींत एकदम फेरफार करण्यांत कांहीं लाभ नाहीं, उलटा तोटा मात्र आहे.

नवीन०—पण ज्या चालीरीति सर्वांशीं त्याज्य आहेत त्या तरी नको का सुधारायाला ?

चंद्र०—मनाशीं विचार करून कांहीं दिवस तरी तिकडे कानाडोळा केला पाहिजे. समाजांत जर कांहीं अवसान असेल तर सर्वांशीं त्याज्य चाली-रीतींचा त्याग तो (समाज) आपोआपच करील.

नवीन०—माझेंही तेंच ह्मणणे आहे. आपल्या समाजाचीही उन्नति होते आहे यांत संशय नाहीं, पण मानवजीवित अति अल्प असल्यामुळें, होणाऱ्या प्रगतीची मंदगति पाहून उत्साह भंग होतो. व्यापारासंबंधांत आपले पाऊल किती मागें आहे बरें ? त्यासंबंधीं उन्नति होण्याला कायद्याची अवश्यकता नाहीं, सरकारच्या परवानगीची अवश्यकता नाहीं, जुन्या चालीरीति बदलण्याची अवश्यकता नाहीं. नुसता प्रयत्न केला पाहिजे; पण तो प्रयत्न तरी होतो आहे काय ? आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या कापसाचीं आपणाला वस्त्रें बनवितां येत नाहींत. आपल्याला अवश्यक लागणारा यच्चयावत् कपडा परदेशांतून येतो, यामुळें दिवसानुदिवस साळी व कोष्टी यांची अवस्था कष्टतर होत चालली आहे.

हेम०—कोष्टीलोक हातांनीं काम करून गिरण्यांच्या मालाशीं टक्कर देतील हें संभवनीय नाहीं. मीं खेड्यांतले पुष्कळ बाजार पाहिले आहेत, पुष्कळ गरी-बांच्या घरीं गेलों आहे. मला वाटतें पूर्वीं घरोघरीं चरखावर सूत काढण्याचें काम चालत असे; पण हल्लीं सुताचे चरख कोठेंही दृष्टीस पडत नाहींत. कारण हल्लीं उत्कृष्ट विलायती सूत हवें तितकें स्वस्त मिळूं लागलें आहे. बाजारांत ज्या देशी कापडाला दीडरुपया पडतो, त्याच जातीचें विलायती कापड बाराचौदा आण्यां-ला मिळतें; यामुळें कमी किंमतीला चांगला माल घेण्याकडे लोकांची साहजी-कच प्रवृत्ति होणार. कोष्ट्यांच्या निकृष्ट स्थितीकडे लक्ष देण्याचें कोणाच्या गांवीं असणार !

नवीन०—माझें सुद्धां तेंच ह्मणणें आहे. सुधारलेल्या राष्ट्रांत हातांचीं कामें बहुतेक बंद पडत चाललीं आहेत. यंत्राशिवाय काम करण्याचा मार्ग उरला

नाहीं. ह्मणून मी ह्मणतों, या आपल्या देशांत यंत्रांची समृद्धि कां होऊं नये ? आपल्या अंगीं उत्साह नाहीं का करामत नाहीं ?

चंद्र०—उत्साह व करामत ह्या दोहोंचीही वाण नाहीं. वाण आहे काय ती भांडवलाची. यथास्थित भांडवलाशिवाय गिरण्या अगर इतर कारखाने चालवितां येणार नाहींत. शिवाय आणखी एक गोष्टीची आपल्यांत वाण आहे; ती गोष्ट कोणती ह्मणून ह्मणाल, तर भागीदारीनें व्यापार करणें. मोठमोठे कारखाने उभारण्याला दहापांच धनिकांनीं भांडवल उभारून सर्वांनीं सारखें मन घालून एक जुटीनें काम केलें पाहिजे. आपल्या देशांत विद्वान् पुष्कळ आहेत, धनिक पुष्कळ आहेत, धार्मिक पुष्कळ आहेत व राज्यकार्यधुरंधरही पुष्कळ आहेत. विद्येची वाण नाहीं. पण दहापांच जणांनीं समाइकीनें काम करण्याचें शिक्षण आपणांस अद्याप मिळालें नाहीं. पण मला वाटतें, हळूं हळूं तेंही शिक्षण आपणास मिळेल.

अशाप्रकारें त्यांचें संभाषण चाललें असतां नोकरानें येऊन भोजनाची तयारी असल्याची वर्दी दिली, व ते सर्वजण उठून घरांत भोजनाकरितां गेले.

भोजन वगैरे आटोपून ते पुन्हां दिवाणखान्यांत येऊन बसले व थोडा वेळ गप्पागोष्टी झाल्यावर हेमचंद्र व शरत् आपआपल्या घराकडे जाण्यास निघाले.

शरत् थेट आपल्या घरीं गेला, पण हेमचंद्र चंद्रनाथबाबूच्या घरीं झालेल्या गोष्टींचा विचार करीत करीत बराच दूर गेला. वाटेनें स्वच्छ चांदणें पडलें होतें, सुंदर गार वारा सुटला होता; यामुळें आपण कोठें जात आहों याचें देखील त्याला भान नव्हतें.

यावेळीं रात्रीचे अकरा वाजले होते. हेमचंद्र आपल्या नादांत चालला असतां त्याच्या मागून एक सुंदर व विशाल गाडी आतिशय वेगानें येऊन नजीकच असलेल्या एका बागेच्या फाटकांत शिरली; तों गाडींतून स्त्रीच्या कंठांतून निघालेला हास्यध्वनि त्याच्या कानीं आला. तेव्हां हें काय असावें, याचा छडा लावण्याकरितां हेमचंद्र बागेच्या फाटकापाशीं आला, आणि पाहूं लागला

तों दाराशीं रामसिंग, फत्तेसिंग, बख्तसिंग प्रभृतींचा खडा पहारा. बागेंत अनेक पुतळे व एक सुंदर पुष्करणी दिसत होती. पुष्करणीच्या मागें एक इंद्रपुरीतुल्य सुंदर व भव्य इमारत होती व त्या इमारतीच्या खिडक्यांतून उज्वल प्रकाश बाहेर पडला होता व मधून मधून वाद्यांचा व स्त्रीकंठांतून निघालेल्या गाण्यांचा ध्वनि ऐकूं येत होता. हेमचंद्रानें हळूंच एका दरवानाला विचारिलें, “ ही बाग कोणाची ? ”

दरवानानें आपल्या दाढी व मिशावरून हात फिरवीत फिरवीत उत्तर दिलें, “ ही बाग कोणाची हें [illegible] माहीत आहे आणि तुह्माला माहीत नाहीं हें मोठेंच आश्चर्य [illegible] कीं, तुह्मी येथले राहणारे नसावें.”

हेम०—मी येथें नुकतांच आलों आहें व ह्या बाजूला कधींच आलों नाहीं ह्मणून चौकशी करतों आहें.

दर०—तरीच; येथल्या सर्व लोकांना ही बाग कोणाची हें माहीत आहे. कलकत्त्यांत जेवढे ह्मणून मोठमोठे लोक आहेत त्या सर्वांना ह्या बागेची माहिती आहे व ते सर्व नेहमीं येथें येतात.

हेम०—तें खरें, पण मी पडलों गरीब; मला कसें समजणार ?

दर०—बरोबर आहे. आज येथें मोठा जलशा व नाच आहे, पुष्कळ बडेबडे लोक येथें जमले आहेत.

हेम०—बरें, पण हा जलशा व नाच करविणार कोण, व ह्या बागेचा धनी कोण ?

दर०—धनपूरचे जमीनदार धनंजयबाबू.

हेमचंद्राच्या मस्तकावर जणुं काय वज्र कोसळलें.

हे हतभागिनी उमातारा ! द्रव्यांत जर सुख असलें, इंद्रपुरीतुल्य प्रासादांत जर सुख असलें, तर तुला हतभागिनी कसें ह्मणावें बरें !

षोडश परिच्छेद.

धनंजय बाबू.

ज्या रात्रीं हेमचंद्र धनंजयबाबूची बाग पाहून आला, तेव्हांपासून तो चिं-तातूर व खिन्न दिसूं लागला. उमातारेची अशी ही स्थिति ऐकून आपल्या स्त्रीला दुःख होईल ह्मणून त्यानें ही गोष्ट तिला कळविली नव्हती, पण स्त्रीपासून ही गोष्ट गुप्त ठेवणें हेंही त्याला प्रशस्त वाटेना. आतां काय करावें याचा त्याला मोठा विचार पडला. तसेंच हतभागिनी उमातारेची माहिती कशी मिळवावी व कोणत्या रीतीनें तिला सहाय्य करावें हेंही त्याला मोठें गूढ पडलें.

काय होईल तें होवो, एक वेळ स्वतःच धनंजयबाबूच्या घरीं जावें असें त्यानें ठरविलें. कारण लहानपणीं जेव्हां धनंजयबाबू तालपुष्करास येत असे त्यावेळीं तो मला मोठा मान देत असे, त्यावरून हल्लींही आपण त्यास दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या तर तो त्याचा अव्हेर करणार नाहीं; आणि यदाकदाचित तसें नच झालें तर निदानपक्षीं एकवेळ तिची स्थिति प्रत्यक्ष दृष्टीस पडेल, आणि मग कांहीं तरी उपाय काढितां येईल.

असा त्याचा मनाशीं विचार ठरला खरा, पण धनंजयबाबूची गांठ घेणें हें कांहीं सोपें काम नव्हतें. कलकत्त्यास धयंजयबाबूचा मोठा नांवलौकिक. त्याच्या घरीं मोठमोठ्या लोकांची व कामाची अतिशय भीड. अशाच्या घरीं हेमचं-द्रासारख्या गरिबाची दाद कशानें लागणार ? पण मनाचा धडा करून हेम-चंद्र धनंजयबाबूच्या त्या प्रासादतुल्य वाड्याशीं आला. तो दाराशीं आलेला पाहून कोणीही दरवान उठला नाहीं कीं कोणी त्याची चौकशी केली नाहीं. जो तो आपआपल्या कामांत व मिजाजांत चूर. अशा स्थितींत बराच वेळ गेल्यावर एका दरवानानें सहज आपली दृष्टि हेमचंद्राकडे फिरविली आणि विचारलें, "कां बाबूसाहेब, आपण येथें असें कां उभे राहिला आहां, आप-णांस काय पाहिजे ?"

हेम०—एक वेळ धनंजय बाबूसाहेबांची गांठ पडेल काय? त्यांच्या भेटी-करितां फार लांबून आलों आहें. तालपुष्कराहून कोणी हेमचंद्र नांवाचा गृहस्थ भेटण्यास आला आहे अशी वर्दी द्याल तर उपकार होतील.

दर०—बाबूसाहेबांकडे शेंकडों लोक येतात, त्या सर्वांची भेट घेण्याला त्यांना फुरसत कोठें आहे?

हेम०—बरें पण एक वेळ वर्दी तर द्या. माझें फार महत्त्वाचें काम आहे. एक वेळ गांठ पडली तर चांगलें होईल.

दर०—सर्वांचीच बाबूसाहेबांजवळ महत्त्वाचीं कामें असतात. सर्वच कांहीं आशेनें येथें येतात. तुमचें गांव काय सांगितलें? तालपुष्कर ना?

हेम०—हो, तालपुष्करच. तुमच्या बाबूसाहेबांची सासुरवाडी तथेंच आहे.

इतक्यांत दुसरा एक दरवान आपल्या जागेवरून उठून थोडा पुढें झाला आणि ह्मणाला, "हो, हो, बाबूसाहेबांची सासुरवाडी तालपुष्करास आहे हें मला माहीत आहे. तर मग काय तुह्मी बाबूसाहेबांच्या सासुरवाडीचें कोणी आहां कीं काय?

हेम०—सासुरवाडीचा कोणी नाहीं, पण थोडा संबंधी आहे.

हें ऐकून तो दरवान निरोप कळविण्याकरितां आंत गेला व हेमचंद्र त्याची वाट पहात उभा राहिला. सुमारें घटकाभरानें दरवान परत आला, आणि त्यानें सांगितलें, "बाबूसाहेब, तुह्मी जा परत. यावेळीं गांठ पडावयाची नाहीं."

हेम०—माझें नांव कळविलें का?

दर०—नांव सांगावयाचें कोणाला? बाबूसाहेब अद्याप उठले नाहींत, दहा वाजतां उठतील, त्या वेळीं या वाटलें तर.

हेमचंद्र मुकाट्यानें निघून गेला.

नंतर आणखी एके दिवशीं दहा वाजल्यावर गेला, पण बाबूसाहेब घरीं नव्हते. एके दिवशीं तिसरा प्रहरीं गेला तों बाबूसाहेब फिरावयास गेलेले.

एके दिवशीं संध्याकाळीं गेला तों बाबूसाहेब कोणा मित्राकडे भोजनास गेले होते. चार पांच वेळां अशा रीतीनें फुकटचे हेलपाटे टाकल्यावर पुन्हां एके दिवशीं संध्याकाळीं आला, तों बाबूसाहेब घरीं होते.

हेमचंद्राला पाहतांच दरवानानें विचारिलें, " काय तुमचें नांव ? गोवर्धन का गौरचंद्र ? "

हेम०—माझें नांव हेमचंद्र, मी ताळपुष्कराहून आलों आहें.

दरवान वर्दी देण्याकरितां वर गेला, व थोड्याच वेळांत परत येऊन त्यानें सांगितलें, " आपण वर जा. " हेमचंद्र माडीवर गेला.

धनपूरच्या धनेश्वर वंशाचा श्रीमान्, तरुण व गौरवर्ण वारस धनंजयबाबू आपल्या निवडक मित्रांसह दिवाणखान्यांत बसला होता. त्यानें शिष्टाचाराला अनुसरून आपल्या साटुला मखमलीनें मढविलेल्या कोचावर बसावयास सांगितलें. हेमचंद्राला मोठी धन्यता वाटली.

त्या दिवाणखान्याची अपूर्व शोभा पाहून हेमचंद्र अगदीं गोंधळून गेला. कलकत्त्यांतील मोठमोठाले वाडे व इमारती त्यानें बाहेरून पाहिल्या होत्या, लाटसाहेबांचा बंगला सिंहद्वारापर्यंत पाहिला होता, एक दोन इंग्रजी दुकानें आंत जाऊनही पाहिलीं होतीं, पण अशा प्रकारच्या सुंदर व सुशोभित इमारतींत जाण्याचा प्रसंग त्याला आजचा हा पहिलाच होता. दिवाणखान्यांत उंची उंची सतरंज्या हांथरल्या होत्या, त्यावरून आपले मळके जोडे घालून चालण्याचा त्याला संकोच वाटला. दिवाणखान्यांत अनेक उंची उंची कापडांनीं मढविलेलीं कोचें व खुर्च्या ठेविल्या होत्या. छतास अनेक हंड्या व त्रिलोरी झाडें टांगलेलीं होतीं व त्यांत ग्यासचे दिवे तेवत असल्यामुळें सर्व दिवाणखानाभर दिवसासारखा चक्क प्रकाश पडला होता. दिवाणखान्याच्या एका बाजूला सतार, सारंगी वगैरे वाद्यें पडलीं होतीं, व टेबलावर कांहीं ग्लास व कांचेच्या सुरया ठेवल्या होत्या. भिंतींना लावलेल्या शेंकडों आरशांत दिव्यांचीं प्रतिबिंबें पडलीं होतीं व त्यांत आपला तेजोहीन चेहरा पाहून हेमचंद्राला अधिकच लाज वाटूं लागली.

दिवाणखान्याचें थोडें बहुत वर्णन झालें, पण दिवाणखान्यांत बसलेल्या

सभासदांचें वर्णन कसें होणार! आज सभासद्गण फारसे नव्हते, पण होते ते धनंजय बाबूच्या गळ्यांतले अगदीं ताईत होते. त्यांचें यथास्थित वर्णन करणें अशक्य आहे पण त्यांच्या संबंधाच्या दोन गोष्टी सांगणें आवश्यक आहे.

धनंजय बाबूच्या उजव्या हाताला सुमतिबाबू बसला होता. तो सुंदर व तरुण होता. त्याचा धंदा काय तें कोणाला माहीत नव्हतें; पण मोठमोठ्या लोकांच्या उजव्या हाताला बसण्याला त्याला स्थान मिळत असे. तो गाण्यांत, विनोदांत व मोठमोठ्या लोकांचें मनोरंजन करण्यांत मोठा पटाईत होता. शिवाय तो लोकव्यवहारांत व द्रव्यसंचय करण्यांतही मोठा प्रवीण असे. मधमाशीप्रमाणें अनेक पुष्पांतील मधुसंचय करून त्यानें आपला खजीना भरून ठेविला होता. ह्याशिवाय श्रीमंत तरुणांना आपल्या जाळ्यांत ओढण्याचे दुसरे अनेक हुन्नर त्याजपाशीं होते अशीही बोलवा आहे. पण ती बोलवा सर्वांशीं खरी असावी असें त्याच्या भाषणावरून व चेहऱ्यावरून वाटत नव्हतें. मग वस्तुस्थिति काय असेल तें परमेश्वराला माहीत.

सुमतिबाबूच्या पाठीमागें यदुनाथ बसला होता. यदुनाथासारखी विद्वत्ता, कार्यदक्षता व हास्यविनोद इत्यादि गुण साऱ्या कलकत्त्यांत फार थोड्यांच्या अंगीं असतील. धंदा वकिलीचा, तोंडीं इंग्रजी बोली व वागण्याची रहाटी सर्व इंग्रजी तऱ्हेची. सर्व तऱ्हेच्या इंग्रजी पेयांचा तो पुरा दर्दी. त्याची भाषणाची शैली मोठी अप्रतिम असे. त्याचें 'स्वदेशाभिमान' ह्याविषयावरचें अपूर्व वक्तृत्व ऐकून कलकत्त्यांतील कोणत्या सुशिक्षितांचें मन कळवळलें नाहीं? यदुनाथबाबूप्रमाणें आपला लौकिक व्हावा अशी तरुणपिढींतील प्रत्येकाची मोठी महत्त्वाकांक्षा असे व त्याच्याशीं सहवास घडावा अशी प्रत्येक श्रीमंताची इच्छा असे.

यदुनाथबाबूच्या शेजारीं हरिशंकरबाबू बसला होता. हा गृहस्थ जुन्या चालीरीतीचा व जुन्याचा मोठा अभिमानी असे. त्याचें इंग्रजीचें ज्ञान फारसें नव्हतें, पण त्याची हुषारी विलक्षण असल्यामुळें त्याला फार मोठी नोकरी मिळाली होती. तो डोकीस साधा फेटा बांधून आफिसांत जात असे. हा जुन्या चालीरीतीचा असल्यामुळें साहेब लोकांचा ह्याजवर फार लोभ असे. ह्याचा हा जुन्या चालीरीतीचा अभिमानच त्याच्या अभ्युदयास कारणीभूत

झाला. ह्याचमुळे त्याच्या आफिसांतील मुख्य साहेबानें आफिसांतील इतर नोकरांचे हक्क बाजूस ठेवून त्याला सर्वांच्या वरची जागा दिली होती.

हरिशंकरच्या शेजारीं पाश्चिमात्यसुधारणाप्रिय मिस्तर कर्मकार बसले होते. त्यांचा पोषाख पक्का इंग्रजी होता. यूरोपांतून परत येतांना पाश्चात्य सुधारणेचें अखेरचें फळ त्यांनीं बरोबर आणलें होतें. सुमतिबाबू केव्हां केव्हां ह्यांच्या पाठीमागें उभा राहून व त्यांचा हा अपूर्व पोषाख पाहून आपल्या मित्रांस ह्मणे, " पाश्चात्य सुधारणेचा अर्थ मिस्तर कर्मकार यांच्या उदाहरणावरून आमच्या चांगला लक्ष्यांत आला."

हरिशंकरबाबूंच्या दुसऱ्या बाजूला विश्वंभरबाबू बसले होते. हे गृहस्थही मोठे प्रसिद्ध असून एका मोठ्या पेढीचे मुनीम होते. त्यांनीं बरेंच द्रव्य संपादन केलें होतें व एक टोलेजंग हवेली बांधून त्यांत मोठ्या थाटानें रहात होते. त्यांच्या पाठीमागें आणखीही कांहीं व्यापारी मंडळी बसली होती. त्या सर्वांचें सविस्तर वर्णन करणें अशक्य आहे.

असल्या ह्या प्रचंड सभेंत बिचारा हेमचंद्र काय बोलणार ? " हंसमध्ये बको यथा " अशी त्याची अवस्था होऊन तो क्षणभर तटस्थ बसला. नंतर कांहीं तरी बोललेंच पाहिजे ह्मणून त्यानें त्या बागेची बरीच स्तुति केली, ती ऐकतांच इतर सभासदांनींही त्यास आपली पूर्ण अनुमति दिली. नंतर त्यानें तालपुष्करच्या व उमेच्या बापासंबंधीं कांहीं गोष्टी काढल्या, पण त्या इतर सभासदांना रुचल्या नाहींत, एवढेंच नव्हे तर ते पुढें होणाऱ्या मैफलीस्तव अगदीं उतावीळ झाले. ही गोष्ट हेमचंद्राच्या लक्ष्यांत आली आणि यजमानाचा निरोप घेऊन तो तेथून निघाला.

अंगण्यांत येऊन हेमचंद्रानें थोडा वेळ इकडे तिकडे केलें; इतक्यांत बाहेरून आणखी दोन गाड्या येऊन दाराशीं उभ्या राहिल्या. गाडींतील मंडळी गाडींतून उतरून दिवाणखान्यांत शिरली. लागलीच गीतवाद्यास आरंभ झाला व तो सर्व दिवाणखाना आनंदध्वनीनें भरून गेला.

नंतर हेमचंद्र मुख्य घराच्या अंगणांत जाऊन उभा राहिला; पण तेथें पाहतो तों सर्वत्र अंधार व सामसूम. थोडा वेळ तो तसाच अंधारांत उभा राहून कोणास हाक वगैरे न मारतां मुकाट्यानें तेथून निघून गेला.

सप्तदश परिच्छेद.

हतभागिनी.

हेमचंद्र घरीं आला आणि आपल्या मनाशीं ह्मणाला, " खरोखर मी अगदीं वेड्यासारखें काम केलें. स्त्रियांचें दुःख स्त्रियांनाच कळणार. ह्मणून माझा प्रयत्न व्यर्थ होणार. या करितां ही सर्व हकीकत आपल्या स्त्रीस कळवावी आणि मग ती काय करते तें पहावें. "

हेमचंद्राचें मुख अतिशय म्लान व खिन्न पाहून बिंदूनें विचारिलें, " आज आपणाला काय झालें आहे ? आपलें मुख असें म्लान कां ? "

हेम०— बैस, सर्व सांगतों. सुधा निजली का ?

बिंदू — सुधेचें जेवण खाण होऊन ती निजली आहे. बरें पण कांहीं वेडी वांकडी तर खबर नाहीं ना ?

हेम ०— सर्व सांगतों ऐक.

इतकें बोलून त्यानें जें काय पाहिलें होतें व ऐकिलें होतें तें सर्व बिंदूस कळविलें.

पदरानें अश्रु पुशीत पुशीत बिंदु ह्मणाली, " असें होईल असें मला आणि हतभागिनी उमेलाही वाटत होतें. "

हेम०—तें कशावरून ?

बिंदु—तें पक्कें सांगतां येत नाहीं, पण तालपुष्करास असतांनाच कलकत्त्यांतली थोडथोडी बातमी आमच्या कानावर आली होती त्यावरून ह्मणतें.

हेम०—बरें पण आतां ह्याला उपाय ? माझ्या कानावर जी बातमी आहे त्यावरून असें वाटतें कीं धनेश्वर कुळाचें द्रव्य एक दोन वर्षांत पार नाहींसें होईल, धनंजय रोगग्रस्त होईल व बिचाऱ्या उमेची स्थिति दरिद्र्याहून दरिद्री होईल.

बिंदु—आपण ह्मणतां ही पुढील दोन वर्षांची स्थिति, पण सध्यां उमेची

अवस्था काय आहे ? ती स्वभावतः मोठी अभिमानिनी असून पतीचें असें हें वर्तन तिला कसें खपतें ? तालपुष्कराहून आल्यापासून ती बिचारी एवढ्या थोरल्या वाड्यांत एकटी कशी राहते ? आपण एकवेळ तिला भेटून आला असतां तर बरें होतें.

हेम०—मी जाऊन तिला भेटणें प्रशस्त दिसलें नाहीं. मी ह्मणतों, तंच एकवेळ जा आणि आपलें कर्तव्य कर. मग पुढें ईश्वर आहे.

इतकें बोलणें झाल्यावर दुपारचें भोजन वगैरे आटोपून आपल्या दोन्ही मुलांना सुधेजवळ ठेवून बिंदु उमेला भेटण्यास निघून गेली. सुधेच्याही मनांतून जाण्याचें फार होतें, पण बिंदु ह्मणाली, आज नको, आणखी एखादा दिवशीं तुला घेऊन जाईन.

बिंदु उमेच्या घरीं गेली आणि तिनें पाहिलें तों उमा एका मोठ्या खोलींत असून आपली वेणी आपणच घालीत होती. उमेची सांप्रतची स्थिति पाहून बिंदूला फार वाईट वाटलें. जिच्या सौंदर्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती ती तालपुष्करची उमा हीच का ? असा तिनें आपल्या मनाशीं प्रश्न केला. उमेच्या शरीराचा वर्ण काळा झाला होता, डोळे खोल गेले होते, गळ्याचीं हाडें बाहेर दिसत होतीं व तिचें सर्व शरीर अगदीं निस्तेज व कृश दिसत होतें. चार आठ महिन्यापूर्वी जी अगदीं लावण्यवती नवयौवना सुंदरी दिसत होती तीच आज तीस वर्षांच्या रोगपीडित स्त्रीप्रमाणें दिसूं लागली.

पावलांचा ध्वनि ऐकून उमेनें मागें वळून पाहिलें तों बिंदु तिच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच उमा ह्मणाली, " बिंदु ताई, मी किती तुझी वाट पहातें आहें. तुझी तब्येत तर ठीक आहेना ? मुलं बाळें खुशाल आहेत ना ?

तिच्या त्या प्रश्न विचारण्याच्या तऱ्हेवरून व तिच्या खोल गेलेल्या आवाजावरून उमेच्या मनाची सांप्रतची स्थिति चाणाक्ष बिंदूनें तेव्हांच ताडली. पण मनांतलें दुःख बाहेर न दाखवितां तिनें उत्तर दिलें, " हो, आमच्या सर्वांच्या तब्येती खुशाल आहे. सुधेला फार ताप येत होता पण आतां तिची प्रकृति ठीक आहे. बरें पण उमा, तुझी तब्येत कशी काय आहे ? तूं अशी अशक्त कां दिसतेस ?

उमा—तसें कांहीं नाहीं बिंदुताई, मी कलकत्त्यास आलें तेव्हां मला भ्रमांश झाला होता पण तो लवकरच बरा झाला, हल्लीं थोडा खोकला झाला आहे. मला वाटतें येथलें पाणी मला सोसत नाहीं. तालपुष्करास माझी तब्येत चांगली असे.

बिंदु—तालपुष्करास जाण्याचें तुझ्या मनांत आहे का? आह्मी थोड्याच दिवसांत जाणार आहों, तूं येतेस का?

उमा—तें माझ्या इच्छेवर नाहीं. मला घरांतून परवानगी मिळेलसें दिसत नाहीं.

बिंदु—येथें तुझी शुश्रुषा कोण करतें? आमचें बिऱ्हाड येथून फार दूर यामुळें मुलाबाळांना सोडून वारंवार येतां येत नाहीं. तुझी तर अवस्था अशी. तुझ्या शुश्रेषेला कोणी तरी मायेचें मनुष्य अवश्य पाहिजे.

उमा—माझ्या तब्येतीकरितां एक चांगला डाक्तर ठेवला आहे तो प्रकृतीचें मान पाहून रोज औषध देतो तें मी नियमानें घेतें.

बिंदु—तें झालें, पण मायेचें मनुष्य असल्याशिवाय का कोठें नीट शुश्रुषा होते? तुझी तब्येत आणखी बिघडली तर घरांतली व्यवस्था तरी कोण पाहणार? ह्मणून ह्मणतें तूं आपल्या आईला का नाहीं चार दिवस बोलावून आणीत. तुझी तब्येत सुधारली ह्मणजे जाईल ती परत.

उमा—तिला आणून काय करावयाचें आहे? माझ्या रोगाची चांगली चिकित्सा चालली आहे, घरांत दासदासी पुष्कळ आहेत यामुळें कसलीच अडचण पडत नाहीं मग तिला येथें आणण्यांत फायदा काय?

बिंदु—तें सर्व खरें पण आईची सर कोणाला येईल काय? बरें पण, घरांतून तरी तुझी कांहीं वास्तपुस्त करतात का?

उमा—हो वास्तपुस्त करतात तर. मला कांहीं वस्तु लागली कीं ताबडतोब आणवून देतात.

आपल्या दुःखाचें खरें कारण उमा चोरून ठेवीत आहे हें बिंदूच्या ध्यानांत आलें. थोडा वेळ मनाशीं विचार करून बिंदू ह्मणाली, " मला वाटतें तुझी आई चार दिवस येथें येऊन राहिली तर चांगलें होईल. सुख,

दुःख व व्याधि सर्वांच्याच मागें लागलीं आहेत. पण आपली तब्येत अस्वस्थ असतांना मायेचें माणूस जसें उपयोगीं पडेल तशीं चाकरमाणसें उपयोगीं पडतील का? आमची सुधा आजारी पडली होती तेव्हा आह्मांला तिची किती शुश्रुषा करावी लागली, तेव्हां कोठें तिची तब्येत सुधारली. उमे, तुझी तब्येत फारच बिघडली आहे तेव्हां आतां पासूनच काळजी घ्यावी हें चांगलें. आईला तूं आज पत्र लिही, नाहींतर मला तरी लिहावयास सांग, ह्मणजे मी लिहितें. अरेरे! तुझी स्थिति काय होती आणि हल्लीं काय झाली आहे!" इतकें बोलून बिंदूनें मोठ्या प्रेमानें उमेच्या तोंडावरून हात फिरविला.

एवढ्या देखील प्रेमाचा उमेला फार दिवसांत अनुभव नव्हता. बिंदूचे प्रेमाचे दोन शब्द ऐकून उमेचें हृदय व नेत्र भरून आले, व एक दीर्घ निःश्वास टाकून ती ह्मणाली, "बिंदुताई, लहानपणापासून तुझें मजवर निस्सीम प्रेम आहे" पुढें तिच्यानें बोलवेना.

बिंदूनें विचारलें, "तुझें मजवर प्रेम नाहीं का?"

उमा—आहे, जिवांत जीव आहे तोपर्यंत माझें तुजवर प्रेम राहील.

बिंदु—तर मग मजशी अशी उडवा उडवी कां? तुझ्या मनांतील दुःख मला कळत नाहीं कीं काय? ह्या जगांतील तुझी सर्व सुखाशा नष्ट झाली आहे हें मला समजत नाहीं कीं काय? तुझें लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांनीं तूं ज्या आपल्या पतिप्रेमाच्या गोष्टी मोठ्या आनंदाने मला सांगत होतीस त्या सुखाला सांप्रत तूं मुकली आहेस हें मला कळत नाहीं कीं काय, ह्मणून तूं ह्या सर्व गोष्टी मजपासून छपवून ठेवते आहेस. मी कोणी परकी का आहें? तुह्मी आह्मी जर अशा परक्या परक्या प्रमाणें वागूं लागलों तर जगांत आपलें असें कोण आहे?

बिंदूचें हें प्रेमपूर्ण व खऱ्या कळवळ्याचें भाषण ऐकून उमेचें हृदय भरून आलें, व ती बिंदूच्या अंगावर मान टाकून पोटभर रडली. नंतर कांहीं वेळानें ती ह्मणाली, "बिंदुताई, आजपर्यंत मी तुजपासून कांहीं चोरून ठेविलें नाहीं आणि यापुढेंही ठेवणार नाहीं, पण आज क्षमा कर. मी आपली सर्व हकीकत तुला आणखी एखादे दिवशीं सांगेन."

बिंदु— आणखी एखादे दिवशीं कशाला, आताच सांग. हें बघ, आपलें दुःख दुसऱ्याला कळविलें ह्मणजे मन शांत होतें.

उमा—तर मग तुला काय सांगूं बोल ?

बिंदु—तुझ्या पतीचें पूर्वीप्रमाणें तुजवर प्रेम आहे का ? सांग पाहूं ?

उमा—मला जें काय लागेल तें आणून देतात, डाक्तराकडून माझ्या रोगाची चिकित्सा चाललीच आहे. मग प्रेम नाहीं असें कसें ह्मणतां येईल ?

बिंदु—मी का कोणी पुरुष, ह्मणून मला अशी उडवाउडवीचीं उत्तरें देतेस ? अन्न, वस्त्र व औषध दिलें ह्मणजे पतिप्रेम झालेंना ? असल्या प्रेमाची गोष्ट मी नाहीं विचारीत. धनंजय बाबूंचें पूर्वीप्रमाणें तुजवर प्रेम आहे का ? पूर्वीप्रमाणें मन मोकळें करून ते तुझ्याशीं बोलतात का ? तुझ्या संगतींत पूर्वीप्रमाणें ते आनंदांत असतात काय ? उमे, बायकांना बायकांजवळ असल्या गोष्टींसंबंधानें अधिक उघड विचारतां येतें कां ? पतीचें प्रेम हें धनवती स्त्रीचें धन, दरिद्री स्त्रीचें सुख व सर्व स्त्रीजातीचें जीवन आहे. तशा प्रकारचें पतीचें प्रेम तुजवर आहे का ?

बिचाऱ्या उमेला " नाहीं " असें ह्मणवेना, तिनें नुसती मान हालवून बिंदुच्या प्रश्नाचें उत्तर दिलें आणि तोंड खालीं करून ती रडूं लागली.

बिंदुचा चेहरा गंभीर झाला आणि ती मोठ्या कळवळ्यानें ह्मणाली, " पतिप्रेम नष्ट झालें तर स्त्रियांचें दुर्दैवच ओढवलें ह्मणावयाचें. बरें पण तें प्रेम पुन्हां प्राप्त करून घेण्याकरितां तूं कांहीं प्रयत्न केलास का ?

उमा०—माझें त्यांच्यावर किती प्रेम आहे हें एकट्या भगवंताला माहीत. ते नुसते माझ्या दृष्टीस पडले तरी माझा आनंद गगनांत मावत नाहीं.

बिंदु०—तुझें पतिवरचें प्रेम मला माहीत आहे, देव करो आणि तें तसेंच अखंड राहो. पण आपल्या नुसत्या प्रेमानेंच पतिप्रेम मिळत नाहीं. स्त्रियांना त्याहून दुसरें कांहीं कर्तव्य अवश्य आहे.

उमा०—जो आपलें सर्व तऱ्हेचें रक्षण करतो, जो आपला आश्रयगुरु त्यावर प्रेम हें अवश्य केलेंच पाहिजे. प्रेमाशिवाय त्याला देण्यासारखी आपणांजवळ कोणती वस्तु आहे ?

बिंदु—पतीवर प्रेम ठेवणें हें स्त्रियांचें मुख्य कर्तव्य खरें. पण त्याहूनही दुसरें कांहीं अवश्यकर्तव्य आहे. तें नसेल तर संसार चालावयाचा नाहीं. जो आपणाकरिता इतकें करतो त्यांचें मन नेहमीं आनंदित राखण्यास आपणाला शिकलें पाहिजे. त्याचप्रमाणें संसारांतील सुखदुःखें भोगण्यास व राग सोडून अंगीं शांति धरण्यासही शिकलें पाहिजे. ते गुण अंगीं असले तरच संसार सुरळीत चालतो. अंगीं धैर्य व क्षमा राखल्यानें संसार लोण्याहूनही मऊ होतो पण त्याचा जर का अभाव असला तर उत्कृष्ट संसारही अगदीं विषमय होतो.

उमा—बिंदुताई ह्या गोष्टी मी तुजकडून लहानपणीं ऐकल्या आहेत. तालपुष्करास तुझ्या गरिबीचा संसार पाहून जें कांहीं मी शिकलें त्यापासून माझा फायदाच झाला. धनाभिमानिनी ह्मणून लोक माझी निंदा करीत पण मी केवळ पतीच्या संतोषाकरितां हिऱ्या मोत्यांचे दागिने अंगावर घाली, हाच काय तो माझा अभिमान. लोक मला रूपाभिमानिनी ह्मणून नांवें ठेवीत, पण माझा थाटमाट व डामडौल सर्व पतिकरितांच असे. मी कलकत्यास आल्यापासून त्यासंबंधानें विशेष दक्ष राहूं लागलें.

बिंदु—तूं असें करशील हें मला माहीत आहे. लोकांनीं जरी तुला नांवें ठेविलीं तरी मी ठेवणार नाहीं. धैर्य, क्षमा, प्रेम व सदा आनंदीपणा ह्यांचें तुला चांगलें शिक्षण मिळालें आहे. प्राचीनकाळीं जर आपण मोठ्या घरच्या सुना झालों असतों तर सासूच्या भयानें, नणंदांच्या भयानें, जावांच्या भयानें आपला स्वाभाविक दांडगेपणाला आळा बसून आपलें कांहीं एक न चालतां सासूबाईंच्या मर्जीप्रमाणें संसार चालता. हल्लीं सर्वांना पृथक् पृथक् राहण्याची संवय झाली आहे, मुलाबाळांना ही आपल्या मर्जीप्रमाणें वर्तन करतां येतें. सुनांना पूर्वींची शिस्त राहिली नाहीं यामुळें संसारसुख सहजच नष्ट होतें.

उमा—बिंदु ताई, पूर्वींची एकत्र राहण्याची पद्धत फार चांगली असें मला नेहमीं वाटतें. त्यामुळें मुलें बिघडत नाहींत व मुलींनाही चांगली शिस्त लागते.

बिंदु—चांगलें, वाईट, हें सर्व पद्धतींत आहेच. आपली काळीतारा मोठ्या कुटुंबांत आहे, त्या बिचारीला काय सुख आहे? मोठ्या कुटुंबांत एकत्र राहण्याचें हेंच का सुख?

उमा—कालीच्या दुःखाचें कारण वेगळें आहे. वृद्ध पतीशीं तिचा विवाह झाल्यामुळें ती प्रणयसुखाला सर्वस्वीं मुकली आहे.

बिंदु—मी प्रणयसुखाबद्दल कांहीं ह्मणत नाहीं. पण रोज सकाळपासून संध्याकाळपर्यंन सारखे काबाडकष्ट करून वर तिला सर्वांच्या शिव्या खाव्या लागतात ह्याचें कारण काय ?

उमा—त्याचें कारण तिची आजेसासू मोठी कजाग आहे हेंच.

बिंदु—मग मोठ्या कुटुंबांत सर्वच माणसें चांगलीं कोठून असणार ? एखादें मनुष्य जरी वाईट असलें तरी सर्व बिनसतें, आणि त्याचा परिणाम कालीतारेसारख्या सुशील मुलीला फारच भोगावा लागतो, असं नेहेमीं आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. आणि ह्मणूनच लोक ऐपत असली ह्मणजे विभक्त राहण्याची इच्छा करतात, नाहींतर मुद्दाम होऊन आपल्या माणसांचा त्याग कोण करील ?

अशा प्रकारें त्यांचें संभाषण चाललें असतां रस्त्यांत घोड्यांच्या टापांचा शब्द ऐकूं आला, व एक गाडी दाराशीं येऊन उभी राहिली. उमेला त्याचा अर्थ समजला व ती जाग्यावरून उठली नाहीं. बिंदु मात्र तें काय आहे हें पाहण्याकरितां खिडकी जवळ जाऊन उभी राहिली.

तिच्या दृष्टीस जें कांहीं पडलें त्यामुळें तिच्या नेत्रांतून टपटपां अश्रु गळूं लागले. धनंजय बाबू या वेळीं बागेंतून घरीं आले. त्यांचा पोषाख अगदीं अव्यवस्थित झाला होता व ते स्वतः पूर्ण बेसावध असल्यामुळें त्यांच्या दोन नोकरांनीं त्यांना धरून वर नेलें.

तें दृश्य पाहून बिंदूच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. तिनें उमेला आपल्या पोटाशीं धरिलें आणि ती ह्मणाली, " तुझ्या सांप्रतच्या स्थितीचें खरें कारण मला कळून आलें. तुझ्या रोगाचेंही कारण हेंच. पण याला उपाय काय ? नम्रपणानें वागून तुझ्यानें सोसवेल तितकें सोस, उलट उत्तर देऊं नकोस, व नेहमीं पतीला संतुष्ट राखण्यास कायावाचामनें करून झट, एवढेंच तुला माझें आग्रहाचें सांगणें आहे. तुझ्या आईला मी आजच पत्र लिहितें. तूं मात्र धैर्य धरून परमेश्वरावर भार टाकून स्वस्थ रहा; ह्मणजे ईश्वर तुजवर कृपा करून तुला सुखाचे दिवस दाखवील. "

दोघी बहिणी परस्परांस आलिंगन देऊन मनसोक्त रडल्या. बिंदूच्या भाषणावर कांहीं एक उत्तर न देतां उमा आपल्या मनाशीं ह्मणाली, " परमेश्वर मज अभागिनीला मृत्युशिवाय दुसरें कोणतें सुख दाखविणार ? "

अष्टादश परिच्छेद.

दुसरी एक हतभागिनी.

बिंदु घरांत शिरते न शिरते तों सुधा तिला ह्मणाली, " आक्का, तुजकडे कोणी आलें आहे. "

बिंदु—कोण आलें आहे ?

सुधा—पहाना, तूंच कोण आहे तें ?

बिंदु—शरत् बाबू कीं काय ?

सुधा—शरत् बाबू नव्हे. आक्का, शरत बाबू अलीकडे कांग येत नाहींत ?

बिंदु—त्याची परीक्षा जवळ आल्यामुळें त्याला यायला फावत नाहीं.

सुधा—आक्का, परीक्षा कधीं आहे ग ?

बिंदु— आणखी दोन महिन्यांनीं.

सुधा— परीक्षा झाल्यावर मग नेहेमींप्रमाणें येतील ना ?

बिंदु— हो, मग येईल तर काय झालें. सध्यां सुद्धां फुरसत सापडली कीं येईल. बरें पण मजकडे कोण येऊन बसलें आहे ?

सुधा— मी नाहीं सांगत कोण आहे तें ?

बिंदु— चंद्रनाथबाबूंची बायको आली आहे कीं काय ? ती कधीं कधीं येथें येते; दुसरें कोण असणार ?

सुधा— ती नव्हे.

बिंदु— तर मग देवीबाबूंची बायको असेल.

सुषा— तीही नव्हे, —सांगूं मग कोण आहे तें—आपली कालीतारा आली आहे.

बिंदु— कालीतारा ! ती येथें आल्याचें ऐकलें देखील नव्हतें.

असें बोलत बोलत दोघी बहिणी घरांत शिरल्या. कालीतारा फारादिवसांनीं भेटली ह्मणून बिंदूला फार आनंद झाला व ती ह्मणाली, " काली, तूं येथें कधीं आलीस ? तब्येत ठीक आहे ना ? "

काली॰—येऊन आज पांच सात दिवस झाले, पण कामामुळें येण्यास फुरसतच झाली नाहीं. आज वेळांत वेळ काढून सासूबाईंना विचारून आलें. घरांत तब्येत ठीक नाहीं.

बिंदु— कोणाची तब्येत ठीक नाहीं ? काय होतें आहे ?

काली॰—घरांतलीच प्रकृति बिघडली आहे. ह्मणून औषधपाण्याकरितां येथें आलों आहों. वर्धमानास पुष्कळ औषधोपचार केले पण गुण नाहीं. येथें एका प्रसिद्ध इंग्रज डाक्तराचें औषध सुरू केलें आहे, मग पहावें पुढें काय होतें तें. इतकें बोलून कालीतारा रडूं लागली.

बिंदु—रडूं नको अशी. असा रोग तरी काय आहे ?

काली॰—ज्वर व अमांश; यामुळें शरीराचा अगदीं अस्थिपंजर उरला आहे. आतां करावें तरी काय ? इतकें बोलल्यावर कालीला पुन्हां हुंदका आला.

बिंदु—रडूं नको अशी, रडून काय होणार ? औषधपाण्याची नीट व्यवस्था ठेव ह्मणजे प्रकृति सुधारेल. मला वाटतें, ह्या जीर्ण ज्वराला डाक्तरापेक्षां वैद्याचें औषध बरें.

काली॰—वैद्यांनीं हात टेंकले, ह्मणून तर इंग्रजी डाक्तरांचे उपाय सुरू केले.

बिंदु— बरें, पण तुह्मी येथें राहिलां आहां कोठें ?

काली॰—कालीघाटावर नदीकांठीं एक घर भाड्यानें घेऊन राहिलों आहों.

बिंदु— तिकडे कशाला राहिला ? ह्या पावसाळ्यांत तेथली हवा फार सर्द असते; ती आजारी माणसाला अगदीं उपयोगी नाहीं,

बिंदु— तें खरें पण करणार काय ? येथें जातिधर्माचा मुळींच विचार रहात नाहीं, ह्मणून इकडे येण्याचें मनांत नव्हतें; पण आह्मी सर्वांनीं मोठ्या मिनतवारीनें व आर्जवानें इकडे येण्याविषयीं मन वळविलें. करणार काय ? त्यांच्या जिवावर आमच्या सर्व अशा ! आह्मांला दुसरें कोण आहे ? त्यांचें बरें वाईट झालें तर आमचें कसें होईल ?

इतकें बोलून कालीतारा ओक्साबोक्शीं रडूं लागली. बिंदूनें तिचें पुष्कळ शांतवन केलें आणि नंतर ती ह्मणाली, " अशी धीर सोडूं नकोस, औषधोपचार चालले आहेत, लवकरच गुण येईल. आमची सुधा आजारी पडली होती तेव्हां घरांतून, मी आणि शरतनें रात्रंदिवस एकनिष्ठपणें तिची शुश्रुषा केली, तेव्हां तिला आराम पडला. तूं असा धीर सोडूं नकोस, आह्मी सर्वजण तुझ्या हिताकरितां वाटेल तें करूं. "

काली०—बिंदुताई, शरत रोज येथें येतो का ?

बिंदु—पूर्वी येत असे, पण सध्यां त्याची परीक्षा जवळ आली असल्यामुळें येत नाहीं. ह्मणून अभ्यास करण्याबद्दल त्याला घरांतूनही सांगितलें आहे.

काली०— त्याला मधून मधून यावयाला सांगत जा. रात्रंदिवस अभ्यास करण्यानें तो अगदीं निस्तेज दिसूं लागला आहे. काल मजकडे आला होता तर मला कांहीं प्रथम ओळखतां आला नाहीं.

बिंदु—हें कांहीं मला माहीत नव्हतें. परवांपर्यंत त्याच्या चेहऱ्यांत मला कांहीं फरक दिसला नाहीं. इतका का तो अलिकडे अभ्यास करतो ? नाहीं झाली परीक्षा पास तरी पतकरलें, पण असें हें शरीराचें मातेरें करणें नको. मी आतां एक दिवस घरांतून त्याला बोलावून आणवितें आणि दोन दिवस येथेंच ठेवून घेऊन त्याची चांगली समजूत करतें.

नंतर उमातारेच्या गोष्टी निघाल्या. उमेच्या संबंधानें बिंदूचें जें कांहीं ऐकलें व पाहिलें होतें तें सर्व तिनें कालीला सांगितलें. कालीला तें ऐकून फार वाईट वाटलें. नंतर बिंदु ह्मणाली, " आजच मी उमेच्या आईला पत्र पाठवितें. ती आली ह्मणजे नीट व्यवस्था लागेल. ती कलकत्ता सोडून तालपुष्करास गेली बरच तिची तब्येत सुधारेल. नाहीं तर कठीण दिसतें.

काली०— तुह्मीही ह्या भाद्रपद महिन्यांत परत जाणार होता ना? भाद्र-पद महिना तर बहुतेक संपत आला.

बिंदु— जायचें होतें खरें, पण जाणें झालें नाहीं; आणि सध्यां तर उमेची तब्येत नादुरस्त, तुझ्या घरचीही प्रकृति नादुरस्त. तेव्हां मग कसें जातां येणार? कालीपूजा ह्मणजे दसरा झाल्याशिवाय आमचें जाणें होईलसें दिसत नाहीं. दसऱ्याला फारसा अवकाशही उरला नाहीं.

काली०— मग तुमच्या शेताभाताची व्यवस्था कोण पाहील?

बिंदु— सनातनाकडे आह्मीं आपली जमीन भागीदारीनें दिली आहे. तो आमच्या खात्रीचा आहे. आमच्या वांटणीचें सर्व धान्य तो कोठारांत भरून ठेवील अशी आमची पूर्ण खात्री आहे.

नंतर कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर कालीतारा निघून गेली.

संध्याकाळच्या सुमारास हेमचंद्र घरीं आला. बिंदूनें फराळाचें पान वाढिलें आणि नंतर तीं दोघें बोलत बसलीं.

हेम०— एकीकडे उमेची तब्येत अस्वस्थ! दुसरीकडे कालीच्या नवऱ्याची प्रकृति नादुरस्त! तिकडे प्रकृतीकडे दुर्लक्ष्य करून शरत्‌चा अभ्यास! आतां लक्ष्य द्यावें तरी कोणीकडे! आणि उपाय तरी काय करावा? संकट-समयीं आमची सल्लामसलतगार तूंच. तर तूंच कांहीं तरी युक्ति काढ.

बिंदु— दैवीं जें कांहीं लिहिलें असेल तें फिरविणें कोणाच्या हातीं नाहीं.

हेम०— तरी पण उमेला काय सांगून आलीस?

बिंदु— दुसरें काय सांगायचें? आपल्या पतीला वश करून घेण्याचा मला माहित असलेला उपाय सांगून आलें.

हेम०— तो उपाय काय? आह्मांला कळेल का?

बिंदु—उपाय कसला असणार? पतीचें लक्ष्य आपल्याकडे लागेल अशा तऱ्हेनें वागण्याचा तिला उपदेश करून आलें. शिवाय तिच्या आईला पत्र पाठविण्याचें कबूल करून आलें आहें. तिची आई आली ह्मणजे उमेचें मन प्रसन्न राहील व तिच्या नवऱ्यालाही तेवढा वचक राहील.

हेम०— बरें पण तिची आई जावयाच्या घरीं कशी राहणार ?

बिंदु— मी सविस्तर पत्र पाठविलें ह्मणजे राहील. कांहीं झालें तरी आईचें आंतडें तें !

हेम०— कालीतारेसंबंधानें काय उपाय योजला आहेस ?

बिंदु— त्यासंबंधानें आपल्यालाच तसदी घेऊन रोज एक वेळ तिच्या बिन्हाडीं जाऊन रोग्याची वास्तपुस्त करून आलें पाहिजे. तेथें खरी काळजी करणारें असें कोणी माणुस नाहीं. रोज रोज देवाचा प्रसाद खावयास देऊन ते रोग्याची तब्येत अधिकच बिघडवितील. याकरितां योग्य डाक्तराची व औषधपाण्याची व्यवस्था ठेवण्याचें काम आपणालाच केलें पाहिजे.

हेम०— तें मी अवश्य करीन. उद्यां सकाळींच मी तिकडे जातों. बरें, शरत्बद्दल काय करणार ?

बिंदु— त्याच्या संबंधानेंही कांहींतरी केलें पाहिजे; नाहींतर तो अभ्यास करकरून अजारी मात्र पडेल. सुधे, तूं शरत्ची काळजी घेशील का ?

जवळच थोड्या अंतरावर सुधा खेळत होती ती धांवत धांवत जवळ आली आणि ह्मणाली, " आक्का, मला हाक मारलीस होय ? "

बिंदु हांसत हांसत ह्मणाली, " हो, हाक मारिली. शरत्ची काळजी तूं घेशिल ना ? "

सुधेचें शरीर कंटकित झालें व ती बालिका लज्जावनतमुखानें तेथून निघून गेली.

ऊनविंश परिच्छेद.

शारदीपूजा व विजयादशमी.

शारदीपूजेचे दिवस जों जों जवळ येऊं लागले तों तों लहानमोठ्या सर्वांना मोठा आनंद वाटूं लागला. कामकाजानिमित्त आणि नोकरी

निरनिराळ्या ठिकाणीं असलेले लोक आपआपल्या गांवीं जाण्याची तयारी करूं लागले.

पण हे दिवस सर्वांनाच आनंदाचे कोठून असणार? दारिद्र्याचें दुःख नाहींसें होतें पण शोकार्ताचा शोक नाहींसा होत नाहीं. उमातारिणी आई कलकत्त्यास आली, बिंदूही वारंवार उमेच्या समाचारास व शुश्रुषेस जाऊं लागली. पण उमेच्या रोगाची पिछेहाट ह्मणून होईना. सासू घरीं आल्यावर थोडे दिवस धनंजयबाबू थोडा निवळल्यासारखा दिसूं लागला. पण पुढें लवकरच पूर्वपदावर गेला. त्यानें घरीं येणें अगदींच वर्ज्य केलें. उमेची आई परत आपल्या गांवीं जाण्याचा विचार करूं लागली; पण मुलीची प्रकृति दिवसेंदिवस जास्तच खंगत चाललेली पाहून तिला जाववेना. उमेची तब्येत अधिक अधिक बिघडत चालली; तिचा खोकला हळूं हळूं वाढत चालला; तोंड निस्तेज दिसूं लागलें व डोळे खोल गेले. इतकी जरी अवस्था झाली होती तरी आपल्या दुर्दैवाची काहणी कोणाजवळ न सांगतां ती मोठ्या धीरानें गृहकृत्यें करी व पतीकरितां खाण्याचे निरनिराळे पदार्थ स्वहस्तानें तयार करून पाठवीत असे.

हेमचंद्राच्या शुश्रूषेनें कालीतारिच्या पतीची तब्येत थोडी सुधारली, पण अगदीं निर्दोष झाली नाहीं. कारण एकतर उतारवयांतील दुखणें, त्यांत संसारातल्या अनेक काळज्या व शिवाय कालीघाटावरील पंड्यांचा रोजरोज उपद्रव, यामुळें प्रकृतींत वारंवार चढउतार होत असे.

बिंदू कधीं कधीं शरतला बोलावणें पाठवी, पण त्याची परीक्षा नजीक येत चालल्यामुळे त्याचें येणें होत नसे. सुधा मात्र रोजरोज नवीन नवीन खाद्यद्रव्यें तयार करून आपल्या मोलकरणीच्या हातीं शरत्‌कडे पाठवी. शरत् वारंवार नको नको ह्मणून परत निरोप पाठवी; पण सुधेचा क्रम चालू होताच.

अशा स्थितींत कांहीं दिवस जातां जातां दुर्गापूजेचे दिवस येऊन ठेपले. देवीबाबूच्या घरीं मोठा उत्सव सुरू झाला. देवीबाबूच्या स्त्रीच्या छातींतलें दुखणें कमी झालेंसें दिसूं लागलें. कारण ती रात्रींच्यारात्रीं जागत बसून उत्सवांतील गाणीं, कथा व नाटकें पहात बसूं लागली. शिवाय तिच्या निमं-

क्रमावरून तिच्या अनेक मैत्रिणीही रोज रात्रीं उत्सवाची मौज पाहण्यास येत असत. त्यांच्यांशीं गप्पा गोष्टी करण्यांत तिचा वेळ आनंदानें जाऊं लागला. बिंदूही एक दिवस आपल्या दोन्ही मुलांना व सुधेला बरोबर घेऊन मौज पाहण्यास गेली होती. सकाळीं घरीं येतांच ती आपल्या पतीस ह्मणाली, " राधिकेच्या मानभंजनाचा प्रयोग फार चांगला होतो, आपण एकवेळ तो पाहून यावेंच. "

हेम०—मानभंजनाचा प्रकार मी लहानपणापासूनच तुजपासून शिकलों आहें, आणखी नाटकांत काय पहावयाचें आहे ?

आपल्या पतीच्या मुखावर हात ठेऊन बिंदु ह्मणाली, " असलें खोटें नाटें कांहीं बोलूं नका, पाप लागेल. "

विजया दशमीच्या दिवशीं तिसरा प्रहरपासून सर्व कलकत्ता शहर आनंदोत्सवांत अगदीं निमग्न झालें. शहरांतील मोठमोठे रस्ते, नदीतीरावरील घाट मनुष्यांनीं अगदीं फुलून गेले होते. दुर्गादेवीच्या विसर्जनानिमित्त हा सर्व जनसंघ एकत्र जमला होता.

विसर्जनसमारंभ आटोपल्यानंतर सर्वजण आपआपल्या घरीं गेले, व वडील माणसांना सत्कारपूर्वक प्रणाम करून त्यांनीं त्यांचे प्रेमाशीर्वाद ग्रहण केले. जगांतून शत्रुभाव आज नष्ट झाला असें वाटूं लागलें. दया, दाक्षिण्य, क्षमा व वात्सल्य ह्या विकारांचा आज अगदीं पूर लोटला.

दीडप्रहर रात्रीच्या सुमारास बिंदूचें जेवण आटोपलें. हेमचंद्र, सुधा व मुलें यांना झोंप लागली होती. आपलें सर्व कामधाम आटोपून बिंदु निजावयास जाण्याच्या तयारींत होती; इतक्यांत बाहेरच्या दारावर कोणी थाप मारिली.

इतक्या अपरात्रीं कोण बरें आलें असाव, अशा विचारांत बिंदू आहे तोंच दारावर दुसरी थाप पडली.

दरवाज्यांत कोण आहे ? असा बिंदूनें प्रश्न केला; पण त्याचें कांहींएक उत्तर न येतां आणखी एक थाप मात्र ऐकूं आली.

आपल्या पतीस जाऊन जागें करावें असा एक विचार बिंदूच्या मनांत

वाटे, पण आज यांना फार श्रम झाले आहेत; सबब त्यांची झोपमोड करूं नये असा दुसरा विचार मनांत घेतांच दैवावर हवाला ठेवून तिनें दरवाजा उघडला. दरवाज्याशीं असलेला मनुष्य प्रथमारंभीं तिला ओळखतां आला नाहीं पण लगेचच तो शरत् चंद्र असें तिनें ओळखलें.

शरत् चंद्राचें मुख अगदीं निस्तेज दिसत होतें, डोळे खोल गेले होते व शरीर कृश झालें होतें. यामुळें बिंदूनें त्यास प्रथम ओळखिलें नाहीं. नंतर बिंदु शरत् चंद्रास बरोबर घेऊन घरांत गेली.

शरत्—बिंदुताई, फार दिवसांत आलों नाहीं ह्मणून मजवर रागाऊं नकोस. आज विजयादशमी ह्मणून मुद्दाम तुला नमस्कार करून तुझा अशीर्वाद घेण्याकरितां आलों.

बिंदु—तुला उदंड आयुष्य असो, व लवकर लग्न होऊन संसार करूं लाग. भावाला याहून दुसरा कोणता आशीर्वाद द्यावयाचा ?

बिंदूनें दिलेला प्रेमाचा आशीर्वाद ऐकून शरतचंद्राच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले व कांहींएक उत्तर न देतां त्यानें तिच्या पायांवर मस्तक ठेविलें. बिंदूनें त्याचा हात धरून त्याला उठविलें आणि नंतर त्यास ह्मणाली, "तुझ्या न येण्याचें कारण मला माहीत असल्यामुळें त्याबद्दल माझ्या मनांत कांहीं नाहीं. शिवाय आमच्या अडीअडचणीच्या प्रसंगीं तूं धांवत येशील अशीही आमची खात्री आहे. पण हे पहा, अशीं हाडाचीं काडें करून अभ्यास करणे चांगलें नाहीं. तूं चांगला समजूतदार मुलगा आहेस, तुला सांगण्याची आवश्यकता नाहीं. पण प्रेमामुळे सांगितल्याशिवाय राहवत नाहीं."

शरत्०— परीक्षा पास होणें ह्मणजे आयुष्याची इतिकर्तव्यता कीं काय ? हेमबाबूंच्या कोठें पुष्कळ परीक्षा झाल्या आहेत ? पण त्यांच्यासारखे सुखी लोक जगांत कितीसे बरें सांपडतील ?

बिंदु— मग परीक्षेकरितां इतकी दगदग कां ?

शरत्०— परीक्षेबद्दल तिळमात्र काळजी करीत नाहीं.

बिंदु— मग दुसरी कसली काळजी ?

शरत्नें कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यानें बिंदूला खालीं बसविलें आणि आपण तिच्याशेजारीं मान खालीं घालून रडत बसला.

बिंदु— तूं असा रडतोस कां ? तुला कांहीं होतें आहे कीं काय ? असलें तर मला सांग; मजपाशीं कांहीं एक छपवून ठेवूं नकोस. मी तुला कोणी परकी आहे का ?

शरत्०— ज्या दिवशीं मी तुला परकी समजेन त्या॰ दिवशीं जगांतला माझा अवतार संपला असें समज. माझें दुःख मी तुजपाशीं छपवून ठेवीत नाहीं. पण मजसारखा हतभागी व पापिष्ट कोणी नसेल.

बिंदूनें पाहिलें तों शरच्चंद्राचें शरीर थरथर कांपतें आहे, नेत्र आरक्त झाले आहेत व तोंडावर उद्विग्नपणाची छाया दिसते आहे, असें पाहून ती थोड्या गंभीर स्वरानें ह्मणाली, "तुझ्या मनांतलें दुःख संकोच न करितां मला सांग."

शरत्०— बिंदुताई, मला तूं कांहीं एक विचारूं नकोस. मी अति नीच चांडाळ आहें. माझ्या मनांतली गोष्ट बोलून दाखविण्यास मला फार शरम व संकोच वाटतो आहे.

बिंदु— शरत, लहानपणापासून मी तुला भाऊ समजतें आहें आणि तूंही मला ताई ह्मणून हांक मारतोस; मग वडील बहिणीजवळ भावाला जें कांहीं बोलतां येण्यासारखें असेल तें सर्व संकोच न धरतां सांग.

शरत्०— माझ्या मनांत जो हेतु आला आहे त्याचा उच्चार तुजपुढें माझ्यानें करवत नाहीं. मी महापातकी आहें.

बिंदु— (रागानें) तर मग त्या गोष्टीचा उच्चार मजसमोर करूं नकोस तूं आपला यावेळीं मुकाट्यानें जा कसा.

बिंदूचें रागाचें भाषण ऐकून शरतचंद्र लहान मुलाप्रमाणें ओक्साबोक्शीं रडूं लागला. बिंदूला याचा कांहीं उलगडा होईना. ' ज्याचें आजपर्यंत निष्कलंक आचरण, व जो माझ्या तोंडचे रागाचे दोन शब्द निघतांच मुलाप्रमाणें रडूं लागला, त्याच्या मनांत पापवासना संभवेल तरी कशी ? ' वगैरे विचार मनाशीं करून बिंदूनें प्रेमानें त्याचा हात धरला आणि आपल्या पदरानें त्याचे डोळे पुशीत पुशीत ती त्याला ह्मणाली, " शरत, मला न कळविण्यासारखी गोष्ट तुझ्या मनांत येणें शक्य नाहीं. तुझ्या मनांत जें काय बोलावयाचें असेल संकोच न करतां मला सांग, मी ऐकण्यास तयार आहे. "

शरत्०— तुझ्या ह्या दयेबद्दल ईश्वर तुझें कल्याण करो. पण बिंदुताई.

मी जी तुजजवळ याचना करणार आहें, ती जर कदाचित् सफळ झाली नाहीं तर त्याचा उच्चार कोणाजवळही करणार नाहीं असें मला प्रथम वचन दे, ह्मणजे सर्व कांहीं सांगतों.

बिंदु— बरें, कबूल.

शरत्चंद्र थोडावेळ विचारांत निमग्न झाला, आणि नंतर आपलें मस्तक बिंदूच्या पायांवर ठेवून ह्मणाला, " पुण्यहृदया विधवा सुधेशीं माझा विवाह करून दे. " हें वाक्य शरत्च्या तोंडून निघतांच गेल्या सहा महिन्यांत घडलेल्या सर्व गोष्टी बिंदूच्या ध्यानांत आल्या व तिच्या मनांत एकदम प्रकाश पडला.

नंतर शरत् पुन्हां बोलूं लागला, " बिंदुताई, मी महापापी आहें. सहा महिन्यांपूर्वी तालपुष्करास सुधा दृष्टीस पडली, तेव्हांपासून माझें चित्त चंचल झालें. अभ्यासाशिवाय अन्य व्यवसाय मला माहित नव्हता. पुस्तकी प्रणयाशिवाय अन्य प्रणयाची मला माहिती नव्हती. पण ज्या दिवशीं ती सरलप्राणा, गतधवा सुधा माझ्या दृष्टीस पडली तेव्हांपासून अननुभूत अशा प्रेमाच्या लाटा माझ्या चित्तांत उसळूं लागल्या. माझ्या मनांत शिरलेला विचार हळूं हळूं नाहींसा होईल अशी आशा करीत होतों पण उत्तरोत्तर तो विचार वाढतच चालला. बिंदुताई, तूं सरळ अंतःकरणानें मला आपल्या घरीं येऊं देत असस, हेमबाबू मजवर वडील भावाप्रमाणें प्रेम करीत, आणि माझ्या मनांत मात्र असले पापी विचार ! ह्या पातकाची परमेश्वर मला क्षमा करील काय ? सुधेची तब्येत बरी झाल्यावर, आह्मी दोघेजण एकत्र बसून गप्पा गोष्टी करीत असतांना माझ्या मनांत काय काय विचारतरंग येत असत ते तुला काय सांगूं ? माझा विवाह होऊन सुधा माझ्या संसारराज्याची स्वामिणी होईल व माझें जीवित अमृतमय होईल वगैरे सुखस्वप्नांत मी सदा निमग्न राहूं लागलों. अभ्यासाकडे माझें लक्ष्य बिलकुल लागेना. पुस्तक हातीं घेतलें कीं ती आनंदमय मूर्ति माझ्या हृदयांत उभी राहून माझें अंतःकरण आपल्याकडे ओढून घेई. अशा एक कीं दोन ह्मणून किती गोष्टी तुला सांगूं ! बिंदुताई, मी आपल्या मनांतले सर्व विचार स्पष्टपणें तुला सांगितले ह्मणून तूं मजवर रागावूं नकोस. मी पापी तर खराच, पण तूं जर मजवर कोप करूं लागलीस तर मजवर प्रेम करणारें कोण उरलें ? "

बिंदूनें शरत्चें सर्व भाषण ऐकून घेतलें. त्यावर ती काय उत्तर देणार ! शरत्चें भाषण अगदीं वेड्यासारखें होतें, पण तसें ह्मणून जर त्याचा निषेध केला तो कदाचित जीव देखील द्यायचा. हा विचार मनांत आणून ती त्याला शांतपणानें ह्मणाली, " शरत् मनाशीं असें दुःख करून आत्मनिंदा करूं नकोस. ल्हानपणापासून मला तुझी माहिती आहे, मी तुजवर कधीं तरी रागावेन का ? पण विधवाविवाहाची चाल आपल्या समाजांत चालू नसल्यामुळें असा विवाह होणें शक्य आहे कीं नाहीं, यासंबंधानें घरांतून चौकशी करवून मग काय तें ठरवितां येईल. तूं मात्र मनाशीं असें दुःख करून घेऊं नकोस. ह्या गोष्टी-संबंधानें घरांतलें मत कांहीं जरी असलें तरी माझें तुजवरचें प्रेम कधींही नाहींसें होणार नाहीं हें पक्कें ध्यानांत बाळग. "

शरत्०—तुझ्या तोंडांत साखर पडो. माझ्या ह्या कृत्याबद्दल तूं आज माझा धिःकार केला नाहींस हे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं.

बिंदु—मला वाटतें आज रात्रीं तुझें भोजन झालें नसावें, थोडें खातोस का ? मी पान वाढतें.

शरत्०—नको, आज माझी अन्नावर वासना नाहीं.

बिंदु—तर मग उद्यां सकाळीं एक वेळ येऊन या गोष्टीसंबंधानें घरां-तला विचार घे.

शरत्०—या गोष्टीसंबंधानें तूंच त्यांच्याजवळ गोष्ट काढ, आणि त्यांचें मत काय आहे तें मला कळीव. त्यांचें मत कळण्यापूर्वी त्यांना तोंड दाखविण्या-ची मला शरम वाटते आहे.

बिंदु—उद्यां नाहीं आलास तरी चालेल. पण मधून मधून तरी येत जा.

शरत्—या गोष्टीचा सोक्षमोक्ष कळल्याशिवाय मी तुझेला तोंड दाखवि-णार नाहीं. तसेंच हें बघ. बिंदुताई, या गोष्टीसंबंधानें तुझेंच्या मनावर कांहीं एक जुलमं उपयोगी नाहीं. माझी इच्छा जर पूर्ण झाली नाहीं तर जन्मांत मी एकटाच हतभागी राहीन. मजकरितां दुसऱ्यावर आणखी तो प्रसंग नको.

बिंदु—तर मग या संबंधाचा घरांतला विचार मी तुला पत्रानें कळवीन.

शरत्०—पत्र नको. मीच स्वतः येऊन तुला विचारून जाईन. केव्हां येऊं सांग! माझ्या दैवीं सुख आहे कीं नाहीं हें मला केव्हां कळेल?

बिंदु—ह्या गोष्टीचा निर्णय एक दोन दिवसांत कळावयाचा नाहीं. त्या संबंधीं बरीच वाटाघाट झाली पाहिजे. तेव्हां काय तें ठरेल. तर तूं १५।२० दिवसांनीं ये.

शरत्—बरें तर, आजपासून सोळाव्या दिवशीं मी येईन.

विंश परिच्छेद.

स्त्रीपुरुषसमाजांतील वाच्यता.

शरतचंद्र घराबाहेर पडला तोंच देवीबाबूच्या घरची एक मोलकरीण देवीच्या प्रसादाचें एक ताट घेऊन घरांत शिरली, आणि ह्मणाली, " आमच्या बाईसाहेबांनीं आपल्याकरितां हा प्रसाद पाठविला आहे. मला बरेच ठिकाणीं प्रसाद पोंचवावयास जावयाचें असल्यामुळें येथें येण्यास रात्र झाली. "

बिंदु— ताट ठेवून दे, मी उद्यां मोलकरणीच्या हातीं पाठवीन.

तिनें ताट खालीं ठेविलें, आणि तोंड फिरवून व गालावर एक बोट ठेवून ती फिदी फिदी हांसूं लागली.

बिंदु—कां ? हसतेस कां अशी ? रात्रीं कांहीं खेळ बीळ झाला कीं काय ? ह्मणून त्याची आठवण होऊन हंसते आहेस ?

मोल०—खेळ नव्हे तर काय ? मोठ्यांच्या घरीं झालें ह्मणजे सर्व चालतें. आमच्यासारख्या गरिबाच्या घरीं असें कांहीं झालें कीं आकाशपाताळ एक करतील.

बिंदु—काय झालें ? सांग तर खरी.

मोल०—हा आतां गेला हा कोण मुलगा होता ?

हा प्रश्न ऐकून बिंदु थोडीशी घाबरली. इतका वेळ बाहेरचा दरवाजा उघडा होता तेव्हां हिनें बाहेरून आपलें भाषण ऐकलें कीं काय अशी धास्ती पडून ती ह्मणाली, " शरतबाबू गेला त्याला तूं ओळखलें नाहींस वाटतें ? "

मोल०—शरत्बाबूला ओळखलें, पण इतक्या रात्रीं येथें त्याचें काय

काम होतें? माझा सारा जन्म शहरांत गेला पण असली रीत कोठें पाहिली नाहीं, मग तुमच्या खेडेगांवची काय चाल असेल ती असो. पण मला काय करावयाचें आहे चौकशी करून.

मोलकरणीची ती प्रश्न विचारण्याची तऱ्हा व बोलण्याचा हावभाव पाहून बिंदूला अतिशय संताप आला, पण आपल्या रागावण्यानें गोष्ट अधिकच विकोपास जाईल असें जाणून तिनें आपला क्रोध आवरला आणि ती ह्मणाली. "शरत्‌चें अद्याप लग्न झालें नाहीं, घरीं एकटें बसून व अभ्यास करून करून तो अगदीं भ्रमिष्टासारखा झाला आहे, काय करतो काय नाहीं त्याचा कांहीं विचारच राहिला नाहीं."

मोल०—असा भ्रमिष्ट झाला आहे, तर लग्न कां करीत नाहीं?

बिंदु—त्यानें एक मुलगी पसंत केली आहे, पण ती गोष्ट घरांत त्याला कोणाला सांगतां येत नाहीं ह्मणून मजकडे आला होता.

मोल०—कोणती मुलगी पसंत केली आहे?

बिंदु—अद्याप निश्चित झाली नाहीं, निश्चित झाली ह्मणजे सर्व कळेल.

मोल०—आतां कशाला अशी छपवाछपवी करतां? सुधा, सुधा, करून तो कायसेंसें ह्मणत होता तें मीं एकलें नाहीं कीं काय?

मोलकरणीनें सुधेचें नांव घेतलेलें ऐकतांच बिंदु अतिशय घाबरली, पण आपला मनोविकार बाहेर न दाखवितां तिनें आपल्या पेटींतून एक रुपया बाहेर काढला आणि तिला देऊन ती ह्मणाली, तूं आमच्या येथें नेहमीं येतेस ह्मणून तुला आज मी हा रुपया इनाम दिला आहे. ह्याचें तुला काय पाहिजे तें विकत घे; आणि शरत् जें कांहीं वेड्या वेड्या सारखें बरळत होता तें कोणाजवळ बोलूं नकोस. मला वाटतें आज त्यानें कांहीं भांगबींग घेतली असावी ह्मणून तो कांहीं तरी बडबडत होता. त्या भ्रमिष्टाचें बोलणें काय मनावर घ्यायचें आहे?

हातावर ठेवलेला रुपया पाहून मोलकरणीचें मन फिरलें (आणि कोणाचें नाहीं फिरणार?) आणि ती ह्मणाली, " शरत्‌बाबूचें हें बोलणें भांगेंतल्या तारेंतलेंच असावें. तें काय मनावर घ्यायचें आहे? तुह्मी अगदीं बेफिकीर असा; मी कोणाजवळही त्याचा उच्चार करणार नाहीं. "

ती मोलकरीण संतुष्टमनानें घराच्या बाहेर पडली. पण तारेची बातमी एका क्षणांत जशी पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाला जाऊन पोंचते त्याचप्रमाणें बिंदूच्या घरीं घडलेली गोष्ट त्या रात्रीच्या रात्रीं सर्व शहरभर झाली.

दुसऱ्या दिवशीं देवी प्रसन्नबाबूच्या गृहिणीच्या कानीं ही गोष्ट येतांच ती रागाचा मोठा आविर्भाव आणून ह्मणाली, "असें होणार नाहीं तर काय होणार? हल्लीं कुलीन, अकुलीन हा विचारच उरला नाहीं. जवळपासच्या खेडेगांवांतून येथें आले कीं सर्वच कुलीन कायस्थ बनतात. कायस्थांच्या चालीरीतीची बिलकुल माहिती नसली तरी हरकत नाहीं. ती ब्रया मजकडे आली त्या दिवशींच येथें कांहीं तरी काळें बेरें असावें असा मला वहीम आला. पण आमच्या घरच्या माणसांना माणसांची पारखच नाहीं त्याला काय करणार ? राम, राम, राम ! काय हा अनाचार ! मुसलमानांत देखील विधवांचा निका लागत नाहीं.

एक दासी— त्या कसल्या आल्या आहेत कायस्थ ! कायस्थांच्या विधवा अशा वागतील का ? ती पोरगी एकादशीच्या दिवशीं खाते, पिते, अंगाला तेल लावते, सर्व कांहीं करते. तिला कसलाच विधिनिषेध नाहीं.

यजमानीण— धिःकार असो असल्या मुलीला आणि तिच्या आईला ! असली कार्टी जन्मास येतांच विहिरींत लोटून दिली पाहिजे होती. विधवा झाली तरी लज्जा कशी ती नाहीं, शरत्‌बरोबर राजरोसपणें गच्चीवर जाऊन चकाट्या पिटीत बसते, नानाप्रकारचीं पक्वान्नें तयार करून त्याजकडे पाठविते ह्याला ह्मणावें तरी काय ? काय हा बेशरमपणा ! ह्यांत शरत्‌चा काय दोष आहे ? ह्या दोघी बहिणी त्याला अशा भुरळ पाडूं लागल्या तर तो बिचारा काय करणार ? हर ! हर !

ह्याप्रमाणें यजमानीणबाई व त्यांच्या दासी यांचें भाषण वाढतां वाढतां सप्तमापर्यंत पोंचलें. बिंदूची आई, बाप व बेचाळीस पूर्वजांचा उद्धार झाला. पण रागाच्या भाषणानें यजमानीणबाईंच्या छातीचें दुखणें अनावर झालें. डाक्तरी उपाय झाले, वैद्यकी उपाय झाले; पण छातींतली कळ कांहीं थांबेना.

[illegible] हेमबाबू आणि त्यांतून [illegible] संवाद त्यांच्या कानीं पडला,

एक दासी— कायग, घरांत कसली गडबड चालली आहे ?

दु० दासी— तुला नाहींच का कांहीं कळलें, मग, एवढा वेळ ऐकलेंस काय ?

प० दासी— मला सांग तर खरी.

दु० दासी— हेमचंद्र ह्मणून कोणीएक गृहस्थ येथें आला आहे, त्याची स्त्री व मेव्हणी एक दिवस येथें आल्या होत्या. ती मेव्हणी विधवा आहे, आणि तिचाच विवाह शरत्चंद्राशीं होणार ह्मणे.

ति० दासी—चल जा, वेडी कोठली ! विधवेचा विवाह होतो का कधीं ?

दु० दासी—अग, न व्हायला काय झालें, विद्यासागर ह्मणून कोणी एक महापंडित आहे त्याचें ह्मणणें आहे कीं विधवांचा विवाह करण्यास कांहीं हरकत नाहीं.

च० दासी—तूं तरी मोठी विनोदी दिसतेस. विधवा जरी ह्मातारी असली तरी देखील तिचा विवाह करावयाचा का ?

दु० दासी— इच्छा असली तर काय हरकत आहे ?

ति० दासी— बरें पण हेमबाबूंच्या मेव्हणीचें वय तरी काय आहे ?

दु० दासी— असेल १३, १४ वर्षांचें, ती दिसण्यांत फार सुंदर असून हंसत, हंसत शरत्बाबूशीं भाषण करते, त्याजकडे नानाप्रकारचीं पक्वान्नें तयार करून पाठविते. मग तो कसा बरें भुलणार नाहीं ? किती झालें तरी पुरुषांचें मन तें !

च० दासी— तर मग तिचा आणि शरत्बाबूंचा फार दिवसांचा परिचय आहे कीं काय ?

दु० दासी— अशी त्यांच्या गांवीं बोलवा आहे. मग तेथें काय झाले असेल कोणास ठाऊक ! पण येथें आल्यापासून जो कांहीं प्रकार चालला आहे तो साऱ्या भवानीपुराला माहीत आहे. शरत्बाबूनें त्या मुलीला कित्येक दिवस आपल्या घरींच ठेऊन घेतलें होतें. तिची बहीण आणि हेमबाबू हीं तेथेंच राहत होतीं. तेथें राहणें हेमबाबूला बरें न वाटून त्यानें निराळें बिऱ्हाड केलें. तों ही

राधिका विरहवेदनेनें अचेतन होऊन पडली, व तिला ज्वर भरला. मग काय, तिची विरहव्यथा दूर करण्याकरितां तिचा कृष्ण परमात्मा त्या ठिकाणीं उपस्थित झाला. अशा एक कीं दोन, अनेक गोष्टी आहेत. तूं "राधाविनोद" कधीं ऐकला आहेस का ? अगदीं तशांतला प्रकार. अलीकडची पोरें मोठीं रंगेल झालीं आहेत. तूं संभाळ बरें.

च० दासी— चल, चावट कोठली.

अशा प्रकारचें संभाषण चाललें आहे तों एक वृद्ध दासी तेथें येऊन ह्मणाली, "तुमचीं भांडणें कसलीं चाललीं आहेत ?

एक दासी— भांडणें कसलीं ? शरत्‌बाबूचें लग्न ठरलें आहे त्याबद्दल आमचें बोलणें चाललें आहे. मोठ्यांनीं कांहीं केलें तरी चालतें, पण गरिबांनीं मात्र भिऊन वागलें पाहिजे.

वृ० दासी— ही काय कुलीनाची चाल ? ही मुसलमानाची चाल.

प० दासी— पण हेमबाबूनें ह्याला कशी आपली अनुमति दिली !

वृ० दासी— त्याला आपली अनुमति देण्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं.

वृ० दासी— ती गोष्ट मी तुह्माला सांगतें, पण ती बाहेर फोडूं मात्र नका. 'हेमबाबूची मेव्हणी ह्मणे गर्भार आहे.'

झालें, ही गुप्त बातमी कालीवाटापर्यंत पोंचली. कालीतारेच्या सास्वांना आज कडकडीत एकादशी, त्यांत त्यांना ही बातमी कळली, मग काय विचारतां, त्यांनीं अगदीं आकाश पाताळ एक करून सोडलें. वडील सासू बिचारी सज्जन होती. ती ह्मणाली, "सांप्रत आचार धर्म कांहीं उरला नाहीं, ज्याला जें वाटेल तें तो करतो. करोत बिचारे वाटेल तें. करील तो भरील, आपणाला काय करावयाचें आहे त्याच्याशीं ?"

धाकटी सासू— काय करावयाचें आहे ह्मणून कसें चालणार ? आपल्या सुनेचा भाऊ पुनर्विवाह करणार ही किती शरमेची गोष्ट आहे ! अलिकडच्या लोकांना लाजलज्जा बिलकुल उरली नाहीं. असली ही नीच जातकुळीची कार्टी घरांत आणल्यानें आमच्या कुळाला मात्र बट्टा लागला.

मधली सासू रागानें अगदीं लाल झाली आणि कालीतारेला दहा पांच

शिव्या हांसडून ह्मणाली, “ आमच्या कुळाला डाग लावण्यास जगलीस तरी कशाला ? ह्यापेक्षां मेली असतीस तर दुनिया ओस नसती पडली. तुझी धिंड काढून तुला घरांतून हाकून देईना तर मी कायस्थाची मुलगीच नव्हे. ” इ० इ०

कालीतारेला रडतां भुई थोडी झाली. संध्याकाळचे वेळीं तिनें बिंदूला पुढील चिट्टी पाठविली.

“ प्रियभगिनी बिंदुताई,

सुधा व शरत् यांच्या संबंधानें माझ्या कानावर आलेल्या गोष्टींत कांहीं तथ्य आहे का ? असेल तर, माझी हात जोडून विनंति आहे कीं; शक्य त्या उपायांनीं ही गोष्ट तूं मोडून काढ. शरत् जर बहकला असेल तर त्याला आपल्या घरीं येण्याचें बंद कर. माझ्या कानावर आलेली गोष्ट जर घडून आली तर सासरीं मला तोंड दाखवायाला जागा उरणार नाहीं व तुझ्याही दृष्टीस मी पुन्हां पडणार नाहीं. ”

ही बातमी बिंदूच्या चुलतीच्या कानीं गेली तेव्हां तिनें बिंदूकडे पुढील निरोप पाठविला, “ तुला आणि सुधेला मीं आजपर्यंत पोटच्या पोराप्रमाणें वागविलें, तर हें लक्ष्यांत आणून माझ्या ह्मातारपणीं मला दुःख देऊन मल्लिक-वंशाला अक्षयीचा कलंक लावूं नकोस. तूं शहाणी आहेस, समजूतदार आहेस, तुला ह्या सर्व गोष्टी कळत असतीलच पण माझें कर्तव्य मला केलें पाहिजे. ” इ० इ०

बिंदूला मरणप्राय दुःख झालें. मोलकरणीचें तोंड बंद करण्याकरितां आपण जो मार्ग पतकरला तोच आपल्या दुःखास कारण झाला असें तिला कळून आलें. तिनें कपाळावर हात मारिला आणि ती स्वस्थ बसली.

हेमचंद्राला पत्नीकडून सर्व हकीकत कळून आल्यावर त्याला फार वाईट वाटलें. शरतचंद्रावरची त्याची श्रद्धा किंवा प्रेम बिलकूल कमी झालें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचा हेतुही त्याला अयोग्य वाटला नाहीं. पण स्वतः तो शांत स्वभावाचा असल्यामुळें समाजमताविरुद्ध काम करून समाजाच्या रोषाला पात्र होणें हें त्याला युक्ति व न्यायसंमत वाटलें नाहीं. या संबंधानें

सर्वांचा विचार घेऊन काय करणें तें ठरवावयाचें असा त्यानें मनाशीं विचार केला.

सुदैवानें सल्लामसलतगार मंडळीची त्याला वाण पडली नाहीं. अनेक शास्त्री पंडीत व इतर लोक आपण होऊन त्याजकडे येऊन आपापल्या सल्ला-मसलती त्यास देऊं लागले. भवानीपुरांत आपले इतके स्नेही असतील असें हेमचंद्राला कधींही वाटलें नाहीं.

प्रथमतः जनार्दनबाबू, गोवर्धनबाबू, हरिहरबाबू, वगैरे वृद्धसमाजपति त्याजकडे आले आणि त्यांनीं प्रथम इकडच्या तिकडच्या गोष्टी काढून नंतर शरत्चंद्राची गोष्ट काढली.

जनार्दनबाब— अलीकडची कालेजांतील सर्वच मुलें अशीं. त्यांना रीत-रीवाज कांहीं नाहीं. जुने आचार विचार पसंत नाहींत आणि मनसोक्त वर्तन करायला पाहिजे. पण हेमबाबू, तुह्मी तशांतले नाहीं, लोकाचाराविरुद्ध वर्तन तुमच्या हातून कधींही घडावयाचें नाहीं; अशी आमची पूर्ण खात्री आहे. ह्मणून ह्या कामांत तुह्मांला कांहीं सल्लामसलत देणें वृथा आहे.

गोवर्धनबाबू— जनार्दनबाबूंचें ह्मणणें रास्त आहे तरी पण समयविशेषीं दोन हिताच्या गोष्टी सांगणें हें आमचें कर्तव्य आहे. शरत्चंद्र अगदींच बहकला आहे, त्याला आमचें सांगणें रुचावयाचें नाहीं. ह्मणून मी ह्मणतों कीं त्याचें चार दि वस थोरामोठ्यांच्या घरीं जाणें बंद करा. असें झालें ह्मणजे फारशी वाच्यता व्हायची नाहीं आणि सर्व ठीक होईल.

हरिहरबाबू— तेंही खरेंच. थोडे दिवसांपूर्वी येथें एक अशीच गोष्ट झाली होती. पण त्या घरचा मालक शहाणा, त्यानें त्या गोष्टीचा मागमुसही ठिकाणावर राहूं दिला नाहीं. झालें, थोड्याच दिवसांत लोकांना त्याचा विसर पडला. आतां कोणाला त्याची आठवण तरी आहे का ?

जना०— तें खरें आहे. कोणकोणाची उठाठेव करीत बसतो ? सांप्रत जो तो आपल्या कामांत निमग्न. गांवांतल्या चारचौघां वृद्ध माणसांची सल्ला-मसलत घेतल्याशिवाय कोणतीही गोष्ट करावयाची नाहीं अशी पूर्वीची चाल होती. कां ? गोवर्धनबाबू, मी ह्मणतों तें खरें का खोटें ?

गोवर्धन— अगदीं खरें. आणि हल्लींही जे खरे शिष्ट आणि संभावित

आहेत ते आपलें मत घेतल्याशिवाय कोणतीच गोष्ट करीत नाहींत. शिवाय तां ह्या घोषांच्या विधवाभावजईसंबंधाचा असाच कांहीं लोकप्रवाद उठला होता, त्यावेळीं घोषबाबू आमच्याकडे आला आणि ह्मणाला, " गोवर्धनबाबू, आतां उपाय काय ? " तेव्हां मी ह्मणालों, " ज्याअर्थी तुह्मी आमचेकडे आला आहां त्याअर्थी अगदीं निश्चिंत असा. आह्मी तुह्माला योग्य उपाय सांगून त्यांतून पार पाडूं. " नंतर आह्मीं विचार करून घोषबाबूला सांगितलें कीं, तूं आपल्या भावजईला काशीस पाठवून दे. त्यानें त्याप्रमाणे केलें, तों त्याच्या मागचा त्रास मिटला. अलीकडचीं पोरें व पोरी सर्व स्वेच्छाचारी बनलीं आहेत. त्याला आपण काय करणार ? तुह्मी मेव्हणीला काशीस पाठवून द्या. मग तेथें वाटेल तशी वागली तर कोण पहावयास जातो आहे ?

वरील भाषण हेमचंद्राच्यानें ऐकवेना. त्याचा कंठ भरून आला, आणि तो कंपितस्वरानें ह्मणाला, " महाराज, आपण काय ह्मणतां तें मला समजलें नाहीं. शरत्‌नें समाजरीतीविरुद्ध जें काय करण्याचें मनांत आणलें आहे तें मला सर्वस्वीं मान्य आहे असें नाहीं; त्याचा विचार पुढें करतां येईल. पण शरत्‌चंद्र व माझी मेव्हणी ह्यांच्या हातून कांहीं अयोग्य कृत्य घडलें आहे असा जर आपला ग्रह झाला असेल तर तो चुकीचा आहे, एवढें मात्र निःसंशय ध्यानांत असूं द्या. त्यांच्या आचरणांत दोष कधींही सांपडावयाचा नाहीं. "

हरिहर— त्यांच्या हातून कांहीं गैरवर्तन घडलें, असा आमच्या ह्मणण्याचा हेतु नाहीं. पण आलेला लोकप्रवाद टाळण्याला हा एक मार्ग आहे. सर्व गोष्टींत सरळ मार्गानें जाणें हा उत्तम पक्ष, आणि सरळ मार्ग हाच धर्म.

जनार्दन— बरोबर आहे. " यतो धर्मस्ततो जयः " असें शास्त्रांतही सांगितलें आहे. हरिहरबाबूंनीं जो मार्ग सुचविला तो सरळ मार्ग, ह्यांत संशय नाहीं. तेव्हां तुह्मी तो मार्ग पतकरावा हें श्रेयस्कर आहे. तुह्मी अद्याप अज्ञान आहां, अल्पवयस्क विधवा घरांत असूं देणें चांगलें का ? कोणत्या वेळीं काय प्रसंग येईल याचा कांहीं नेम आहे का ?

गोवर्धन— तें कांहीं खोटें नाहीं, शास्त्रांत सांगितलें आहे कीं, सहस्राक्ष इंद्र देखील स्त्रियांचें गुप्त आचरण पहावयास समर्थ होत नाहीं; 'मग तुमच्या आमच्या काय पाड ?

हरिहर— आज कदाचित् ही गोष्ट गुप्त राहील, पण पुढें मागें दैवक्र-मानें—आणि दैवक्रमापुढें कोणाची धांव आहे ? —जर तरुणवयस्क विधवेला एखादें पोर झालें तर ती गोष्ट गुप्त राखण्याला कांहीं मार्ग आहे का ? म्हणून मी म्हणतों कीं, सध्यांच तिला काशीस पाठवून देणें हाच उत्तम मार्ग.

अशा प्रकारचा भारदस्त व शहाणपणाचा सल्ला देऊन ते वयोवृद्ध पंडित निघून गेले. हेमचंद्राचा राग अनिवार झाल्यामुळें त्यानें त्यांना कांहीं एक उत्तर दिलें नाहीं.

त्यानंतर रामलाल, शामलाल, यदुलाल वगैरे नवीन विचाराची मंडळी आली.

रामलाल— आज कानावर आलेली गोष्ट बहुतेक मिथ्या आहे हें ऐकून फार आनंद झाला. पण सर्वांनाच तसें कसे वाटणार ? आपण सद्गोदित जरी नसणार, शरत्चंद्र पडला थोडा अभिमानी व हट्टी, व स्त्रीचरित्र दुर्विज्ञेय. तेव्हां अपवादासंबंधानें समाजाच्या मनांत शंका येणें स्वाभाविक आहे. आपली ह्या विवाहाला अनुमति नाहीं ही त्यांतल्या त्यांत एक चांगली गोष्ट आहे.

श्यामलाल—आणखी असें पहा हें कार्य प्रकृतसमाजसंमत नाहीं. ज्या योगानें दिवसदिवस आपली ऐक्यवृद्धि व सामाजिक उन्नति होईल त्याच गोष्टी आपणांला केल्या पाहिजेत. जुन्या काळच्या लोकांप्रमाणें आमचा कांहीं 'प्रेजुडिस' नाहीं, पण ह्या गोष्टीनें आपल्या समाजांत दुही व तंटे मात्र माजतील, ह्यानें आपलें ऐक्यसाधन होणार नाहीं, ह्मणून ही गोष्ट निंद्य होय.

यदुलाल— शिवाय एका इंग्लिश तत्वज्ञान्यानें असें ह्मटलें आहे कीं; लोक संख्येची वाढ जितकी लवकर होते तितकी खाद्य द्रव्याची होत नाहीं. आणि याच कारणाकरितां सुधारलेल्या देशांत पुष्कळ स्त्री पुरुष अविवाहित राह-तात. आपल्या देशांत ती चाल प्रचारांत येणें शक्य नाहीं; ह्मणून विधवांना तरी अविवाहित ठेवणें अवश्य आहे.

रामलाल—यदुबाबूचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. आणि आमच्या काना-वर आलेला अपवाद जर सत्य असेल तर त्या कृत्याला उत्तेजन देण्यानें आपली उन्नति होण्याचें दूरच राहिलें पण अवनति मात्र होईल.

अशा प्रकारचें पांडित्य करून ही दुसरी मंडळी निघून गेली.

यानंतर जुन्या मताचे पूर्ण अभिमानी असे दोन गृहस्थ एका महामहोपाध्यायास बरोबर घेऊन हेमचंद्राचे घरीं आले. हे महामहोपाध्याय हिंदुधर्माचे आधारस्तंभच होते. वेद, वेदांत, श्रुति, स्मृति, न्याय, दर्शन, पुराण, इतिहास, व्याकरण, मीमांसा वगैरे सर्व विद्या त्यांना अवगत होत्या. ह्या महापंडितांनीं आपल्या अजस्र वाक्प्रवाहानें हेमचंद्रास सचैल स्नान घातलें. हेमचंद्र बिचारा निरुत्तर होऊन स्वस्थ बसला. महामहोपाध्यायांचा प्रथम वाक्स्रोत थांबल्यावर थोड्या वेळानें हेमचंद्र ह्मणाला, " शास्त्रीमहाशय, माझ्या अल्पशा ज्ञानावरून मला असें वाटतें कीं; विधवाविवाहासंबंधानें आपल्या शास्त्रांतही भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न मतें होतीं. वैदिक काळीं विधवाविवाह रूढ होता; मनु वगैरेंच्या काळींही ती चाल सर्वांशीं अग्राह्य नव्हती, पण पुढें पुढें मात्र झाली. पुढें पौराणिक काळीं ती चाल सर्वांशीं निषिद्ध ठरली. शास्त्रचर्चा करण्याचा माझा अधिकार नाहीं, पण जें काय माझ्या वाचनांत आलें आहे तेंच मीं सांगितलें. पंडिताग्रगण्य ईश्वरचंद्र विद्यासागर यांचेंही ह्मणणें आहे कीं; विधवाविवाह शास्त्रसंमत आहे. "

हेमचंद्राच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले मात्र, तों शास्त्रीमहाशय अतिशय संतापले आणि रागाच्या आवेशांतच ते पुन्हां बोलूं लागले, " विधवाविवाह प्रचारांत आणणारे तेच ना विद्यासागर ? वाः, केवढे पंडित ! " वर्णपरिचयासारखे प्रचंड ग्रंथ लिहून पंडित बनून देशांत नवीन चाल पाडून देशाचा सत्यानास करणारे, स्वधर्मविद्वेषी, म्लेंच्छांचें अनुकरण करणारे, आर्यधर्मशून्य, आर्याभिमानशून्य, आर्यवंशाचे कुलांगार,—(इतकें बोलतां बोलतां त्यांना दम्याची ढास आली आणि त्यांचें भाषण बंद झालें. नंतर थोड्या वेळानें आपल्या बरोबर आलेल्या गृहस्थास उद्देशून ह्मणाले.) आतां ह्या ठिकाणीं क्षणभरही उभें राहणें चांगलें नाहीं. जें आमच्या कानीं आलें तें सर्व खरें यांत संशय नाहीं. त्या पोरीनें जर गर्भपात वगैरे केला तर तुह्मी पोलिसांत वर्दी द्या.

शास्त्रीमहाशयांचें अखेरचें भाषण ऐकून हेमचंद्र रागावला नाहीं, पण त्यांचा तो आवेश व बोलण्याचा तो हावभाव पाहून त्याला हसूं मात्र आलें.

धनंजयबाबूच्या बागेंतल्या बंगल्यांतही ही बातमी गेली. तेथल्या सभासदांनींही ह्या गोष्टीसंबंधानेंही आपली नापसंतीच दर्शविली.

संध्याकाळीं हेमचंद्र आपल्या गृहिणीस ह्मणाला, " विधवाविवाहासंबंधानें सर्वांचें मत प्रतिकूळ असल्यामुळें माझेंही तसेंच झालें आहे.

बिंदु—त्याशिवाय हें कार्य केल्यानें आपला केवढा दुर्लौकिक होईल, व लोक आपली किती निंदा करतील.

हेम०—त्याची मोठीशी भीति नाहीं. समाजानें आमच्यावर वृथा आरोप करून आमच्या नांवाचा जो डांगोरा पिटविला आहे त्याहून अधिक दुर्लौकिक होण्याचा संभव नाहीं. विधवाविवाह हा खरा अधर्म नव्हे,—आमचे हितैषी लोक आमच्यावर मोठा अनुग्रह करून शरत् व सुधा यांच्या वर्तनासंबंधानें ज्या अधर्मसूचक कंड्या पिकवीत आहेत, सांप्रत तेंच अधर्माचरण जर गुप्त राखिलें तरच समाजाच्या मतें धर्मरक्षण होईल.

एकविंश परिच्छेद.

दिवाळी.

हिंदुस्थानांत दिवाळी ह्मणजे फार मोठा सण. आश्वीनवद्य अमावास्येच्या रात्रीं हिंदुस्थानच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत, ज्या ज्या स्थळीं हिंदुलोकांची वस्ती आहे त्या त्या स्थळीं दिपवाळीचा मोठा थाट असतो. श्रीमंत काय, गरीब काय, जो तो आपआपल्या ऐपतीप्रमाणें दिव्यांची आरास करतो.

रात्रीचे दहा वाजून गेल्यावर शरतचंद्र बिंदूची गांठ घेण्याकरितां ह्मणून हेमचंद्राच्या घरीं गेला. पण दरवाज्यांत स्वतः हेमचंद्रच त्याची वाट पहात उभा होता. शरतचंद्र येतांच हेमचंद्रानें त्याचा हात धरून त्याला आपल्या बैठकखान्यांत नेलें. शरतचंद्र मनांत भीत भीत त्याच्याबरोबर गेला व मान खालीं घालून बिछायतीवर स्तब्ध असला. त्याच्या तोंडांतून शब्द निघेना.

हेम०—शरत्, तूं जी गोष्ट घरांत तिजजवळ सांगितलीस ती मला समजली.

शरत्—(कांपत कांपत) त्यांत जर मजकडून दोष घडला असेल तर मला क्षमा करा.

हेम०—दोष मुळींच नाहीं, तूं आपल्या चरित्रास साजेल असेंच कृत्य केलें आहेस. सर्व जगानें जरी तुझी निंदा केली तरी तुझ्याबद्दल माझें मन काडीमात्र बदलणार नाहीं.

शरत्चंद्राच्या तोंडांतून शब्द निघेना, त्याच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनीं त्याच्या मनांतील कृतज्ञता व्यक्त केली. हेमचंद्राच्या तें ध्यानांत आलें.

हेम०—माझ्या स्त्रीचें लहानपणापासून तुजवर धाकट्या भावाप्रमाणें प्रेम आहे; तिलाही तुझें वर्तन गैर वाटलें नाहीं. आमचें उभयतांचें तुजवरचें प्रेम अक्षय कायम राहील.

शरत्—आपलें हें प्रेम मी यावज्जन्म विसरणार नाहीं.

थोडावेळ दोघेही स्तब्ध राहिले, नंतर मन थोडें स्थिर करून शरत् ह्मणाला, " मी विचारलेल्या गोष्टीसंबंधानें आपला काय निश्चय ठरला ? " एवढा प्रश्न विचारून शरत् उत्तराची वाट पहात उभा राहिला.

हेम०—सर्व साधक बाधक गोष्टींचा पूर्ण विचार करूनच तूं ह्या गोष्टीचा प्रस्ताव केला आहेस ना ?

शरत्०—माझ्या अल्पशा समजुतीप्रमाणें मीं पूर्ण विचार करूनच केला आहे.

हेम०—शरत्, तूं शिकला सवरला आहेस; पण अद्याप लहान आहेस, ह्मणून एक गोष्ट तुझ्या कानावर घालून ठेवतों. हा विवाह केला तर लोकनिंदा फार सोसावी लागेल हें ध्यानांत ठेव.

शरत्— वाटेल तितकी निंदा सोसण्यास तयार आहें. जर हें कृत्य अयोग्य नसेल तर लोकापवादभीतीनें स्वसुखावर पाणी सोडण्यास कोण तयार होईल ?

हेम०—लोक तुला वाळींत टाकतील.

शरत्—तेवढ्यानें जर त्यांचें समाधान होत असेल तर खुशाल टाकोत, मला त्यांची पर्वा नाहीं.

हेम०—तुझ्या पवित्र कुलाला कलंक लागेल.

शरत्—कलंक कसला? विधवाविवाह केला हाच कीं नाहीं? जे निंदा करतील त्यांच्या मताची मला जरूर नाही. पण खुद्द आपणाला जर हें कृत्य निंद्य वाटत असेल तर मला तसें सांगा, ह्मणजे तो विचार लागलीच सोडून देतों.

हेम०—माझ्या मतें पूर्वीच्या शास्त्रानुमतें विधवाविवाह हा शास्त्रविरुद्ध नाहीं, पण हल्लीं रूढिविरुद्ध आहे.

शरत्— तीस वर्षांपूर्वी समुद्रप्रवासही निषिद्धच मानला जात असे, पण सांप्रत हजारों यात्रेकरी जहाजांतून जगन्नाथाच्या यात्रेस जातात त्यांना कोणी नांवें ठेवीत नाहींत. हळूं हळूं आचार विचारांत फरक होत जाणें हें प्रगतीचें लक्षण आहे.

हेम०— शरत्, मी तुला एक गोष्ट विशेष स्पष्टपणें सांगतों; ती ध्यानांत असूं दे. हें बघ, हृदयाची वृत्ति नेहेमीं सारखी रहात नाहीं, आज ज्याबद्दल आपणाला विशेष प्रेम वाटत असतें तें प्रेम कालांतरानें कमी होतें अगर पूर्णपणें नष्ट होतें. आज तुझें जें सुधेवर प्रेम आहे तें नेहेमीं असेंच राहील असें तुला वाटतें का? थांब जरा, आणि माझें बोलणें पुरतें ऐकून घे. लोकांनीं तुह्मांला वाळींत टाकल्यावर तुमचे कोणी कोही सोबती तुमच्या घरीं भोजनास येणार नाहींत, तुमच्या मुलाबाळांचीं लग्नें होणार नाहींत, तुह्मांला कोणी आपल्या घरीं येऊं देणार नाहीं. अशी स्थिति झाली ह्मणजे कृतकर्माचा पश्चात्ताप करण्याची वेळ येईल. शरत, ज्या गोष्टीचा परिणाम असा होणार ती गोष्ट जाणून बुजून कां बरें करावी? सुधेप्रमाणें रूपवती व गुणवती बालिका सांप्रत अनेक आहेत. तुझ्याप्रमाणें गुणवान्, बुद्धिमान् जांवई मिळाला तर त्यांचे आईबाप आपणांला कृतार्थ समजतील. तसा विवाह केल्यानें जरी तुला आज सुख झालें नाहीं तरी पुढें होईल. ह्मणून माझें सांगणें एवढेंच आहे कीं, केवळ विकारवश होऊन अविचारानें कोणतीही गोष्ट करणें चांगलें नव्हे.

शरत्— माझ्या बोलण्यावर विश्वास असूं द्या. मी केवळ विकारवश

होऊन ह्या कार्यास प्रवृत्त झालों नाहीं. आपण जे विचार मला कळविले ते माझ्या मनांत पूर्वीच आले होते, त्यासंबंधानें मीं पूर्ण विचार केला आहे. विधवाविवाह करणें हें जर आपणाला निंद्य कृत्य वाटत असेल तर गोष्ट निराळी. पण तसें जर नसेल तर मला ह्यासंबंधानें पश्चात्ताप करण्याचा प्रसंग खास येणार नाहीं. लोकांनीं जरी आमची कितीही निंदा केली तरी समाज-सुधारणेच्या कामीं आपण अग्रेसरत्व पतकरलें एवढें समाधान बस्स आहे. अशा लोकांची समाजानें आज जरी निंदा केली, नालस्ती केली; तरी कालांतरानें त्यांचा गौरव करील. अशाच रीतीनें एकेक सुधारणा प्रचारांत येणार. हेमबाबू, पुढें पश्चात्ताप होईल असें कृत्य मी करीत नाहीं. स्वतःला व अभागिनी सुधेला चिरकाल सुखी करण्याकरितांच हें कृत्य मी करणार.

हेमचंद्र शरतूचे दोन्ही हात आपल्या हातांत धरून हांसत हांसत ह्मणाला. " शरत्, तूं पूर्ण विचार करून ह्या कार्यास प्रवृत्त झाला आहेस कीं नाहीं ? हें पहाण्याकरतांच मीं तुझा एवढा अंत पाहिला. आतां घरांत जा आणि ह्या विवाहास माझी पूर्ण संमति आहे हें तुला तिजकडून कळेल. सुधा सुखी होणार ह्या कृत्यास माझी संमति कशी नसेल ? "

शरतूचें हृदय भग्न आलें, त्याच्या तोंडांतून शब्द निघेना, त्याच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. नंतर कृतज्ञतासूचक मुद्रेनें हेमचंद्राचे दोन्ही हात आपल्या मस्तकावर ठेवून तो घरांत गेला.

घरांतल्या निजावयाच्या खोलींत बिंदु एका चटईवर बसली होती. शरत्चंद्रानें तिच्याजवळ जाऊन तिचे पाय घट्ट धरले, आणि सद्गदित कंठानें तो तिला ह्मणाला, " बिंदुताई, तूं मला जीवदान दिलेंस त्या उपकाराची फेड मी कशी करणार ? "

बिंदु—हें काय ? ज्याचे पाय धरले पाहिजेत त्याचे धर, माझे कां उगीच्या उगीच.

शरत्—बिंदुताई, तूं हेमबाबूची संमति मिळविलीस; हे तुझे उपकार मी जन्मोजन्मीं बिसरणार नाहीं.

बिंदु—संमति न देऊन करणार काय ? वर आणि वधू राजी असल्यावर आह्मी मना करणारे कोण ?

शरत्—बिंदुताई, थट्टा पुरे कर. तुझी ह्या कृत्याला पूर्ण संमति आहे, असें मला स्पष्ट सांग; ह्मणजे माझ्या मनाची हुरहुर नाहींशी होईल. सुधा अजून पोर आहे तिची संमति असंमति कसली ?

बिंदु—ती आतां लहान नाहीं हो, तिला सर्व कळूं लागलें आहे. ती चोरून " विषवृक्ष वाचते. "

शरत्—बिंदुताई, थट्टा पुरे कर, आणि तुझें मत मला स्पष्ट कळूं दे. तुझा विचार घेऊन या संबंधाचा कायमचा निश्चय ठरविण्याकरितां मी मुद्दाम येथें आलों तों त्याचें कांहींच झालें नाहीं.

बिंदु—आतां निश्चय काय ठरवावयाचा आहे ? फक्त उपाध्यास बोलावून आणून तिथिनिश्चय करण्याचें राहिलें आहे. मग आणूं का बोलावून? का तूंच स्वतः उपाध्यापुरोहिताचें काम करणार ? माझी कांहीं जरूर आहे कीं ; सुधाच सर्व कामें करणार ; काय तें मला कळूं दे. का मी सुधेला हाक मारूं ? (सुधेला उद्देशून) सुधे, एकवेळ इकडे ये पाहूं. शरतबाबू तुला बोलावताहेत.

शरत् निराश होऊन उठला; बिंदूही लागलीच उठली. नंतर शरत् बिंदूचे दोन्ही हात धरून ह्मणाला, " बिंदुताई, तुझें मजवरचें प्रेम हेंच का ? तुझी ह्या कार्याला पूर्ण अनुमति आहे असें हेमबाबूंनीं मला सांगितलेंच आहे. तीच गोष्ट तूं स्वतः आपल्या तोंडानें सांगून मला तृप्त कर आणि तुझा आशीर्वाद मला दे. "

बिंदु— माझ्या अभागिनी भगिनीला सुखांत पडलेली पहाणें मला नको का वाटेल ? माझी ह्या कृत्याला पूर्ण संमति आहे, इतका वेळ मीं तुझ्याशीं विनोद केला. ईश्वर तुह्मांला शतायुषी करून तुमच्या इच्छा पूर्ण करो.

शरत्—(साश्रुनयनांनीं) तुझ्या ह्या मजवरच्या निःसीम प्रेमाबद्दल ईश्वर तुझें कल्याण करील. बिंदुताई, लोकनिंदेची भीति बाळगूं नकोस; विधवाविवाह शास्त्रविरुद्ध नाहीं असें मोठमोठ्या पंडितांचें मत आहे.

बिंदु—मला शास्त्र बिस्त्र कांहीं कळत नाहीं. पण माझ्या अल्प समजुतीला असें वाटतें कीं, सुधेसारख्या अज्ञान पोरीला जन्मभर दुःख भोगीत ठेवावें असा शास्त्राचा व ईश्वराचाही हेतु नसावा.

शरत्चंद्र मोठ्या कृतज्ञतापूर्वक विंदूचा निरोप घेऊन बाहेर जाण्यास निघाला तों माजघरांत त्याच्या दृष्टीस सुधा पडली. तिला पाहतांच त्याच्या मनांत अनेक विचारतरंग आले. ही लावण्यमयी, प्रेमहृदया आपली होईल का? हिच्या संगतींत आपले दिवस सुखांत जातील का? इत्यादि विचारांनीं त्याच्या मनांत अगदीं काहूर उठविलें. त्यानें तिच्याशीं दोन शब्द बोलण्याचा बेत केला पण तो निष्फल झाला. कारण, शरत्चंद्र दृष्टीस पडतांच सुधा लज्जित होऊन घरांत पळून गेली.

आनंद व उद्वेगपूर्ण अंतःकरणानें शरत् घरीं गेला. घरीं जातांच त्याच्या नोकरानें त्याच्या हातीं एक पत्र दिलें.

पत्र घेऊन शरत् आपल्या बसावयाच्या खोलींत गेला, आणि पाहूं लागला तों तें पत्र आपल्या आईकडून आलेलें. पत्रांत पुढील मजकूर होता.

" चिरंजीव विजयीभव शरत् यांस—

अनेक आशीर्वाद वि० ईश्वर तुझे मनोरथ पूर्ण करून तुला सदां सुखी ठेवो अशी रात्रंदिवस मी त्या दयामय प्रभूची प्रार्थना करीत असतें.

बाळ शरत्, आज एक तुझ्यासंबंधानें वाईट गोष्ट कानावर आली, ती ऐकून फार वाईट वाटलें. तूं शहाणा मुलगा आहेस, तुझी आईवर खरी प्रीति आहे, यामुळें माझ्या कानावर आलेल्या गोष्टींत तथ्य नसावें अशी माझ्या मनाला खात्री वाटते आहे.

लोक म्हणतात कीं, तूं सुधेशीं विवाह करणार आहेस. असलें शास्त्रविरुद्ध कृत्य करून आपल्या वडिलांच्या व कुलाच्या नांवाला कलंक लावूं नकोस. तूं ऐकण्यासारखा मुलगा आहेस म्हणून तुला सांगावयाचें.

मी आजपर्यंत अनेक कष्ट भोगले. कालीची काय अवस्था आहे हें तुला माहीत आहे. माझी सर्व भिस्त काय ती तुझ्यावर, तुझ्याकडे पाहून मी आपले दिवस कंठतें आहे. तर मला म्हातारपणीं दुःख देऊं नकोस. माझें आयुष्य आतां कितीसें उरलें आहे!

परमेश्वर तुला उदंड आयुष्य देवो; व पुण्यकर्माकडे तुझी मति वळो; हा माझा तुला आशीर्वाद आहे."

शरतनें एकवेळ, दोनवेळ, तीनवेळ तें पत्र वाचलें. त्याचे हात व सर्वांग कांपूं लागलें. त्याच्या हातांतून पत्र गळून पडलें व तो मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला.

द्वाविंश परिच्छेद.

आई व पुत्र

त्या रात्रा शरतला किती म ' ' झाली त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. निराशा व लज्जा यानी त्याचें अंतःकरण अगदीं व्याकुल केलें. आपण आपल्या बंधूचा (हेमचंद्राचा) सर्व नाश केला हा विचार त्याच्या मनांत शल्या सारखा टोंचूं लागला.

आज सहा महिने जो हेतु आपण मनाशीं बाळगला तो एकदम सोडून द्यावयाचा का ? आपल्या ह्या कृत्यानें आपलें सर्व आयुष्य व मोठमोठे विचार व्यर्थ जाणार हें उघड आहे. तथापि आईची आज्ञा पालन करण्याकरितां आपण तेंही करण्यास तयार होऊं, पण आपल्यामुळें हेमचंद्राच्या नांवाला केवढा कलंक लागेल ! लोकांमध्यें त्याची केवढी नाचक्की होईल ! हा विचार मनांत येतांच त्याच्या मनाची चलबिचल झाली. अखेरीस त्याच्या मनाचा पक्का निश्चय ठरला आणि तो आपल्या मनाशीं ह्मणाला, " आई, तुझ्या आज्ञेविरुद्ध मी वर्तन करीत आहें ह्याची क्षमा कर. "

बिचारी सुधा जिला आजपर्यंत प्रणय ह्मणजे काय, ह्याची माहिती देखील नव्हती, तिला त्याची माहिती करून देऊन तिच्या मनांत सुखाशेचा अंकुर उत्पन्न केला. ज्याप्रमाणे अरुणप्रकाश निस्तब्ध व शांत जगावर हळू हळू पसरत जातो; त्याप्रमाणें ह्या नव्या आशेचा अंकुर तिच्या मनांत पसरल्यामुळें ती लज्जावती विधवा बालिका तृषार्त चातकाप्रमाणें प्रणयजलाची अपेक्षा करीत बसली आहे. तिला फसवून तिचें जिणें कष्टतर करावयाचें कीं काय ? अशा प्रकारच्या विचारांनीं त्याची चित्तवृत्ति अगदीं क्षुब्ध झाली आणि जमीनीवर तो पडून लहान मुलाप्रमाणें रडूं लागला.

थोड्या वेळानें शरत् उठून खिडकीजवळ उभा राहिला. शरत्काळच्या थंड वायु त्याच्या शरीराला लागल्यामुळें त्याचें मस्तक थोडें शांत झालें. समस्त जगत् या वेळीं निद्रामग्न होतें, आकाश व पृथ्वी अंधकारानें व्याप्त

झाली होती. आकाशांतून असंख्य तारका ह्या पापपूर्ण व शोकपूर्ण मेदिनी-कडे स्तब्ध दृष्टीनें अवलोकन करीत होत्या.

एकदोन दिवसांत मी तिकडे निघून येतें, असें आईनें पत्रांत लिहिलें होतें. आई आल्यावर तिला जर सर्व समजून सांगितलें तर तिची समजून पटून ती ह्या कामाला आपला रुकार देईल का ? छे, ती आशाच नको. शरत्‌ला आपल्या आईचा स्वभाव पक्का माहीत होता; ह्यामुळें तिची अनुमति मिळ-ण्याची त्याला मुळींच आशा नव्हती, आणि यदाकदाचित् वरकांती अनुमति मिळाली तरी माझ्या ह्या वर्तनाबद्दल ती झुरून झुरून मरेल यांत संशय नाहीं.

असे विचार करीत करीत शरत्‌चंद्रानें ती सारी रात्र तळमळत काढली. पहांटेच्या थंड वाऱ्यानें त्याचे मस्तक थोडें शांत झालें, आणि त्याला झोंप लागली. आपण किती वेळ निजलों हें त्याला समजलें नाहीं, पण कोणी तरी आपला कोमल हस्त आपल्या मस्तकावरून फिरवितें आहे असा त्याला भास झाला. त्यानें डोळे उघडून पाहिलें तो आपली आई मोठ्या लडिवाळ-पणानें आपल्या मस्तकावरून हात फिरवीत बसली आहे असें त्याला दिसलें. शरत्‌नें डोळे उघडले असें पाहतांच त्याची आई ह्मणाली, " बाळ शरत, तुझी तब्येत बरीच बिघडली आहे. आणि तोंडही सुकलें आहे. तूं असा भुई-वर कां पडला आहेस ? चल उठ, अंथरुणावर निज कसा. "

शरत्०— आई, माझी झोंप झाली, आतां निजत नाहीं. तूं केव्हां आलीस ? केव्हां येणार तें मला कां नाहीं कळविलेंस ? तुला वाटेनें त्रास बिस तर झाला नाहीं ना ?

आई— मुळींच झाला नाहीं. मजबरोबर आपले गुरुमहाराज आले आहेत त्यांनीं सर्व व्यवस्था केली. मला मुळींच त्रास झाला नाहीं.

शरत्०— आई, मी जाणून बुजून अपराध करून तुझ्या मनाला दुःख दिलें आहे. त्याची मला क्षमा कर. आई, तुझें पत्र वाचल्यावर मी आपला बेत फिरविला. तर तूं मला सर्व अपराधांची क्षमा कर.

मातेच्या नेत्रांतून झरझर अश्रु वाहूं लागले. आणि ती सद्गदित- कंठानें

ह्मणाली, " बाळा, तूं माझें सांगणें ऐकलेंस हें पाहून मला फार आनंद झाला. ईश्वर तुझें कल्याण करो. "

आईचे दोन्ही हात आपल्या मस्तकावर ठेवून शरत्चंद्र अश्रु ढाळूं लागला. आईनें आपल्या पदरानें त्याचे अश्रु पुसले. शरत्चंद्राचें मन शांत झालें.

\+ + + + + +

कालीतारेच्या नवऱ्याची प्रकृति दिवसेंदिवस जास्त बिघडत चालली हें ऐकून शरत्चंद्र कांहीं दिवस आपल्या भगिनीच्याच घरीं जाऊन राहिला. हेमचंद्रही रोज सकाळीं जाऊन दोन प्रहरपर्यंत तेथें बसत असे. हेमचंद्राला पाहून शरतचंद्राला लाजल्यासारखें होई. ती त्याच्या मनाची स्थिति जाणून हेमचंद्र शरत्चंद्रास एकांतीं ह्मणाला, " तूं आमच्या घरीं जाणें बंद करीनास कसें? ह्या कृत्याला तुझ्या आईची अनुमति नाहीं ह्मणून तूं माघार घेतो आहेस यांत वाईट तें काय आहे? आईच्या मताविरुद्ध जर तूं हा विवाह करण्यास प्रवृत्त झाला असतास तर मला आवडलें नसतें. आपण जर निंद्य कृत्य केलें नाहीं तर लोकांच्या निंदेला भिण्याचें कारण काय? " हेमचंद्राच्या भाषणावर शरत्चंद्रानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्याचे नेत्र भरून आले आणि तो सद्गदित कंठानें ह्मणाला, " आजपर्यंत मी आपल्याला केवळ वडील भाऊ समजत होतों, पण आजपासून आपल्याला देव समजून आपली पूजा करीत राहीन. "

हेमचंद्र व शरत् यांनीं रोग्याची अतिशय शुश्रूषा केली. पैशाकडे न पाहतां कलकत्त्यांतील सर्वोत्कृष्ट डाक्तराचें औषध व चिकित्सा सुरु केली. पण त्याचा कांहींएक उपयोग न होतां एक आठवडा अतिशय यातना भोगून रोग्यानें आपलें मानवचरित आटपलें.

पतीच्या काळजीनें कालीचें शरीर अगदीं क्षीण झालें होतें. पतिनिधनवार्ता समजतांच तिनें एकदम हंबरडा फोडला, आणि बेशुद्ध होऊन ती जमिनीवर पडली. शरत्चंद्रानें तिच्या डोळ्यांस पाणी लावून व वारा घालून तिला सावध केलें. सावध होतांच धांवत धांवत ती पतीच्या खोलींत गेली,

आणि आपल्या मृतपतीच्या चरणावर मस्तक ठेऊन आक्रोश करूं लागली. पतिप्रणयाची ओळख तिला आजवर नव्हती ती आतां झाली आणि ती कपाळ आपटून ओक्साबोक्शीं रडूं लागली. अशा स्थितींत कांहीं वेळ लोटल्यावर ती पुन्हां मूर्च्छित पडली. मूर्च्छित पडतांच, शरत्‌चंद्रानें तिला उचलून शेजारच्या घरांत नेऊन ठेविलें.

पुढें थोड्याच दिवसांनीं कालीतारेच्या सासरची सर्व मंडळी परत वर्धमानास गेली. कालीतारा मात्र आपल्या भावाच्या घरीं, राहिली. भावाच्या व आईच्या सहवासांत तिच्या दुःखाचा किंचित् विरंगुळा पडला. कालीचें वय २० वर्षांहून अधिक नव्हतें, पण तिचे डोळे खोल गेले होते, शरीर अगदीं कृश झालें होतें, व दुःखानें व काळजीनें झुरून गेल्यामुळें ती एखाद्या ६० वर्षांच्या म्हातारीप्रमाणें दिसूं लागली होती.

मोठें घरंदाज घराणें पाहून कालीचा विवाह केला होता. पण उत्कृष्ट कुल असलें म्हणजे नेहमीं सुख मिळतेंच असें नाहीं.

\+ \+ \+ \+ \+ \+ \+

इकडे उमेची आई आल्यापासून उमेची प्रकृति जास्त जास्तच बेताल होत चालली. तिचा खोकला अतिशय वाढला. वैद्यांचीही निराशा होत चालली. गेला तो दिवस पार पडला, उद्यां काय होईल याचा निश्चय करतां येईना. उमेच्या अजारांत बिंदु वारंवार तिजकडे जात असे. उमेची तब्येत जेव्हां फारच बिघडली तेव्हां एक दिवस बिंदु कालीतारेस बरोबर घेऊन उमेच्या समाचारास गेली.

आपल्या दोघी मैत्रिणींना पाहून उमेला गहिंवर आला व तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. तिच्या तोंडांतून शब्द निघेना. तिनें आपल्या मैत्रिणींचे हात धरिले आणि ती रडूं लागली.

संध्याकाळच्या सुमारास उमेची तब्येत फारच बिघडली. वैद्याचाही धीर सुटला. वैद्यानें एक नवीन औषध दिलें आणि सांगितलें कीं; "रात्रभर प्रत्येक दोन दोन तासांनीं हें औषध द्या. सकाळीं मी पुन्हां येईन."

बिंदु व काली तारा रोग्याची शुश्रुषा करण्याकरितां जागत बसल्या. रात्रीं नवाच्या सुमारास बिंदुनें एकवेळ औषध दिलें. त्यावर उमा अति क्षीण स्वरानें ह्मणाली, आतां कशाला औषध? मी चाललें. मरावयाचे वेळीं तुह्मी माझ्याजवळ आहां हें माझें मोठें भाग्य आहे. बिंदुताई, काली, माझी आठवण असूं द्या.

बिंदु व काली यांना गहिंवर आला आणि त्या रडूं लागल्या. सुमार अर्धा तास गेल्यावर उमेनें " आई, आई, " ह्मणून हांक मारिली. तिची आई जवळच निजली होती ती उठून उमेच्या जवळ गेली. उमेनें आईच्या गळ्याला घट्ट मिठी मारिली. तिनें बोलण्याचा प्रयत्न केला पण तोंडांतून शब्द निघेना. थोड्याच वेळांत तिचा श्वासोच्छ्वास बंद झाला व शरीर गार पडलें.

त्रयोविंश परिच्छेद.

परीक्षा.

शरत्‌ची परीक्षा नजीक आल्यामुळें तो अभ्यासांत अगदीं निमग्न झाला. रात्रंदिवस अभ्यासाशिवाय त्याला दुसरें कांहीं सुचेनासें झालें. अशी स्थिति पाहून एक दिवस त्याची आई त्यास ह्मणाली, " इतका अभ्यास करून प्रकृति का बिघडून घ्यायची आहे ? आपल्याला कांहीं परीक्षेची जरूर नाहीं. चल, आपण आपल्या गांवीं जाऊं, तेथेंच राहून आपला जमीन जुमला पहा आणि सुखानें रहा. कलकत्याची हवा तुला मुळींच मानवत नाहीं. "

शरत्— आई, ह्या वयांत जर शिकण्याची हयगय केली तर चांगलें नाहीं. परीक्षा अगदीं जवळ आली आहे, एकवेळ प्रयत्न करून पाहतों.

कालीतारेनें शरत्‌करितां वर्धमानास एक मुलगी पाहून ठेविली होती. तिचा हेतु हा होता कीं, शरत्‌चें लग्न झालें ह्मणजे त्याची तब्येत सुधारेल. तिनें एक दिवस शरत्‌जवळ लग्नाची गोष्ट काढली, त्यावर तो जरा रागाच्या स्वरानें ह्मणाला, " ताई, अभ्यासाच्या वेळीं मला कां बरें उगीच त्रास देतेस ? " कालीतारा बिचारी गप्प बसली.

बिंदूची चुलती ह्मणजे उमातारेची आई बिंदूच्या घरींच होती, ती अद्याप तालपुष्करास परत गेली नव्हती. ती वारंवार शरत्च्या आईकडे येई व आपः त्यांत सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसे. एक दिवस ती शरत्च्या आईस ह्मणाली " लोकांचें न ऐकतां जर आह्मी आपल्याच विचारानें वागलों असतों तर हा प्रसंग न येता. मोठ्या घरीं मुलगी पडावी हीच इच्छा आमच्या घाताचें कारण झाली. अम्मा. ईश्वराची इच्छा! आतां आमचें झालें तें झालें, तुह्मी मात्र शरत्चें असें करूं नका. त्यांच्याकरितां एक चांगली सद्गुणी मुलगी पाहून त्याचा संसार थाटून द्या, ह्मणजे झालें. "

शरत्ची आई– आमची तरी तीच इच्छा आहे. पण रात्रंदिवस अभ्यासानें त्यानें शरीराचें कसें मातेरें केलें आहे तें पाहिलें ना? मला वाटतें एकदां लग्न झालें ह्मणजे त्याची तब्येत सुधारेल. पण सध्यां लग्न करण्याचा त्याचा विचारच नाहीं. त्याला काय करणार?

इतक्यांत कालीतारा तेथें आली. तिला उद्देशून उमेची आई ह्मणाली, "काली, तुझ्या भावाची तब्येत अशी कशानें झाली आहे? तूं त्याच्या खाण्यापिण्याची नीट व्यवस्था ठेवीत जा!

काली—मी सर्व व्यवस्था ठेवते. पण त्याचें तिकडे लक्ष्यच नाहीं. सदा तो आपला अभ्यासांत निमग्न असतो.

उमेची आई—तूं त्याच्या लग्नाची गोष्ट कधीं काढली होतीस कां?

काली—हो, एकदां सोडून दहादां काढली.

उ० आई—मग त्यावर तो काय ह्मणाला?

काली—तो तिकडे लक्षच देत नाहीं. आणि फारच आग्रह केला तर ह्मणतो, माझी लग्न करण्याची इच्छाच नाहीं. तुझें लग्न करावें अशी आईची फार इच्छा आहे असं सांगितलें तर तो ह्मणतो, आईच्या अग्राहाकरितां मी लग्न करीन; पण त्यापासून मला सुख होणार नाहीं.

उ० आई—सर्व मुलें असेंच ह्मणतात, पण एकदां लग्न झालें ह्मणजे ताळ्यावर येतात. मला वाटतें, त्याचें लवकर लग्न करून द्यावें. हेंच उत्तम.

शरत्ची आई—मला नाहीं तसें वाटत. शरत मजजवळून कोणतीही गोष्ट छपवून ठेवणार नाहीं अशी माझी खात्री आहे. त्याच्या मर्जीविरुद्ध जर

मुलाचा विवाह केला तर चांगलें होणार नाहीं. माझें कपाळ तर फुटलेंच आहे, कालीवरही ईश्वराचा कोप झाला, (रडूं लागते) आतां आमचा सर्व भार काय तो शरत्‌वर. तेव्हां कोणत्याही रीतीनें त्याला दुःख होऊं नये ही माझी इच्छा आहे.'

उ० आई—सध्यां लग्न करण्याची त्याची इच्छा नसेल तर राहिलें, लग्न पुढें करतां येईल. सध्यां शिकण्याची हौस आहे, ती तरी पुरी होऊं द्यावी.

श० आई—केवळ अभ्यासाच्याच काळजीनें त्याची अशी स्थिति झाली असावीसें मला वाटत नाहीं. मग काय असेल तें असो.

इतकें बोलणें झाल्यावर उमेची आई निघून गेली. त्यानंतर कालीतारा आईस ह्मणाली, " आई, शरत्‌करतां मग आतां काय करावयाचें ? एखाद्या डाक्तराला तरी त्याची प्रकृति दाखवावी का ? "

आई—मनोव्याधीला डाक्तर काय करणार ? डाक्तरांना त्या रोगाची चिकित्सा नाहीं.

काली—तर मग काय करावयाचें ? मला वाटतें ह्या कामांत बिंदुताईचा तरी विचार घ्यावा.

आई—ह्या कामांत बिंदू आपला विचार सांगणार नाहीं.

काली—न सांगायला काय झालें ? मी एक दिवस बिंदुताईकडे जाईन.

शरत्‌चंद्राची परीक्षा आटोपली. शरत्‌चंद्र नाहींतर त्याच्या वर्गांतील विद्यार्थी कार्तिकचंद्र हा परिक्षेंत पहिला येणार असें त्याचे सहाध्यायी बोलूं लागले. पुढें एक महिन्यानें परीक्षेचा निकाल लागला. कार्तिकचंद्र पहिला आला, पण पास झालेल्या विद्यार्थ्यांत शरत्‌चंद्राचें नांव आलें नाहीं. सर्व विद्यार्थ्यांना मोठें आश्चर्य वाटलें.

त्यानंतर शरत्‌ची आई शरत्‌चंद्रास ह्मणाली, " इतके जिवापाड श्रम करूनही परीक्षा पास झाली नाहीं. आतां पुढें काय करणार ? "

शरत्—आई, एकवेळ हुकलें ह्मणून काय झालें ? आणखी एक वेळ प्रयत्न करून पहावा. परीक्षा फार अवघड असते, यामुळें पहिल्याच खेपेला फार थोडे पास होतात.

पुढें थोडे दिवसांनीं कालीतारा एक दिवस बिंदूची मसलत घेण्याकरितां

तिजकडे गेली, पण बिंदूनें कांहींएक मसलत सांगितली नाहीं. ती ह्मणाली, आईला सांग कीं; माझ्या काकूला विचारून तुह्मा दोघींना जें योग्य दिसेल तें करा. मला ह्यांत काय कळतें? आणि मी कसली मसलत सांगणार?"

कालीनें तें सर्व आपल्या आईस सांगितलें. त्यावर तिची आई ह्मणाली, "बरें, पण सुधा कशी काय आहे?"

काली— छान आहे. पण कलकत्त्यास आल्यापासून तिच्यांत फारच फरक झाला आहे, यामुळें मीं प्रथम तिला ओळखलें देखील नाहीं.

आईनें त्यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. सारा दिवस ती आपल्या मनाशींच विचार करूं लागली. एक दिवशीं रात्रीं निजावयास जाण्याचे वेळीं ती आपल्या मनाशीं ह्मणाली, "बाळ शरत्, तूं आपले पुत्राचें कर्तव्य बजावलें आहेस. मला आता मातेचें कर्तव्य बजावलें पाहिजे. परमेश्वर मला ह्या कामांत साह्य करो!

चतुर्विंश परिच्छेद.

गुरुमहाराजांची अनुमति.

दुसरे दिवशीं सकाळीं शरत्ची आई बरोबर एक मोलकरीण घेऊन गुरुमहाराजांच्या दर्शनाकरितां गेली. आश्रमासंनिध आल्यावर बरोबरच्या बाईस तिनें चौकशीकरितां आत पाठविलें आणि आपण तेथेंच उभी राहिली.

थोडा वेळ गेल्यावर ती बाई व एक वृद्ध ब्राह्मण हीं बाहेर आलीं. त्याचें वय काय असावें याची कल्पना करतां येत नव्हती. त्याच्या मस्तकावर पांढरे शुभ्र असे थोडे केंस होते. त्याचें शरीर गौरवर्ण असून त्याच्या चेहऱ्यावर वृद्धपणाचें लक्षण स्पष्ट दिसत होतें. हेच वयोवृद्ध तापसी तालपुष्कुरच्या घोष घराण्याचे कुलगुरु गुरुमहाराजांबरोबर एक तेजस्वी ब्रह्मचारी बाहेर आला. हे नुकतेंच काशीहून कलकत्त्यास आले होते.

गुरुम०—कां, आज कशाकरतां येणें केलें ? बाहेर कां उभ्या ? आश्रमांत चला.

शरत्‌ची आई गुरुमहाराजासह आंत गेली व जमिनीवर बसली.

श० आई—गुरुमहाराजांचें कुशल आहेना ?

गुरुम०—ईश्वराच्या कृपेनें सर्व कुशल आहे. तुमचें सर्व ठीक आहे ना ?

श० आई—परमेश्वरानें अद्याप जिवंत ठेविलें आहे इतकेंच; पण चित्तास स्वास्थ्य नाहीं. माझी मुलगी कालीतारा विधवा झाली हें महाराजांना कळलें असेलच. (रडूं लागते.)

गुरुम०—रडूं नका. ईश्वराच्या इच्छेनुरूप सर्व गोष्टी घडतात, त्या कोणाला टाळतां येतील का ?

श० आई—तें खरें. पण कालीच्या विवाहाच्यावेळीं गांवांतील सर्व पंडितांचें मत घेऊन मीं तें कार्य केलें. आपण त्यावेळीं निषेध केला पण तो न जुमानल्यामुळें मजवर हा प्रसंग आला; आपलें सांगणें ऐकलें असतें तर हा प्रसंग न येता, हा विचार रात्रंदिवस माझ्या काळजाला बोंचतो आहे.

गुरुम०—मनाला व्यर्थ खंती वाटूं देऊं नका. ह्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत. आपण मोठ्या विचारानें व शहाणपणानें ह्मणून एखादी गोष्ट करावी; पण ईश्वरी सूत्रानुरूप ती विपरीत होते.

श० आई०—पण योग्य विचार व मसलत घेऊन काम केल्यानें पुढें मग पश्चात्तापाला कारण रहात नाहीं. आणि ह्मणूनच मी एका कामांत आपला विचार घेण्याकरितां मुद्दाम येथें आलें आहे.

गुरुम०—माझा विचार कसला घेणार ? लौकिकी व्यवहाराचा मी त्याग केला आहे हें तुह्मांस माहीत आहेच. शास्त्रविषयासंबंधानेंही सल्ला मसलत देण्याचें मीं सांप्रत सोडलें आहे. माझ्यापेक्षां विद्वान् पंडित कलकत्त्यास व नवद्वीपास पुष्कळ आहेत. शास्त्रचर्चा हा त्यांचा नित्याचा व्यवहार असल्यामुळें त्यांची सल्ला मसलत अधिक श्रेयस्कर आहे. मी तो व्यवसाय सोडून देऊन पुष्कळ दिवस झाले आहेत. केवळ परलोकप्राप्तीस्तव मी ईश्वरपूजनांत निमग्न असतों. करमणुकीस्तव कधीं कधीं मी शास्त्रग्रंथ पाहतों पण फार क्वचित्.

श० आई— महाराज, केवळ एखाद्याच गोष्टीसंबंधानें कांहीं विचारावयाचें असतें तर मीं आपल्याला त्रास दिला नसता, पण आपण आमचे कुलगुरु. यास्तव, आमचा सर्व भार आपणांवर आहे. आपणांशिवाय आम्हांला दुसरा आधार कोणाचा आहे ?

गुरुम०—मजकडून होण्यासारखें असेल तें मी करीन. पण माझ्या अंगीं तितकी विद्या व पात्रता नाहीं.

श० आई—ज्यांना आपल्या ज्ञानाचा व विद्येचा अभिमान आहे त्यांचा सल्ला मला नको. आपली योग्यता काय आहे हें कोणास माहीत नाहीं असें नाहीं. आपला लौकिक मोठा असल्यामुळेंच काशी वगैरे ठिकाणांहूनही विद्यार्थी आपल्यीकडे अध्ययनार्थ येतात. महाराज, आपलें भाषण हेंच आमचें वेदवाक्य.

गुरुम०—हा तुमचा भ्रम आहे. माझें शास्त्रज्ञान फारच अल्प आहे. आपला शास्त्रसागर फारच अपार आहे, त्यांतून एक चुळकाभर तरी माझ्या वाट्यास आलें आहे कीं नाहीं कोणास ठाऊक. विद्यार्थ्यांशीं शास्त्रचर्चा करणें मला फार आवडतें; ह्मणून मी एक दोन विद्यार्थी जवळ बाळगतों इतकेंच. सांप्रत काशीहून हे ब्रह्मचारी येथें आले आहेत.

श०आई—मला तें कांहीं समजत नाहीं. कन्येवर कृपा करून एका कामांत आपला उपदेश द्यावा.

गुरुम०—काय विचारावयाचें असेल तें खुशाल विचारा.

श० आई—महाराज, माझ्या मुलाच्या मनांतून एका बालविधवेशीं विवाह करावयाचा आहे. त्यासंबंधानें आपला विचार, मसलत व आशीर्वाद घेण्याकरितां मी आलें आहें.

गुरुमहाराजांना शरतची आई व तिची हिंदुधर्मावरील पूर्ण निष्ठा लहानपणापासून माहीत होती, त्यामुळें तिच्या तोंडून निघालेले वरील उद्गार ऐकून त्यांनां मोठें आश्चर्य वाटून ते ह्मणाले, " विधवाविवाह हा शास्त्र व रूढिविरुद्ध आहे हें तुह्मांस माहीत नाहीं का ? ही गोष्ट कोणाही पंडितानें सांगितली असती. एवढ्याच करितां मजकडे येण्याचें काय प्रयोजन होतें ? "

शं० आई— त्यांच्या मतावर माझी भिस्त असती तर इकडे आलेंच नसतें. मला आपलेंच मत पाहिजे.

इतकें बोलून तिनें आपल्या दुःखाची काहणी अथपासून इतिपर्यंत सांगितली. ती हकीकत ऐकून गुरुमहाराजांच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. काशीहून आलेले ब्रह्मचारीही सद्गदित झाले. थोडा वेळ अशा स्थितींत लोटल्यावर शरत्‌ची आई म्हणाली, " गुरुमहाराज, मजवर चोहोंकडून आकाश कोसळलें आहे. तर अशा स्थितींतून पार कसें पडावें हें विचारण्याकरितां मी आपणाकडे आलें आहें. लोकाच्या भरीं पडून उमेच्या आईनें आपली मुलगी श्रीमंत घरीं दिली— ती उमा यथेष्ट यातना भोगून बाल्यकालींच मृत्युमुखीं पडली. त्याप्रमाणें मीही आपला सत्परामर्श झुगारून देऊन, गांवांतील ब्राह्मण पंडितांच्या नादीं लागून कालीचा विवाह त्याप्रमाणेंच केला, त्याबद्दल ईश्वरानें मला चांगलें शासन केलें. बिचाऱ्या कालीच्या तोंडाकडे पाहिलें कीं काळीज फाटून जातें. संसारांत आतां मला दुसरें कोणी नाहीं. माझा सारा आधार एकटा शरत् आहे. तसेंच बिंदु व सुधा ह्याही माझ्या पोटच्या मुलीप्रमाणें आहेत. कारण, त्यांच्या आईनें मरतांना त्यांना माझ्या ओटींत घातल्या आहेत. गुरुमहाराज, आपणच आतां या सर्वांचा भार घेऊन मला या चिंतेंतून मुक्त करावें. मी अनाथ विधवा हा भार सहन करण्यास अगदीं असमर्थ आहें. "

अशा प्रकारची आपल्या दुःखाची काहणी गुरुमहाराजाजवळ सांगून टाकल्यानें तिचें व्यथित अंतःकरण हलकें झालें.

शरत्‌च्या आईची ती हृदयद्रावक गोष्ट ऐकून गुरुमहाराजांचें अंतःकरण कळवळलें व त्यांच्या नेत्रांतूनही अश्रु वाहूं लागले. थोडा वेळ त्यांच्या तोंडांतून शब्द निघेना अशी स्थिति झाली. मन थोडेसे शांत झाल्यावर ते म्हणाले, " बाई, तुमची ही हकीकत ऐकून माझेंही चित्त अस्वस्थ झालें आहे. बरें, पण तुम्हांला काय विचारावयाचें आहे तें विचारा पाहूं ! "

शं० आई— माझें विचारणें एवढेंच आहे कीं, विधवाविवाहांत कांहीं पाप आहे कीं काय ?

गुरुम०— पापपुण्याचें ठीक निरूपण करणार ईश्वर समर्थ आहे. मी आपल्या शास्त्रांत काय सांगितलें आहे तेंच सांगणार.

श० आई— तेंच सांगावें. आपल्या सनातन हिंदुशास्त्रांत ही चाल निंद्य मानली आहे कीं काय ? लोक निंदेची मला परवा नाहीं. माझें आयुष्य आतां कितीसें उरलें आहे ?

गुरुम०—शास्त्रें अनेक आहेत व तीं सर्व एका वेळीं लिहिलेलीं नाहींत व त्या सर्वांचें एकमत नाहीं. ज्यावेळीं हिंदुजातीचे जसे आचार व्यवहार होते त्याला अनुरूप हीं शास्त्रें बनविलीं गेलीं.

श० आई—महाराज, मी अप्रबुद्ध अबला, मला ह्या सर्व गोष्टी काय कळणार ? पण आपल्या सनातन हिंदुशास्त्रांत विधवाविवाह निषिद्ध मानला आहे कीं काय ? एवढें कृपा करून मला स्पष्ट सांगावें.

गुरुम०—सध्यां ही चाल निषिद्ध झाली आहे, ह्मणूनच सध्याच्या शास्त्रानें ही निषिद्ध. दुसरें काय ?

श० आई—सध्याचें शास्त्र व पुरातन शास्त्र मला कांहीं कळत नाहीं. आपल्या धर्माचें जें मूळ शास्त्र त्यांतलें मर्म काय आहे तें मला सांगा. माझें चित्त फार व्याकुळ झालें आहे. विधवाविवाह शास्त्रनिषिद्ध नाहीं असें कलकत्त्यांतील कांहीं प्रधान पंडितांचें ह्मणणें आहे; पण आपल्या मुखांतून त्याचा निर्णय झाल्याशिवाय माझा त्यावर विश्वास नाहीं. आपला निर्णय हेंच माझें वेदवाक्य.

गुरुमहाराजांनीं बराच वेळ मनाशीं विचार केला, आणि नंतर ते ह्मणाले, " ज्या अर्थी तुह्मी विचारतां आहां त्या अर्थी मी तुह्माला सर्व स्पष्ट सांगतों. तुह्मी ज्या पंडिताची गोष्ट सांगितली तो माझा सहाध्यायी होता. त्याचें अपूर्व शास्त्रज्ञान व त्याची सत्यप्रियता मला चांगली माहीत आहे. एक वेळ विधवाविवाह शास्त्र निषिद्ध नाहीं असें त्यानें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. माझे परम सुहृद् रमानंद सरस्वती यांचेंही तेंच मत आहे. "

श० आई—महाराज, आपण जें माझ्या चित्ताला शांतिदान केलें त्याबद्दल मी आपली चिरऋणी आहें. आतां मी आपणाला शास्त्रही विचारीत नाहीं व रूढीही विचारीत नाहीं. पण ईश्वराच्या दृष्टीनें हें कार्य योग्य कीं अयोग्य ?

याचा काय तो आपण उभयतांनीं निर्णय करून माझ्या चित्ताचें समाधान करावें.

रमाप्रसाद सरस्वती—बाई, ही गोष्ट जगांतील सर्वश्रेष्ठ पंडिताला देखील सांगतां येणार नाहीं, मग आह्मी काय सांगणार ? जगदीश्वराचा अभिप्राय अणुमात्रही कळण्याची मनुष्याची पात्रता नाहीं. पण जो पूर्ण करुणामय त्यानें चिरकाल दुःख भोगण्याकरितां विधवासृष्टि निर्माण केली असावी, असें आमच्या तरी अल्प समजुतीला वटत नाहीं.

रमाप्रसाद सरस्वतीची ती स्थिर, गंभीर व पुण्यमयी वाणी त्या आश्रमांत अगदीं दुमदुमून राहिली.

पंचविंश परिच्छेद.

उपसंहार.

वैशाखमासीं तालपुष्करग्रामीं प्रथम आपला हेमचंद्र व त्याच्या कुटुंबीयांशीं परिचय झाला. आतां पुन्हा वैशाखमास आला आहे, तर पुन्हां एकवेळ आपण त्याच्या भेटीस जाऊं या.

हेमचंद्राच्या स्थितींत कांहीं एक फेरबदल झाला नाहीं. त्याचें दारिद्य अद्याप कायम होतें. एक वर्षभर कलकत्त्यास राहून आपली शेतवाडी पाहण्याकरितां तो परत आपल्या गांवीं आला. चंद्रनाथ बाबूनें त्याला हायकोर्टांत एक जागा देवविण्याची व्यवस्था केली होती, पण ती न पतकरितां तो आपल्या गांवीं आला. कलकत्त्यास आणखी एक महिना राहण्याविषयीं शरतनें त्यास पुष्कळ आग्रह केला, पण त्यानें त्यावर एकच उत्तर दिलें, "आतां येथें राहण्याची माझी बिलकूल इच्छा नाहीं."

बिंदु आपल्या गृहकृत्यांत पूर्वीपेक्षां अधिक निपुण झाली होती. बिंदूच्या चुलतीला उमेशिवाय दुसरें अपत्य नव्हतें. उमेच्या मृत्यूनंतर तिच्या जिवास चैन नव्हतें. ती बहुतकरून रोज दुपारीं बिंदूच्या घरीं जात असे, व तिच्या मुलांना खेळवीत अगर सनातनाच्या बायकोशीं गोष्टी बोलत असे.

तारिणीबाबूची एकुलती एक कन्या गेल्यामुळें त्याला दुःख झालें खरें, पण लवकरच त्याला त्या दुःखाचा विसर पडला. त्याचा कामकाजाचा उत्साह पूर्वीप्रमाणेंच कायम होता. वर्धमानच्या कलेक्टराच्या शिरस्तेदारची जागा रिकामी झाली होती ती मिळविण्याविषयीं त्यानें प्रयत्न सुरू केला.

शरत्च्या आईनें सुधेला आपली सून करून ह्यातारपणीं शांतिलाभ मिळविला. हा विवाह कलकत्त्यासच झाला. विवाहाला कांहीं मंडळी आली व कांहीं आली नाहींत पण त्यामुळें कार्य राहिलें नाहीं. देवीप्रसन्नबाबूनें येईन म्हणून सांगितलें होतें पण गृहिणीकडून रुकार न मिळाल्यामुळें त्याचें येणें झालें नाहीं. गांवांतल्या टवाळ लोकांनीं व ब्राह्मण पंडितांनीं ह्या विवाहास विघ्न आणण्याची खटपट केली पण ती व्यर्थ गेली. भवानीपुरांतील बहुतेक सुशिक्षीत लोकांसह चंद्रनाथबाबू ह्या समारंभास आला होता. जमलेल्या सर्व मंडळींच्या खटपटीनें व उत्साहानें हें शुभकार्य पार पडलें. विद्यासागराच्या पक्षाचे कांहीं पंडित ह्या विवाहाकरितां येणार आहेत असें कळल्यामुळें धर्माची वृथा घमेंडी मारणाऱ्या पंडितांनीं इकडे ढुंकून पाहिलें नाहीं. विवाहसमारंभांत कांहीं तरी बेदा उत्पन्न करण्याच्या हेतूनें आसपासच्या जमलेल्या कुटाळ लोकांनीं पोलिस जमादाराचा दंडा पाहतांच मुकाट्यानें तेथून पळ काढला.

शरत् व हेमचंद्र जेव्हां तालपुष्करास आले तेव्हां प्रथम प्रथम गांवचे लोक त्यांच्याशीं कोणताही व्यवहार करीनात. पण तारिणीबाबू व त्याच्या पत्नीनें सर्व लोकांस बोलावून आणून त्यांच्या संमतीनें एक तोड काढिली. ती तोड ही कीं शरतनें प्रायश्चित्त घ्यावें. पण शरत् कांहीं केल्या त्या गोष्टीस मान्य होईना. तो ह्मणाला, मीं जें हें कृत्य केलें आहे त्यांत अयोग्य असें कांहीं नाहीं. मग व्यर्थ प्रायश्चित्त काय ह्मणून घ्यावयाचें ? अखेरीस शरत्च्या आईनें एक दिवस एक मोठें ब्राह्मणभोजन घातलें. तारिणीबाबू मोठा विनोदी होता, तो हंसत हंसत शरत्चंद्रास ह्मणाला, " पावसाचें पाणी कोठेंही पडो, अखेरीस तें नदीस जाऊन मिळणार यात संशय नाहीं. तुह्मी विधवाविवाह करा कीं सधवेला घरांतून काढून तिच्याशीं विवाह लावा, ब्राह्मणांच्या पोटांत एकदां अन्न गेलें कीं सर्व पापाचा क्षय झाला ह्मणून समजावें, असा तर आपला

समजत आहे, तेव्हां तूं काय करणार ? " शरत् ह्मणाला, " असा जर समाज असेल तर त्यांत सुधारणा ही अवश्य झालीच पाहिजे. ज्या समाजांत न्याय अन्यायाचा विचार नाहीं तो समाजच नव्हे. "

सनातनाची स्त्री नेहमीं हेमचंद्राच्या घरीं येऊन ह्मणत असे, " कां, मी सांगत नव्हतें कीं कलकत्यास जाऊं नका ह्मणून, कारण तेथें जातधर्माचा कांहीं विचार नाहीं. माझें ह्मणणें खरें झालें कीं नाहीं. हीं इंग्रजी शिकलेलीं मुलें जिवंत मामाबापाच्या नरड्याला सुरी लावायचींच. " इत्यादि इत्यादि.

सनातनाच्या स्त्रीला सुधेचा मोठा राग आला, पण तिचें तिजवरचें प्रेम मात्र ढळलें नाहीं. ती सुधेला आवडणारें सायीचें दहीं पूर्वीप्रमाणें वारंवार तिजकडे पोंचवूं लागली. अशा स्थितींत कांहीं काळ लोटल्यावर उभयतांच्या मनांतील किल्मिष नाहींसें होऊन उभयतांचीं मनें पूर्ववत् साफ झालीं.

शरत्‌ची आई पूर्वीप्रमाणें सारा दिवस धर्मकर्मांत व देवदेवतार्चनांत निमग्न राहूं लागली. ती संसारांत मुळींच लक्ष्य घालीत नसे. संसारांतील मुख्य गृहिणीचें काम सांप्रत कालीतारेकडे आलें होतें. ती संसारांतील सर्व कामें टापटिपीनें व अंग मोडून करीत असे यामुळें तिला तिच्या दुःखाचा विसर पडून तिचा वेळ आनंदांत जाऊं लागला. सुधा मोठ्या भक्तिभावानें आपल्या सासूची सर्व शुश्रूषा करी व नणंदेशीं मोठ्या प्रेमानें वागे यामुळें त्या कुटुंबांत सर्वत्र आनंदी आनंद असे.

एके दिवशीं संध्याकाळीं घराजवळच्या बागेंत एकटीच उभी राहून सुधा मनाशीं कांहीं विचार करीत होती, इतक्यांत शरत्‌चंद्र तेथें आला आणि ह्मणाला, " कसला विचार चालला आहे एवढा ? "

सुधा थोडी लज्जित झाली आणि ह्मणाली, " मी नाहीं सांगत. "

शरत्०— न सांगायला काय झालें, सांग लवकर.

शरत्‌नें पुढें होऊन तिला आलिंगन दिलें व तिच्या ओष्ठद्वयाचें चुंबन घेतलें. शरत्‌चंद्राच्या स्पर्शानें सुधेचें सर्व शरीर रोमांचित झालें आणि ती ह्मणाली, " हें काय हें, सोडा मला. "

शरत्‌नें मिठी सोडली आणि ह्मणाला, " सांग तर मग कसला विचार चालला होता तो. "

सुधा हंसत हंसत ह्मणाली, " लहानपणीं जेव्हां मी येथें येत असे त्यावेळीं तुह्मी त्या झाडाचे पेरु मला काढून देत होता त्याची मला सहज आठवण झाली. "

शरत् ह्मणाला, " अद्यापही तुला त्या गोष्टीचें स्मरण आहेना ? " इतकें बोलून शरत् एकदम झाडावर चढला व चांगले चांगले पेरु खालीं टाकूं लागला. इतक्यांत कालीतारा तेथें आली. तिला पाहून सुधा लज्जित झाली व घाबरली. शरत्चंद्र कालीतारेच्या दृष्टीस न पडतां एका झाडावरून दुसऱ्यावर व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर अशा रीतीनें तेथून निघून गेला.

या वर्षी शरत्चंद्राची परीक्षा पास होऊन तो पहिल्या वर्गात आला. पुढें तो मोठा पंडित झाला, पण बिंदु त्याला वारंवार ह्मणे, " इतकें सर्व झालें पण पोरपणच्या टवाळ्या अद्याप सुटल्या नाहींत. "

समाप्त.